आनंदाची फुले

म. ग्रं. सं. ठाणे.
वर्ग निषेध
क्र. 3374

रवींद्र पिंगे



REFBK-0025858

संदर्भ निबंध

3394

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

17 MAY 1989
14 MAY 1989
17 MAY 1989
24 MAY 1989
31 MAY 1989
3 SEP 1989
13 SEP 1989
20 SEP 1989
11 OCT 1989
10 DEC 1989
22 AUG 1990
13 FEB 1993

(क्र. मा. पहा)
५०००–११–८६

आनंदाची फुलं

रवींद्र पिंगे

REFBK-0025858

उत्कर्ष प्रकाशन, पुणे ४.

प्रकाशक
सौ. सविता सु. जोशी
उत्कर्ष प्रकाशन
रेणुका अपार्टमेंट, पुणे ४
शनिवार पेठ, पुणे ३०

© सौ. शुभदा (कमल) रवींद्र पिंगे

पहिली आवृत्ती
१५ ऑगस्ट १९८८

मुद्रक
सा. रा. भंडारी
भंडारी मुद्रणालय
२७१ नारायण पेठ,
पुणे ४११ ०३०.

मूल्य : ३० रु.

प्रास्ताविक

हा माझा पांचवा ललित लेखसंग्रह. दिवाळी अंकांच्या निमित्ताने हे लेख लिहून झाले. आता संग्रहात आणतांना त्यांची डागडुजी केली आहे.

ह्या लेखांना प्रसिद्धी देणाऱ्या सर्व संपादकांचे आभार.

ह्यातल्या बहुतेक लेखांमध्ये मी माझ्या आयुष्यातल्या आठवणींचा ऊनपाऊस चितारला आहे. त्यात तरवार मारल्याची भावना नाही. लिहिताना अवघड न वाटतील अशा सत्य घटनांची ओझरती नोंद, लेखनकलेच्या दृष्टीने आवश्यक वाटेल तेव्हाच, नि जेवढ्यास तेवढी करावी, हेतूतः अलंकरण करू नये, हे पथ्य पाळलं आहे.

तहान लागली की ज्यांच्या लेखनाच्या तळ्याकडे मी परत परत वळतो, त्या निवांत व्यंकटेश माडगूळकरांना मी हे माझं पंधरावं पुस्तक अर्पण करीत आहे.

७७ जय हनुमान सहनिवास (६)
हनुमान मार्ग,
विलेपार्ले (पूर्व)
मुंबई – ४०० ०५७.

—रवींद्र पिंगे
१३ · ३ · १९८८

अनुक्रम

माझं लेखन कशासाठी ?	१
मासळीभात आणि सोलकढी (महाराष्ट्र टाइम्स, २६-७-१९८१)	१२
आकाशवाणीपर्व (सांज–तरुण भारत, दिवाळी १९८४)	१९
लक्षावधी पक्ष्यांचं मुंबईमार्गे स्थलांतर (महाराष्ट्र टाइम्स, ४-१२-१९८०)	३२
एका बोटभर लेखाचा पोटभर आनंद (मेघना, दिवाळी, १९८१)	३५
पावरी (पालवी, दिवाळी, १९८६)	४४
मी आणि माझे वाचक (नवरंग, दिवाळी, १९८६)	४९
उजळलेली दिशा (भारत विशेष, दिवाळी, १९८५)	५५
ब्रह्मलिखित (विशेष, दिवाळी, १९८४)	६१
कदंब, दुर्गाबाईंचा आणि माझा (तरुण–भारत, पुणे ४-११-१९८२)	६५
शुभारंभ (साप्ताहिक गावकरी, दिवाळी, १९८३)	७१
शाबास की (नागपूर पत्रिका, दिवाळी, १९८६)	७६
गंगाजळ (हंस, जुलै, १९८१)	८०
श्रीपाद काळ्यांचं कोकणी घर (ललित, फेब्रुवारी, १९८७)	८५
जंक्शन (श्री–दिपलक्ष्मी, दिवाळी, १९८१)	९२
लेखकाचं इनाम (साहित्य-संवाद, दिवाळी, १९८१)	१००
एक धार्मिक आठवण (सांज-तरुण भारत, दिवाळी, १९८०)	१०६
जगण्यातलं कडू–गोड (विशाखा, दिवाळी, १९८६)	१११
लेखकाचा स्वर्ग (नवा आदित्य, दिवाळी, १९८६)	११७
आनंदाची फुलं (व्यासपीठ, दिवाळी, १९८६)	१२१



माझं लेखन कशासाठी ?

कधी तरी डोळे उघडून निर्भयपणे आपण आपल्याकडे पाहिलंच पाहिजे. निरंतर भ्रमात तरंगण्यात कसली आली आहे मजा ? ज्ञान वगैरे मोठे शब्द जरा बाजूल. ठेवूया. आपली खरीखुरी माहिती निदान आपल्याजवळ तरी असलेली बरी आणि तीही वेळेवर नोंदवलेली उत्तम काळ पुढे सरकतो, तसं विस्मरण विस्तारतं आणि स्वतःच्या कर्तृत्वाबद्दलचा भ्रमही वाढीला लागतो. किंवा माणसाला आपलं आयुष्य शून्यवत वाटू लागतं. ह्या दोन्ही अवस्थांना उंबरठ्याबाहेर तिष्ठत ठेवून थोड्याशा सत्यनिष्ठ आणि अनलंकृत नोंदी करण्याची ही संधी साधतो.

एकंदरीत, लोकांनी वाहव्वा करावी म्हणून मी लिहायला लागलो हेच खरं.

तरीसुद्धा मूलभूत प्रश्न निर्माण होतोच की वाहव्वा होण्यासाठी लिहायलाच का लागलो ? त्याऐवजी क्रिकेट, कुस्ती, गाणंबजावणं, चित्रं रेखाटणं, समाज-सेवा करणं ह्या गोष्टींकडे का वळलो नाही ? लेखन एके लेखन करूनच तलवार मारण्याची बुद्धी मला का झाली ?

लेखन हे मला कदाचित त्यातल्या त्यात सोपं, बिनखर्चाचं आणि हाता-जवळचं साधन वाटलं असावं.

अनुवंशही हिशोबात धरला पाहिजे.

माझे पणजोबा, म्हणजेच वडिलांच्या वडिलांचे वडील, ज्यांचं नाव दाजीबा होतं, आणि जे परमदयाळू प्राणिमित्र शेतकरी होते, त्यांना कवनं रचायचा नाद होता. कोकणातल्या आमच्या खळ्यात तमाशेवाले संगीत खेळ करायचे. त्या खेळकऱ्यांना भात उकडून जेवू घालणं आणि स्वतः लिहिलेल्या लावण्या त्यांना पुरवणं, ही कामं दाजीबांनी सालोसाल उत्साहाने केली. आमच्या गावचे शिमग्याचे खेळे दाजीबांची रचना गात असत. कदाचित तो तंतू लपतछपत

माझ्यापर्यंत येऊन धडकला असेल. माझे आजोबा म्हणजे वडिलांचे वडील एम. एस. एम. रेल्वेत जमादार होते आणि आई-बाबा दोघेही प्राथमिक शिक्षक. ह्या सर्व संचिताचा एकत्रित परिणाम म्हणून माझ्यात एक परोपकारी कोतवालही डोकावतो आणि पंतोजीही सदा जागृत आहे.

माझी खात्री आहे, भोनीच्या पारी मी जे काही किडूकमिडूक लिहिलं, ते वाचून वाचकांना माझी दयाच आली असणार. वाचक म्हणजे हक्काचे कुटुंबीय आणि सोबती. लांबचे कुणी नव्हेत. त्यातल्या त्यात सुदैव म्हणजे कविता वगैरे मी ज्या खरडल्या त्या कुठे प्रसिद्धीसाठी मात्र पाठवल्या नाहीत. एक मोडकीतोडकी निरर्थक कविता मात्र विचाऱ्या तात्यासाहेब केळकरांकडेच थेट पुण्याला प्रसिद्धीसाठी पाठवून दिली. त्या सहनशील साहित्यसम्राटाने ती दुरुस्त करून माघारी पाठवली; शिवाय उपदेशपर चार ओळीही लिहिल्या. वाचावं आणि उमेदवारी करावी हे खहस्ते सुचवलं. ते गोड पत्र मग मी गावभर मिरवलं. कवितेची प्रसिद्धी झक मारो, मी साहित्यसम्राट केळकरांपर्यंत पोहोचलो, हेच मला भूषण वाटलं! मॅट्रिक होण्याच्या बऱ्याच अगोदरचा हा फाजिलपणा आहे.

पुढे वाङ्मयाच्या फंदात न पडता, भाषाविषय टाळून, मी किरकोळ चाकऱ्या करीत करीत जेमतेम पदवीधर झालो. प्रथम विल्सनमध्ये नि नंतर सिद्धार्थ महाविद्यालयाच्या आद्य तुकडीतला मी विद्यार्थी. अनंत काणेकरांसारखा तेव्हाचा तरुण लोकप्रिय शिक्षक तिथे होता. तरीही मी साहित्याच्या वर्गात पाऊल टाकलं नाही. अर्थशास्त्र पढलो. ही मात्र भले लाख गोष्ट घडली. मराठी साहित्याचा चाकोरीबद्ध अभ्यास मी सफाईने चुकवला. मीच माझा गुरू होऊन मनाला आवडेल ते मी वाचत सुटलो. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, अमेरिकन वाचनालय आणि मुंबई विद्यापीठाचं ग्रंथालय ही माझी विरंगुळ्याची ठिकाणं झाली. आणि चर्निरोड स्टेशनाची बाग!

अब्बाससकट सर्वांचे जगप्रवास, फ्रॉईडचे प्राथमिक ग्रंथ, सॉमरसेट मॉमचे प्रस्तावनाखंड, धनंजयराव गाडगीळांची अर्थशास्त्रीय पुस्तकं आणि अमेरिकेच्या 'सॅटरडे रिव्ह्यू ऑफ लिटरेचर'चे आणि लंडनच्या 'बी. बी. सी. लिसनर'चे एकूणएक अंक मी जवळ केले. तसंच, अचानक हाती आलेला विल्यम सारोयान हा लेखक मला फार प्रिय झाला. जुनी पुस्तकंही मी जमवू लागलो. वामन मल्हारांच्या मधुर 'स्मृतिलहरी'ने मला भारून टाकलं. खांडेकर

सुरवातीला आवडले. नंतर कंटाळा आला. फडक्यांचं स्फुटलेखन आवडलं. प्रभाकर पाध्यांचं कथालेखन नि ललित लेखन साक्षात हृदयाला भिडलं, आणि कुसुमाग्रजांची कवितासुद्धा. हो, जुनं 'नवनीत' फार फार आवडलं.

ही नांगरणी घडली केवळ मी भाषाविषय पदवीसाठी निवडला नाही म्हणूनच ! एरव्ही मी वाङ्मयाच्या आळणी आणि चाकोरीबद्ध अभ्यासक्रमात नाहक गुरफटलो असतो; सुमार व्याख्यात्यांच्या रटाळ नोटस् परीक्षेच्या उत्तरपत्रिकांमध्ये झिलई देऊन उतरून काढल्या असत्या; नकली यश मिळवून कुठेतरी तालुक्याच्या गावी रविकिरण मंडळ पढवीत राहिलो असतो; पाच-दहा ओळींची टिपणं लिहिली असती आणि अखेर छातीच्या पिंजऱ्यात प्रचंड न्यूनगंड गोळा होऊन आस्ते आस्ते लिहायचाच थांबलोही असतो. ते व्हायचं नव्हतं. म्हणून ज्यात विश्रब्धपणे मन रमलं, चित्त उल्हसित झालं, टवटवीत वाटलं, ज्याने माझी नाळ विश्वाशी जोडली, ते मी आरामात वाचत गेलो. त्या वाचनातून विराट विश्वाची नि चैतन्यदायी निसर्गाची अधिक ओळख झाली. काळाचीही मला अमोघ मदत झाली. स्वातंत्र्यसूर्याचा दिव्य उदय मी कोवळ्या वयात पाहिला. गांधी पाहिले. नेहरू पाहिले. जयप्रकाश जवळून पाहिले. सेनापती बापट, साने गुरुजी, युसुफ मेहेरअल्ली, आचार्य जावडेकर पाहिले. समाजवादी चळवळ तिच्यात लुडबुडून पाहिली. मुख्य म्हणजे जे. कृष्णमूर्तींच्या निर्मम विचारधारेत न्हाऊन निघालो. रावसाहेब पटवर्धन आणि नानासाहेब गोरे ह्यांचा निकट स्नेही झालो. तेही फार फार दिलदारीने वागले. मी खूप भटकलो. अनेक उद्योग केले. नोकऱ्या केल्या. स्वप्नातसुद्धा न कल्पिलेली सुखं आपल्या पायांनी माझ्याजवळ चालत आली. मी आतून प्रसन्न होत चाललो. नियतीचा हिरवा कंदिल मी माझ्या डोळ्यांनी पाहिला.

पण म्हणून मी लेखन केलं काय ?

नाही; नाही; नाही.

सत्याला स्मरून सांगायचं तर 'साधना' आणि 'मौज' साप्ताहिकांत, आणि 'नवशक्ति' दैनिकात मी किरकोळ वृत्तांत लिहिले; पुस्तक परिचय लिहिले; नाट्यप्रयोगांची समीक्षणं लिहिली; अंगापुरती जुजबी टीकाटिपणी केली. हीच सारी उमेदवारी समजायची असेल, तर त्या आखाड्यात मी रग्गड रमलो होतो, हे कबूल. आणि घसघशीत लेखन जरी केलं नसलं तरी वाङ्मयीन वातावरणाच्या वाहात्या पऱ्हात उभं राहाण्यातली खुषी मी मनमुराद अनुभवली

त्या काळात, हेही सत्यच आहे. वाङ्मयीन लत्त्यांत घोटाळ्यामुळे जाणकार लेखकांचा मोठा सुखद सहवास मला त्या कळी लाभला. उदाहरणार्थ मंगेश पाडगावकर, वसंत बापट, राम पटवर्धन, सदानंद रेगे, रामदास भटकळ, उमाकांत ठोमरे, गोपाळकृष्ण भोबे, ज्ञानेश्वर नाडकर्णी, गंगाधर महांबरे आणि शंकर वैद्य, हे सगळे तेव्हाचे धडपडे लेखक माझे मित्र झाले; माधव मनोहर, गंगाधर गाडगीळ, पु. शि. रेगे, चित्रकार दलाल, श्री. पु. भागवत आणि अनंत काणेकर हे मित्रत्वाच्या सलगीने वागणारे वरच्या वर्तुळातले हितचिंतक स्नेहीही लाभले. किती निरागस सुखाचे दिवस होते ते ! साहित्याविषयीचा उत्साह तेव्हा नुसता निथळत होता.

तरीही मी लेखनाकडे जोमाने वळलो नाहीच !

नंतर योगायोगाने मी युसुफ मेहेरअल्लींची व्यक्तिरेखा 'मौज' साप्ताहिकात पंचावन्न साली लिहिली, हा प्रारंभ. पाँडेचेरीला माताजींना पाहिलं आणि अरविंद आश्रमातल्या साधनेवर 'सत्यकथा' मासिकात प्रवासवर्णनात्मक ललितलेख लिहिला. हा माझ्या कलात्मक ललित लेखनाचा शुभारंभ म्हणायचा. तो मोठ्या प्रतिष्ठित ठिकाणी ठळकपणे झाला. कृतार्थ वाटलं. आजही तीच भावना मनात आहे. नंतर आकाशवाणीचं नभोनाट्यलेखनातलं पारितोषिक मिळवलं, आणि करता करता मी रीतसर ललित लेखन करायला लागलो. सत्यकथा, वीणा, मनोहर, दीपावली, सह्याद्री, हंस, मोहिनी अशा प्रतिष्ठित मासिकांमधून मी तुरळक हजेरी लावू लागलो. तिथे मला कधी कुणी हटकलं नाही की फटकारलंही नाही. उलट, मला सर्वांनी धीर दिला. चांगलं म्हटलं. नंतर 'महाराष्ट्र टाइम्स'मधून मी सुरवातीपासूनच भरपूर लिहून घेतलं. त्याचंही घरीदारी कौतुक झालं. आत्मविश्वास बळावला. खुद्द माझी भावना मात्र मी रांगत आहे अशीच नम्र होती. पुढे एकदा चित्रकार दलाल चटकन् म्हणून गेले, "पिंगे, यू आर ए मेजर रायटर. मला फार आवडतं तुमचं लेखन." आणि त्या क्षणी, मला वाटतं, मी माझ्याकडे नीट पाहून घेतलं ! आपण लेखक आहोत; नव्हे, लेखकच आहोत, आणि दुसरे तिसरे कुणीही नाही, ही भावना माझ्यात त्या क्षणी प्रथम रुजली. योगायोग असा की चित्रकार दलालांनीच आपल्या 'दीपावली'तर्फे जाहीर केलेल्या लघु-कादंबरी लेखनातलं पारितोषिक माझ्या कोकणी वातावरणावरल्या 'परशुरामाची सावली' ह्या कादंबरिकेला लाभलं. त्यामुळे हुरूप आला. आपण कलावंत लेखक

आहोत, अशी खूणगाठ मनाशी मारली गेली.

'परशुरामाची सावली' हे माझं नमनाचं पहिलं स्वतंत्र पुस्तक. ह्या कादंबरीचा झेंडा हातात घेऊन मी लेखकीय आयुष्याला सुरवात केली. ही १९६८ सालची हकिगत आहे; मी त्यावेळी नुकतीच चाळीशी ओलांडली होती. बालबच्चेवाला गृहस्थ झालेलो होतो.

इथून पुढची हकिकत हलक्याफुलक्या यशाची इवलाली फुलं गोळा करीत गेलेल्या एकमार्गी आनंदव्रती साहित्यसेवकाची आहे, हे नमूद करताना मला अवघडल्यासारखं बिलकूल वाटत नाही. खंत वाटत नाही. फुशारकीही वाटत नाही. समाधान निश्चितपणे वाटतं. आणि, चिमूटभर कृतार्थताही.

शुभंकर योगायोगाचं माझ्या आयुष्यात असलेलं सूत्र ह्या तिठ्यापासून मला स्पष्टपणे दिसू लागलं. १९५० ते १९६५ अशी पंधरा वर्षं मी राज्यसरकारच्या सचिवालयातल्या शिक्षण विभागात सन्मानाने काढली. तिथं वाङ्मय शाखेचा मी अधिक्षक होतो आणि कै. पां. ज. चिन्मुळगुंद हे साहित्यप्रेमी सनदी अंमलदार सर्व अधिकार माझ्यावर विश्वासाने सोपवून निश्चिंत रहात. मी म्हणेन तीच पूर्वदिशा, असा तेव्हा जमाना मी उपभोगला. ह्या काळात मी चोख काम केलं, साहित्यविषयक उत्तम शासकीय पायंडे अंतःप्रेरणेने घालून दिले. भलाई जोडली नि निर्वैर वागलो. पायाखालची मुंगीही चिरडली नाही. शासकीय धन गरजू लेखकांना अगदी मुक्तहस्ते वाटलं. भ्रष्टाचाराचं वारंही मला लागलेलं नाही, नि यापुढे कधीही लागणार नाही. ह्या सेवेत अनेक कमेट्या नेमाव्या लागत. त्यांचं कामकाज मी डोळ्यात तेल घालून पाहिलं. लोककल्याण हेच एकमेव उद्दिष्ट ठरवलं. साहित्य-संस्कृती मंडळाचा तर मी आद्य शिल्पकार आणि पहिला सहाय्यक सचिव आहे. त्यामुळे दूरगामी परिणाम करणारी हजारो कागदपत्रं माझ्या हातून तयार झाली, आणि अनेक थोर साहित्यसेवकांचा सहवास प्रत्यक्ष लाभला. अ. का. प्रियोळकर, मं. वि. राजाध्यक्ष, सरोजिनी वैद्य, वा. ल. कुलकर्णी, हरिभाऊ मोटे, सेतु माधवराव पगडी, न. र. फाटक, पं. महादेवशास्त्री जोशी, ही विद्वत्सभा जणू घरचीच झाली.

पुढे पासष्ट साली मी मुंबई आकाशवाणीवर प्रथम सहाय्यक सादरकर्ता म्हणून आलो. पाच वर्षांनी वाङ्मयविभागाचा सादरकर्ता झालो. ही नोकरी तर उघड उघड वाङ्मयाच्याच जिवंत दालनातली. आकाशवाणीमुळे काका कालेलकर, मंगेश पाडगावकर, पु. ल. देशपांडे, कवी बा. भ. बोरकर, वा. रा.

कांत, चिं. त्र्यं. खानोलकर, राजा बढे, माडगूळकर बंधू, लीलावती भागवत, सुधा नरवणे वगैरे निष्णात प्रभावळीशी नातंगोतं जुळायला लागलं. मी सकलांशी आदरभावनेने पण जेवढ्यास तेवढा वागलो. त्यामुळे अवाजवी गुंतागुंत झाली नाही. आणि मुख्य म्हणजे त्यांची उदाहरणं पाहून मी माझा हात लिहिता ठेवला. ते भान मी कधीही लुप्त होऊ दिलं नाही. आपण कलावंत लेखक आहोत आणि एका प्रभावी माध्यमाच्या देवडीवर नियतीनेच आपणाला हेतूपूर्वक बसवलं आहे, अशी गाढ श्रद्धा माझ्या मनी उदित झाली. आकाशवाणीवर अष्टौप्रहर रावता लेखक-कवींचाच. माधव कुलकर्णी वगैरे सहकारीसुद्धा लेखनप्रांतातलेच. त्यामुळे वातावरणाचे रंग कधी फिके झाले नाहीत. खोला धावे पाणी, तसा उल्हसित मनाने मी लेखन करू लागलो.

त्या लेखनात सातत्य पुन्हा योगायोगानेच आलं. १९७० साली 'माणूस' साप्ताहिकाचा संपादकीय कारभार पाहणारे दिलीप माजगावकर एका सायंकाळी आकाशवाणी केंद्रावर अकस्मात उगवले. हंसा वाडकरांच्या 'सांगत्ये ऐका' ह्या आत्मचरित्राच्या प्रकाशन सोहोळ्याला माधव कुलकर्ण्यांना आमंत्रण द्यायला ते आलेले होते. कुलकर्णी रजेवर होते. म्हणून मीच माजगावकरांशी बोललो. त्यांना स्टुडिओ दाखवला. ही सुरवात. ते सहजगत्या म्हणाले, "तुम्ही लिहा की 'माणूस'साठी." 'माणूस' त्यावेळी जोरात होता. विजय तेंडुलकर तिथे 'रातराणी' हे सदर लिहीत होते. मी म्हटलं, "मी एकदोन स्फुटं पाठवतो. तुम्ही वाचा. ठीक वाटली तर पुढे पाहू."

योगायोगाने त्याच वेळी मुंबईत दोन चांगले समारंभ होणार होते. एक, देविदास बागूलांच्या मुद्रणशिल्पांचा. दुसरा, श्रीनिवास खळ्यांचा पन्नासावा वाढदिवस. बागूल माझे जिवलग मित्र होते नि माझ्या आकाशवाणीवरल्या तत्कालीन गाण्यांना श्रीनिवास खळ्यांनी संगीतलाभ दिलेला होता. म्हणून मी दोघांवरही उमाळ्याने लिहिलं. 'माणूस'ची नि माझी कुंडली जमली. लगोलग 'सांस्कृतिक मुंबई' आणि नंतर 'शतपावली' ही सदरं मी आठवड्याच्या आठवड्याला 'माणूस'मधून एकटाकी लिहायला लागलो. ती आंतर्बाह्य वाङ्मयीन सदरं होती. त्यातल्या वेचक लेखांचा संग्रह पुढे 'माणूस'नेच 'शतपावली' ह्या शीर्षकाने प्रसिद्ध केला. त्याला राज्यपुरस्कारही मिळाला. त्याहीपेक्षा, 'शतपावली'ने मला फार मोठा वाचकवर्ग राजीखुषीने मिळवून दिला. जाणकारांमध्ये माझा बोलबाला झाला. सव्यसाची लेखक म्हणून

साहित्याच्या नकाशावर मला 'माणूस'ने ठळकपणे आणलं. 'माणूस'मधून सुमारे पाच वर्षं मी अगदी मनापासून आठवड्याच्या आठवड्याला लांबरुंद लिहिलं. त्याचं कौतुक झालं. 'माणूस'तर्फे माझे चार संग्रह निघाले. त्यांचंही उत्तम स्वागत झालं. त्यातला काही भाग क्रमिक पुस्तकात समाविष्ट झाला. 'देवाघरचा पाऊस' इंटरला, 'मोकळं आकाश' बी. ए.ला, आणि 'शतपावली' एम. ए.ला लागलं.

'शतपावली' हे सदर संपल्यावर मी 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये 'बकुळफुलं' आणि 'केसरी'मध्ये 'फुलं मोहाची' अशी दोन वाङ्मयीन सदरं चालवली. 'मनोहर'च्या 'आकाश पाळणा' ह्या सदरातही लिहिलं. नंतर पुन्हा 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये 'साहित्य-संचार' हे सदर लिहिलं. ही सर्व सदरं नि इतर सर्व स्फुटलेखन पूर्णपणे वाङ्मयीनच आहे. 'शतपावली', 'बकुळफुलं', 'फुलं मोहाची', 'आकाश पाळणा', 'साहित्य-संचार' आणि 'पुस्तक पर्व' ही सहाही वाङ्मयीन आशयाची सदरं खाडा किंवा चालढकल बिलकूल न करता काटेकोर सातत्याने चालविल्यानंतर निगर्वीपणे सांगायला मी मोकळा आहे की सध्या तरी कलात्मक पातळीवरलं इतकं प्रदीर्घ वाङ्मयीन स्तंभलेखन करणारा मराठीतला मी एकमेव लिहिता लेखक आहे!

देश स्वतंत्र झाला त्यावेळी मी तारुण्यात पदार्पण केलं. सर्वत्र उत्साहाचं, नवनिर्माणाचं वातावरण होतं. मी दौत-लेखणी जवळ केली तेव्हा देशात सगळीकडे आदर्शाची हवा होती. आभाळ स्वच्छ होतं. स्टिफेन स्पेंडर, ऑडेन, ई. एम. फॉर्स्टर, जुलियो क्युरी, आर्थर कोएस्लर असे जागतिक पातळीवरले लेखक-कवी-विचारवंत मुंबईत पायधूळ झाडून गेले. त्या सर्वांना मी कौतुकाने पाहिलं, ऐकलं. शैलीकार साहित्यिक असलेले पं. नेहरू देशाचे पंतप्रधान होते. राजधानीत साहित्य आणि इतर ललितकलांच्या अकादम्या निर्माण झाल्या. आम्ही तरुण लेखक चैतन्यमय झालो. देव्हाऱ्याकडे भक्तिभावाने पाहू लागलो. पण आपल्या गावठी पुढाऱ्यांनी नि तथाकथित विचारवंतांनी नादान आमदानी सुरू केली. मग त्या पूजास्थानाची एक एक वीट ढासळायला लागली. स्वार्थ, वशिलेबाजी आणि नंगा भ्रष्टाचार स्पष्ट दिसायला लागला. वातावरणातली आदर्शाची हवा वितळायला लागली. आत्मीयतेच्या पाण्याची वाफ झाली. तशात, दुसऱ्या बाजूने आम्ही जाणतेही होऊ लागलो. डोक्यातला भ्रम वितळू लागला. आदर्शवाद नि ध्येयवाद बिलकूल खोटा नि वांझोटा आहे हे आमचं

आम्हालाच कळलं. मला तर विशेष जाणवलं, कारण मी समाजवादी चळवळीत तनमनधनाने गुरफटलो होतो. फार फार पस्तावलो, कारण माझ्या वेळेचं मी नाहक खोबरं करून टाकलं होतं. पण कुठल्यातरी अज्ञात शक्तीने मला अलगद सावरलं. वेळीच जागं केलं. आपल्या वाट्याला आलेला दिवस सीमित आहे, आपल्याला निसर्गाकडून मिळालेल्या शक्ती माफक आहेत आणि आपली जिंदगी तर उघडउघडच परिमित आहे, हे मला दिवसमास पटत गेलं. आला दिवस पदरात पाडून घेऊन आपण लिहिलं पाहिजे हे मला सारखं जाणवत गेलं. कधी तरी स्फूर्तीचा झटका येईल, माझेही दिवस येतील आणि मग तेव्हा मी चांगलं लिहून दाखवेन, असं मला कधीच वाटलं नाही. उंडग्या आदर्शवादाकडे पाठ फिरवून अगदी भसाभस् नसलं तरी सुचेल ते, जमेल ते आपण लिहिलंच पाहिजे, त्याला कलाकृतीचा घाट दिला पाहिजे, सातत्याला काही अर्थ आहे, हे माझं मलाच कळू लागलं. सत्तरी ओलांडलेल्या श्री. के. क्षीरसागरांची आणि नव्वदी ओलांडलेल्या रसेलचीही दैनंदिन लेखनातून सुटका होत नाही, आणि त्यांचा कीर्तिध्वज फडफडत ठेवण्याला त्या सातत्याची निश्चितपणे मदत होत असते, हे मला स्वच्छ दिसत होतं. लेखनात सदैव मग्न असणं, हेच साहित्यिकाचं वास्तव असतं. ते स्वीकारावंच लागतं. वास्तवाला पर्याय नसतो.

माझा अवघा मोक्ष लेखन-वाचनात गुंतलेला असल्यामुळे मी पुनः पुन्हा पांढऱ्या स्वच्छ कागदांकडेच वळलो. लिहिता झालो. कधी शब्द, सुभग आशय, डौलदार घाट आणि त्यातल्या त्यात अधिक खपाच्या नियतकालिकांमधून दूरपर्यंत प्रसिद्धी, ही लेखनव्यवहारातली चौकट मी माझ्यापुरती ठरवून टाकली. मी आता लेखनाच्या सरोवरात शांतपणे वल्ही मारत आहे.

ललित लेखनाचा हा सारा खटाटोप करून माझ्या पदरात त्यामुळे प्रत्यक्ष काय पडलं, ह्याचा काटेकोर ताळेबंद जरी सादर करता येण्यासारखा नसला, तरी मूठभर कृतज्ञ नोंदी केल्याच पाहिजेत.

मी सतत लेखन केलं, कारण लेखनाने मला हे ऐहिक जीवन जगत असतानाच सात्त्विक आनंदाचं धनी केलं. कागद-लेखणी समोर आली की माझी ब्रह्मानंदी टाळी लागे, आणि अजूनही निमिषार्धात लागते. लेखनवाचनात मला वखगाळ आनंदाच्या जितक्या घटिका लाभल्या, तितक्या त्या दुसऱ्या कशातही भोगता आल्या नाहीत. तेव्हा, मी लेखन का करतो ह्या प्रश्नाचं प्राथमिक उत्तर, कागदाला लेखणी टेकवण्यात मला चित्त हरखून टाकणारा

निर्लेप आनंद होतो म्हणून, हेच आहे. लिहिल्यामुळे दोन दिडक्या कनवटीला लागतात, किंवा चार माणसं नावाजतात, किंवा प्रियजन खुष होतात, ह्या त्या मानाने दुय्यम बाबी; लेखनामुळे त्या पदरात न पडल्या तरीही मी लिहिलंच असतं. अगदी आजच्यासारखंच मनःपूर्वक लिहिलं असतं. माझं लिहिणं रसिकनिरपेक्ष नसलं तरी सर्वस्वी वाचकांचा अनुनय करणारं बिलकूल नाही. आणि, हो, माझा जीव लहान आहे आणि माझ्या लेखनातले प्राण फार मोठे नाहीत, हे मी पक्कं जाणून आहे. आणि तसंच, ते नगण्यही नाही. माणसांच्या नातेसंबंधातलं माधुर्य आणि प्रकाशतत्त्व आणि चराचरातलं चैतन्य ह्यांचा शाब्दिक मेळ माझ्या लेखनात निश्चितपणे आहे. शिवाय, प्रसन्नताही आहे. कारण अखेर मी हे सारं मजेत भोगतोय नं !

ज्यांनी आपली अवघी आयुष्यं इतर सर्व ऐहिक मोहांना बाजूस सारून निव्वळ लेखनाचा प्रपंच करण्यात व्यतित केली ते समस्त लेखनवीर धन्य होत. असे थोर साहित्यभीष्म सर्व देशांत, सर्व भाषांत, सर्व काळी होऊन गेले. सर्वांत अचाट उदाहरण पाँडेचेरीच्या श्रीअरविंदांचं आहे. चिंतनाच्या पातळीवरलं केवढं तात्त्विक ललित साहित्य एका जन्मात त्या प्रतिभाभास्कराने निर्माण केलं ! त्यामागोमाग आहेत डिकन्स, टागोर, टॉलस्टॉय, शरदबाबू, हरिभाऊ, राजवाडे, डॉ. केतकर, रेवरंड टिळक, कोल्हटकर, केळकर, सावरकर, फाटक, चर्चिल, रसेल, ऑरवेल, सानेगुरुजी, फडके, नाथमाधव, श्री. के. क्षीरसागर, दि. बा. मोकाशी, पी. जी. वुडहाऊस, पर्ल बक, हेमिंग्वे, पांगारकर, आजगावकर, माधव ज्युलियन, कवि यशवंत, धनंजय कीर, बोरकर कवी, आब्बास, कन्हैयालाल मुनशी नि काका कालेलकर. ही नावं अस्ताला गेलेल्या साहित्यसूर्यांची आहेत. आजही ज्यांचा शिंपता हात लिहिता राहिलेला आहे असे समर्पित सरस्वतीपुत्र नजरेसमोरच आहेत : दुर्गा भागवत, पेंडसे, आर. के. नारायण, अमृता प्रितम, अरविंद गोखले, गो. नी. दांडेकर, कुसुमाग्रज, मुल्कराज आनंद, गाडगीळ, पु. ल. देशपांडे, पं. महादेवशास्त्री जोशी, डॉ. रा. चिं. ढेरे, व्यंकटेश माडगूळकर आणि इतरही कैक. माझ्या आसपास असलेली माझ्या लोभातली ही लेखकमंडळी अस्तंगत धुरंधरांपेक्षा रतिमात्र उणी नाहीत. त्यांची खेळी त्यांच्या ह्याच जन्मी सफळ होवो, कारण ते फक्त लिहितात हेच योग्य करतात. वृक्षाचा जन्म घेतलेल्यांनी जगताना वृक्ष म्हणूनच वाढलं पाहिजे, डुललं पाहिजे, फुललं पाहिजे, पांथस्थांना सावली आणि पाखरांना अभययुक्त

आश्रय दिला पाहिजे. तेच त्यांचं जन्मसाफल्य.

माझं वाङ्मयीन स्तंभलेखन ही वेगळी गोष्ट आहे. इतर चिंतनात्मक ललित-लेखन आणि कथालेखनही मी भरपूर केलेलं आहे. अनेकांना प्रत्यक्ष पाहिलं, भेटलो. त्यांच्यासंबंधी वाचलं, माहिती गोळा केली, आणि त्यांची व्यक्तिचित्रं लिहिली. ह्यात शृंगेरीमठाच्या श्रीशंकराचार्यांपासून पं. कुमार गंधर्वांपर्यंत आणि यष्टिरक्षक नवल्यांपासून कनवाळू पर्ल बकपर्यंत सर्व थरावरल्या मंडळींचा समावेश आहे. लिहिता लिहिता मी देशभर यथेच्छ भटकलो. नद्यानाले ओलांडले, वाळवंटं तुडवली, डोंगरी चढउतार केले, बागबगिचे धुंडाळले, सागरपार झालो. ब्रह्मपुत्रा ओलांडून हिमालयाची हिमशिखरं न्याहाळली. अंदमानच्या समुद्रात यथेच्छ पोहोलो. मठांमधून, धर्मशाळांतून वस्ती केली आणि महालात मेजवान्या झोडल्या. अरण्यवास घडला. तिथे पक्षी मित्र झाले. प्राणी सखेसोबती झाले. त्यांच्यामागून दूरवर पायपीट केली. अनुभवनधन अनायासे कनवटीला लागलं. त्याची कीर्द मी कटाक्षाने नोंदवून ठेवली नि मठीत परतलो तेव्हा त्या हकिगती झिलईकाम न करता लिहून काढल्या. ती एक शिस्तच मला लावली. प्रत्यक्ष अनुभव मुद्दाम घ्यायचा. नि त्याचा भावानुभव, गळा न काढता नि अवसान न आणता शब्दबद्ध करायचा.

स्वतःच्या ढंगाने आणि रमतगमत असं मी खूप लिहिलं. त्याचे चौदा संग्रह प्रसिद्ध झाले. पारितोषिकं वेळोवेळी मिळत गेली. त्याहीपेक्षा, नियतीने कृपाळू होऊन बहाल केलेली जी जणू अनमोल पारितोषिकंच आहेत असं वाटावं, असे अनाहूत प्रियजनही मला लेखनामुळेच मिळाले. ह्यात मला माझा गौरव झाल्या-सारखं वाटतं.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि पर्ल बक ह्यांची सर्व प्रकारच्या सुखदुःखांनी भरलेली आयुष्यं मला सर्व बाजूंनी आकर्षित करतात. मूलतः ते दोघेही साहित्य-सेवक महामना होते. आणि दोघंही आपापली आयुष्यं न कुरकुरता चवीने जगले. आपले जन्म त्यांनी लेखनकार्यात घालवले. दोघांनाही साहित्यबाह्य अनेक मोह होते आणि त्यांनी ते मनःपूत भोगून घेतले. कुणाचंही अनहित केलं नाही. उलट, सकलांचा सांभाळ पोटतिडिकेने केला. सर्वांवर छत्र धरलं. पर्ल बकची थोरवी तर अपूर्व आहे. ती साक्षात दयेची देवता होती. शंभरीजवळ सरकलेल्या मिशनरी आईवडिलांचा तिने आत्मीयतेने सांभाळ केला. त्या दोघांचीही उत्कट चरित्रं लिहिली. त्यांचे पांग फेडले. लेक अपंग निघाली. तिची निगा तर तिने

ठेवलीच, शिवाय इतर अपंग मुलांना दत्तक घेऊन घरात त्यांचंही पालनपोषण केलं. अनेक अनाथ बालकांना परदेशातून उचलून अमेरिकेत आणलं आणि त्यांना दत्तक अमेरिकन आईबाप मिळवून दिले. दोन लग्नं केली. पहिला नवरा सोडून गेला. दुसरा अपंग होऊन असाध्य व्याधीने मेला, पण म्हणून ती कोमेजली नाही. तिचं स्वतंत्र आयुष्य ती अलिप्तपणे आणि रसिकतेनं जगलीच. सगळी सुखं तिने भोगली. जगप्रवास केला. अमेरिकेत टीकाकारांकडून तिची घोर उपेक्षा झाली. तरीही समीक्षकांकडे पाठ फिरवून तिने सातत्याने लिहिलं. जाता जाता तिने नोबेल पारितोषिकही पटकावलं ! पण गर्व तिला कधी शिवला नाही. ती आजन्म फुलं वाटणारी प्रेमिकाच राहिली. दया हा तिचा धर्म होता. असं भव्योदात्त उदाहरण दृष्टीसमोर असल्यामुळे माझा हात पुढच्या लेखनाकडे आपसुक वळतो. इथून पुढे मी लेखनवाचन आणि प्रवास भरपूर करणार नि सर्वांचा सांभाळ करीत, प्रेमळ शब्दांची नि दिलासादायक अनुभवांची निःसंकोच देवाणघेवाण करीत आनंदात आयुष्य भोगणार. अन्य दिशा नाही.

□

मासळीभात आणि सोलकढी : एक सारस्वती कौतुक

मासळीभात आणि सोलकढीचं संथ, शांत जेवण ही सारस्वतांच्या जीवनातल्या परमसुखाच्या अध्यायाची पहिली ओळ असते. निव्वळ मासेखाऊ माणसं पोत्यांनी असतील. सारस्वतांचं त्यात खास वेगळेपण आहे. मासे खाणं ही त्यांची नुसती चैन नाही, ती जवळपास धर्माज्ञा आहे. माळ घातलेली भिंतीवरली मंगेश-शांता-दुर्गेची नजरानजर करणारी तसवीर, घरात सोलांचा नि नारळांचा साठा, घराशी जिवलगपणाने बांधलेली कोळीण आणि गप्पांच्या किनाऱ्या-किनाऱ्याने सर्वांची ऐशीतैशी करीत चालणारी अतिसंथ भोजनपंगत, ही सारस्वतीय कौटुंबिक जीवनाची धर्मचौकट आहे. मासळी हा त्यातला प्राण. सारस्वतांच्या राज्यात मासळीला पर्याय नाही.

ह्या अफाट दुनियेत सप्तसागर आहेत. सरोवरं, तळी आहेत. नद्यानाले आहेत. विहिरी आहेत. झरे आहेत. दलदली आणि खारटाणं आहेत. ह्या सर्वांमध्ये अपरंपार मत्स्यधनाची बेगमी त्या जबरदस्त आदिम इच्छाशक्तीनेच झालेली आहे. मुदलात मोठं थोरलं शून्य होतं. आदिअंत काही नव्हता. नुसती पोकळी. आस्ते आस्ते मग पृथ्वीगोल जन्मला. पाणी खेळलं. हवा खेळली. शेवाळ अंकुरलं. मग जीव सळसळले. मागोमाग मासे आले. गेली लक्षावधी वर्षं ते इथे वंशवेल वाढवीत आहेत. शंभर टनी अजस्र देवमाशापासून थेट नखाएवढ्या मोत्याळ मासळीपर्यंत अनंत चित्रविचित्र प्रकार पाण्यामध्ये जिवंत आहेत. घर तिथे वासा नि पाणी तिथे मासा, असा सृष्टीचा कायदा. माणसाच्या चवबुद्धीला सृष्टीनं बहाल केलेला तो रत्नखचित नजराणा आहे. निसर्गाची ती

खूण सारस्वतांच्या ठीक लक्षात आली. त्यांनी तो थोर भोग मनमुराद आस्वादायचा कौटुंबिक चंग बांधला. आज ते सुखी आहेत.

मत्स्यगंगा अशी दारातून धो-धो वाहत असतानासुद्धा काही मंडळी त्या पावन प्रसादाकडे पाठ वळवून का बसली आहेत, हे कोडं अजब आहे! त्याची उकल माझ्यापाशी नाही. अर्थात मासे न खाणाऱ्याला दुरुस्त करणं हे माझं अवतारकृत्य नक्कीच नसल्यामुळे, फार फार तर मी इतकीच प्रार्थना करीन की हे करुणाकरा, मुडदुशांची आमटी, तळलेल्या कालवांची चटणी नि तिसऱ्यांचं झणझणीत सुकं, अशा वर्विष्णु चवीच्या मौलिक मालमसाल्याकडे मुकटा नेसून उपेक्षावृत्तीने पाहणाऱ्या तुझ्या त्या सोवळ्या नि रुक्ष लेकरांना तू विपुल क्षमा कर; कारण आपण कोणत्या अभिजात सुखाला अकारण पारखे होत आहोत, हे त्यांना कळलेलंच नाही. अरे, एका सुंदर तंद्रीत मासे मटकावणं हा केवळ सारस्वतांचा नव्हे तर मूळ माणसाचाच जन्मसिद्ध हक्क आहे; आणि तो ह्या भूमीवर यावच्चंद्रदिवाकरौ अबाधित राहणार. तव्येतीने मासे खाण्याच्या आनंदाला पर्याय नाही, आणि मत्स्यभक्तीच्या प्रश्नावर तडजोड संभवत नाही.

मासे खावेत तर अट्टल सारस्वतांसारखे आणि सारस्वतांच्याच जिंदादिल पंगतीला. मी त्यातलाच भिडू. म्हणून छातीठोकपणे सांगतो, माशांच्या सारस्वती स्वयंपाकाला दुसऱ्या कशाचीही सर येणे नाही. ते त्रिभुवन अजिंक्य आहे. दिवस सुटीचा असावा. तो सोमवार किंवा गुरुवार मात्र नसावा. मागे कसलाच तगादा नसावा. उन्हं हळूहळू चढू लागावीत. दारात कोळीण यावी. थोडीशी अटळ पण जिव्हाळ्याची हुज्जत घालून तिच्याकडून पाच-सहा बांगडे, ओंजळभर कोलंबी, आणि त्याच्या दुप्पट तिसऱ्या किंवा तारल्या घ्याव्यात. त्या घरात स्वाधीन करायच्या. नारळ भरपूर आहेत ना, त्याची घरात डोकावून एकवार खात्री करून घ्यायची. अर्थात, ते नाहीत हे संभवतच नाही. जशी, हवा नसलेली पोकळी दुनियेत अस्तित्वात नाही; त्याचप्रमाणे किमान दोन नारळ बेगमीत नसलेलं सारस्वती सैपाकघर असू शकत नाही. पैकी एक नारळ शांतादुर्गेला लागतो, दुसरा हुमण-सोलकढीचा आद्य मानकरी. कांदे, लसूण, तिरफळं, सोलं वगैरेंची पंचाईत बायकांकडे सोपवायची. त्या लफड्यात आपण सुतराम अडकायचं नाही. त्यांचं त्या जाणोत. खूप उशीरा आंघोळ आटपायची. गावगप्पा करायच्या. त्यासुद्धा गोटातल्यांबरोबरच राजकारणाची नि त्याहीपेक्षा

राजकारणवाल्यांची ऐशीतैशी करायची. त्यांना दोन कोकणी शिव्या हासडायच्या. काळज्या विसरायच्या. देवाला नमस्कार करायचा. हे होईपर्यंत एक वाजतोच. आतून वर्दी येते. मग पानापाशी बसायचं नि प्रथम तळलेल्या तुकडीचा वास आतआत ओढून घ्यायचा. नंतर गरमागरम भाताच्या वाफांवर फुंकरी मारायच्या नि त्याच्यावर माशांचं लालभडक कालवण ओतून घ्यायचं. भिंतीवरल्या वरद् मंगेश-शांतादुर्गेच्या फोटोकडे एकदा नेत्र जुळवायचे. कारण त्यांच्याच कृपेने हे अन्नब्रह्म सामोरी आलेलं असतं. आणि मग गावाकडच्या आठवणी काढीत संथपणे जेवायचं. जेवताना यथेच्छ गप्पा मारायच्या. हात वाळतील ? वाळू देत. सोलकढीचा एक भुरका मारला की ते पुनश्च ओले होतील. भातामागून भात घ्यायचा. त्याला तिसऱ्यांचं झणझणीत सुकं चवीपुरतं लावायचं, नि तो किंचित सुका भात प्रसन्न चित्ताने खायचा. बायका आग्रहाने वाट्या भरतातच. आपण तोंडाने नको-नको म्हणायचं. पण रेटायचं. सुरमई, बांगडा, पापलेट, वगैरे मासे गर भरपूर देतात. ते असतील तर गराचे तुकडे अलग अलग खायचे. मांजाळी तळलेली असेल तर बिनदिक्कत आख्खीच्या आख्खी काट्यासकट खायची. असं आहे हे साग्रसंगीत सारस्वती जेवणाचं मधुर अर्धपुराण.

मागल्या भातापासून रसाळ उत्तरार्ध सुरू होतो. सोलकढीची लज्जत अपूर्व आहे. मात्र पथ्य एक पाळायचं. सोलकढी डुमणात मिसळून, किंवा सांबार सोलकढीत ढवळून, ते मिश्रण ओरपायचं नाही. भात आणि सोलकढी, फक्त एवढाच प्रपंच करायचा. ते समीकरण मिष्ट आहे. अगदी पोटभर सोलकढी-भात खायचा. ढेकर आला तरच हात आवरायचा. एरव्ही नाही. उठायच्या अगोदर निदान वाटीभर तरी सोलकढी प्यायचीच. भटजीलोक आळवाच्या भाजीचे मारतात, तसे भुरक्यामागून भुरके चक्क आडव्या हाताने मारायचे. नंतर पोटोबावरून हात फिरवीत, उठण्याचा प्रारंभिक विचार करायचा. किंचितकाळ आग्रहाची वाट बघायची. आग्रह झालाच तर महामार्गावरला सोलकढीचा शेवटचा घोट घ्यायचा. आग्रह न झाला तरीही घरच्यांच्या-विषयीच्या कृतज्ञताबुद्धीने तो घ्यायचा, हाताला लागलेला लसणीचा, फोडणीचा नि सोलांच्या अर्काचा संमिश्र वास हुंगून तृप्त व्हायचं. ह्या एकूण सकलसुंदर कृतीलाच 'सारस्वती भोजनसमाधी' असं म्हणतात. त्या समाधीतून हळूहळू उतरायचं असतं. पाठच्यासाठी काही उरलंय की नाही त्याची जीवलग-

पणे चौकशी करायची, 'उशीर झालाय–लवकर जेवून घ्या' म्हणायचं. सैंपाक नावाजायचा. ते शिफारसपत्र खरडून झालं की उठायचं.

सगळीच रत्नं तेजस्वी असतात, तसे सगळेच मासे अंगचेच चवदार असतात. पापलेट तेवढं मारू नि मांजाळी फालतू, असं डावंउजवं मासळीत नाही. कुरकुरीत भाजला तर हरएक मासा मोठा चवदार लागतो. अर्थात, थोडीशी प्रतवारी नाही म्हटलं तरी असतेच. रावसाचं सांबार जसं झणझणीत होईल, तेवढं लज्जतदार भिंगीचं होणार नाही. ढोम्याचं तर अजिबातच होणार नाही. तरी सुद्धा एका स्तरावर कार्लीचं असो, बांगड्याचं असो, अगर बोंबलाचं असो, सुकं अप्रतिमच होणार. खोबरं, लसूण नि मिरच्या मात्र भरपूर हव्यात. डहाणू-उंबरगावपासून थेट कारवारपर्यंत समुद्र मोकळामोकळा आहे नि त्यात लागेल तेवढी चविष्ट मासळी खच्चून भरलेली आहे. तरीसुद्धा प्रत्येक बंदराचा नि किनाऱ्याचा म्हणून काही खासा ऐवज आहे. त्या बंदराचा तोच अलंकार.

पापलेट हे सातपाटीचं चंदेरी धन. सातपाटीच्या बंदरात पापलेटांनी जड झालेले यांत्रिक पडाव सदानकदा नुसती गर्दी करून असतात. खुद्द बंदर मुम्बईचे ओले बोंबिल उत्तम, स्वच्छ आणि जाडजूड. टोळयाही छान. अलिबागेची बोयटं जरूर खावीत. मुरुड-जंजिऱ्याचे सोडे नि खारवलेले मासे. जैतापुरी कालवं म्हणजे साक्षात हिरेमाणकं आहेत. तिथे खाडीत खडक भरपूर. त्या खडकात कालवं घरं बांधतात. माझ्या लहानपणी जैतापुरी कालवांच्या दगडांच्या गोणी घरात येऊन पडायच्या! जांभ्या रंगाचे दगड. त्यांना डसलेली कालवांची कडक कपच्यांची घरं. अणुकुचीदार कोयतीने ते दगड मागीलदारी साफ करणं हा गडीमाणसांचा तेव्हा एक उद्योगच असे. सध्या बाजारात पावट्याएवढाली शिळपट कालवं अधूनमधून दिसतात. जैतापुरी टपोरी, ताजी कालवं खाल्लेला माणूस त्या निस्तेज जिवांना कालवं कदापिही लेखणार नाही. विजयदुर्गाची खाडी हा पृथ्वीवरला महान चमत्कार आहे. अमुक एक मासा विजयदुर्गाच्या खाडीत नाही, असं नाहीच. मुडदुशा, रावस, काळबोंडी, तांबोशी, खजुरी, बोयटं ह्यांची गडाच्या परिसरात नुसती रेलचेल आहे. त्यातला खास मासा म्हणजे काळबोंडी. हे काळ्या चकचकीत अंगाचं, चरबीनं थबथबलेलं एक प्रकारचं पापलेटच आहे. तोच आकार. तेच वजन, चव अधिक उजवी. आज माझं मलाच खरं वाटत नाही, की कोणे एके काळी मोठ्या दुधीभोपळ्यापेक्षाही मोठे आणि अधिक जड, ताजे, फडफडीत

रावस पाठीवरून वाहून मी विजयदुर्गाच्या खाडीतून उपळ्याच्या आमच्या आवाटात आणलेले आहेत. मालवणपासून थेट कारवारपर्यंत बांगड्यांचं अधिराज्य आहे. तसंच कोलंबीचंही. आंगठ्यासारखे जाडजूड नि एकाच अंगलटीचे कोलंबीचे काटे बघावेत तर मालवणच्या पुळणीवर. त्यांचा नुसता खच तिथे पडलेला असतो. पण खुद्द मालवणकरांना त्यातल्या दोन कोलंब्या मिळायला कबूल नाहीत ! कोलंब्या नि बांगडे तिथल्या तिथे पेटीबंद होतात नि कारखान्याकडे ते धन हातोहात रवाना होते. शेंगटे पंचतारांकित हॉटेलांच्या दिशेने निघून जातात. तुम्ही नुसता तो खजिना तोंडं उघडी टाकून पाहायचा ! वेंगुर्ल्याच्या मुडदुशा केवळ अप्रतिम. तेरेखोलची खाडी ओलांडून पलीकडे सरकलं की लट्ठ सुरमईंचा लत्ता सुरू होतो. गोव्याच्या सगळ्या किनारपट्टीवर लट्ठ सुरमईंचा नुसता धुडगूस आहे. कारवारच्या तारल्या नि मोरी. त्यातल्या त्यात कारवारी मोरी अजोड; तारल्या अमाप नि ऐन मोसमात बांगड्यांचा तिथे हिशोबच नाही. आणि सुंगटं तर तिथे बारा महिने तेरा काळ तेजीत असतात.

मासळीचं असं किनारानिहाय वर्गीकरण करणं ठीक नाही. कारण कान्टा आणि सोनेरी मांजाळी जशी किहीमला अमाप मिळते, तशी हर्णैलाही मिळते. बोयटं डहाणूलाही मिळतात नि दाभोळलाही मिळतात. कर्ली प्रायः सर्वत्रच मिळते आणि भगवती बंदरात कोलंबीची फारच मोठी उलाढाल होते. आणि जिथे ओलसर खडक आहेत तिथं चिंबोऱ्या आहेतच. हो ! चिंबोऱ्या, तिसऱ्या, कोलंबी आणि तारल्या ही समस्त कोकणपुत्रांसाठी सृष्टीची अपरंपार धन आहे. उभ्या कोकणात अशी पुळण नाही, अशी खाडी नाही, असं बंदर नाही, की जिथं कुर्ल्या, तारली, नि तिसऱ्या नाहीत. एरव्ही गरीब कोकण्ये जगणार कशावर ? शिवाय वाम, वाघे, ढोमे वगैरे ऐवजाला सणसणीत; पण चवीला जरा उतार, असेही मासे निसर्गाने सर्व किनाऱ्यांवर पेरून ठेवलेले आहेत. टोकेरी सोंडेच्या टोळ्यांचाही खजिना अरबी सागरात लपलेला आहेच.

कुठलीही जात श्रेष्ठ नाही, की कुठली कनिष्ठ. सगळ्यांच्यात काही अव्वल भाग आहेच. या सगळ्या जाती-जमातींच्या माशांचे खाद्यपदार्थ करण्याच्या रिती मोठ्या रुचकर नि एकमेकांहून भिन्न आहेत. त्यांची-त्यांची म्हणून ती ऐट आहे. गोवेकरांचं खोबऱ्याचं वाटपकुटप घालून केलेलं सुरमईचं, म्हणजेच 'इखनाचं हुमण' हा सर्वांत टॉप पदार्थ आहे. ती धड आमटी नाही. ते सुकंही नव्हे. तर त्या दोहोंचा तो सुवर्णमध्य आहे. गोवेकर सारस्वताकडे

जाल नि हुमण चापून याल, तर मी तुम्हाला मोक्षसुखाचा मार्ग दाखवला म्हणून माझे परत परत उतराई व्हाल. गोव्यातले इतरही जन तसाच मिष्ट स्वयंपाक करत असतील. वादच नाही. फक्त, मी ती त्यांच्याकडची चव चाखलेली नाही, एवढंच. बांगड्यांचं तिरफळयुक्त सुकं खायचं असेल तर मालवणापासून कारवारपर्यंत हिंडलं पाहिजे. कायस्थांकडे खायची तर सोड्यांची फ्लॉवर-बटाटे घालून केलेली टेसदार भाजी. कायस्थांना गोडं वरण सोडून बाकी सर्वांत सोडे लागतात. त्यांची सोड्यांची तिखट खिचडी हा खास नमुना असतो. तिसऱ्यांची तिखट आमटी खावी भंडारी मंडळींची. मटणाच्या वर त्याची चव असते. मोरीचं मटण नि तारल्यांचं सुकं खावं कारवाऱ्यांकडेच. कांदे घालून केलेलं पापलेटचं भुजणं हा मुंबईकर-पाठारे परभांचा अगदी घरंदाज प्रकार आहे. तसाच त्यांचा दिवाळीतला भरला-सरंगा. त्याच्या खादाच्या नुसत्या आठवणीने तोंडाला पाणी सुटतं. विरारपासून पालघरपर्यंतचे कोळी मोठं चमचमीत पापलेटचं सुकं करतात म्हणे. सुरमईची किंवा पापलेटची नारळ घातलेली सुकी कोशिंबीर समस्त वाडकर मंडळी लाजवाब करतात. खुद्द आम्हां पिंगे मंडळींची स्पेशालिटी : तिसऱ्याचं झणझणीत सुकं किंवा कुल्यांची गरम मसाल्याची आटीव आमटी आणि वर सोलकढीचा मारा.

मी सगळा भारत पुन्हा पुन्हा पायाखाली घातलेला आहे. प्रायः सगळ्या नद्या परत परत ओलांडून नि पोहूनही झाल्या. कच्छच्या आखातापासून कोरोमांडेलच्या किनाऱ्यापर्यंत. नि तिथून परत अंदमान बेटांच्यासकट बंगालच्या उपसागरापर्यंत सर्व सागरपट्ट्या यथेच्छ तुडवून झाल्या. सर्व ठळक बंदरांतून प्रवासी मुक्काम केले. या सर्व ठिकाणी मी रगड मासळी खाल्लेली आहे. मंगलोरला खाल्ली, त्रिवांद्रमला खाल्ली, पोर्ट ब्लेअरला खाल्ली, मद्रासेत खाल्ली, गोहत्तीला नि दिब्रुगडला खाल्ली, कलकत्त्यातही खाल्ली. पार पलीकडे सरहद्दीपर्यंत पायपीट करून पद्मेतलेही मासे खाल्ले. पण कोकण किनाऱ्या-वरल्या माशांची सर कुठल्याच मासळीला आली नाही. बंगालमधली असो, आसामधली असो, की पंजाबमधली असो, गोड्या पाण्याची मासळी फारच मिच-मिचीत लागते. तिला अंगची खारटाण नाही. केरळमध्ये खाऱ्या पाण्यातलीच मच्छी मिळते. पण नारळांचा तिथे सुकाळ असूनही करणं चवदार नाही. माशांची मजा लुटायची असेल तर पालघर ते गोकर्ण हाच टापू निवडायला हवा. नि त्यातल्या त्यात जैतापूर ते कारवार ही किनारपट्टी म्हणजे मासळीच्या बाबतीत

सुवर्णभूमीच आहे. मात्र, तुमच्या मासळीच्या जेवणाची व्यवस्था घरगुती पातळीवर झाली तर उत्तम. नपेक्षा, मंगेशीच्या देवस्थानाच्या शेजारी आहे तशा घरगुती पातळीवरल्या धरवाडकरांच्या, खाणावळीसारखी तरी झाली पाहिजे. एरव्ही, कोकणी खाणावळी सध्या उजाडपणे तेजोहीन धंदा करीत आहेत.

सध्या मात्र दिवसच फिरले आहेत. स्वच्छ, ताजी, तजेलदार मासळी दिसायला कबूल नाही. मुंबई बंदरातल्या बोयटासारख्या सुरेख मासळीला धासलेटचा भपकारा मारायला लागला आहे. पंचावन्न सालापर्यंत मी एक बंदा रुपया नि पिशवी घेऊन भल्या सकाळी गिरगाव चौपाटीवर जात असे. शिडं आवरून होड्या परतत. होडीवरल्या प्रत्येक नाखव्याला त्याचा मासळीचा वाटा मोफत मिळे. मी एक रुपया दिला तर मेजवानी होईल इतके मासे दर्या-वरून परतलेले वाटेकरी संतोषाने देत. आता दहा रुपयांची नोट दिली तरी मासळी मिळायला कबूल नाही. आजकाल उत्तम कोलंबी अमेरिकेला जाते. टरफलं नि पोकळ टकल्या आम्हाला इथे चढ्या भावाने मिळतात. तशात, किमान पाच रुपये नसतील तर मासळी बाजारात चक्कर टाकण्याला काही अर्थच नाही. त्यातल्या त्यात समाधान इतकंच की आमच्या सदासंतुष्ट आया-बायांच्या हातात, पिढ्यान् पिढ्या चालत आलेलं मासळीचं सारखती पाक-कौशल्य सलामत राहिलेलं आहे !

अटळ असलेली महिनाअखेर शेवटी मला गाठतेच. माझ्यापाशी जेमतेम पाच रुपये शिल्लक असतात. दोन प्रदीर्घ दिवस जायचे बाकी असतात. मी निर्धार करतो, मासे आणायचेच नाहीत. आळूच्या जुडीवर नाही तर शेकटांच्या शेंगांवर भागवून न्यायचं. पण नाही; कृतसंकल्प डोळ्यांदेखत ढासळून पडतो. मी पिशवी घेतो. पाच रुपये घेतो. बाजारात चक्कर मारतो. कधी कोलंबी घेतो. कधी तिसऱ्या. ही पुरचुंडी कशी काय पुरणार, ही विवंचना करीत घरी परततो. पण मासळीची पिशवी हजर झाली की घरी दिवाळी उगवते. आनंदीआनंद होतो. सगळा तापत्रय विसरून बायको थेट स्वयंपाकाला लागते. लेक नारळ किसायला घेते. मी हातपाय धुऊन पुस्तक उघडून बसतो. ते एक नाटकच ठरतं. माझं अवघं लक्ष घरभर उधळलेल्या मासळीच्या मसालेदार वासात अडकलेलं. अंमळशाने पुकारा होतो, " ताटं घेतल्यायत. लवकर उठा."

परम सुखाच्या अध्यायाची ती पहिली ओळ असते.

□

आकाशवाणीपर्व

वाटतं, अखेर प्रत्येक गोष्ट ही तुमच्या लल्लाटीच लिहिलेली असावी लागते. तरच ती जयकारक होते. प्रयत्नान्ती आणि कुशल व्यूहरचनेने तुम्ही यशाच्या फाटकापर्यंत धडक मारू शकता. त्या यशाच्या पलीकडे 'जय' आहे. तो पल्ला नियतीच्या अनुग्रहाविना गाठणं मुश्किल आहे आणि नियतीचं रुमझुम तर बिलकूल अनाकलनीय आहे. एखादी घटना तशीच, तिथेच नि नेमक्या त्याच वेळी का घडली, ह्याला अचूक उत्तर नाही. 'योगायोग' असं म्हणून आपण ते पान पालटू शकतो. नियती ही अमूर्त, बलवत्तर शक्ती आणि योगायोग हे तिचं रूप. त्या दोघींचा वावर नाही कुठे?

मुदलात मी राज्यशासनात कारभारी होतो. पगार छान होता. महागाईचा कल्लोळ नव्हता. मुख्य म्हणजे मी फडफडीत, सडाफटींग तरुण होतो. लांबरुंद पसरलेल्या समीपच्या भविष्यकाळाची प्रभा चित्ताला भुलवीत होती. 'मौज', 'साधना', 'वीणा' मध्ये मी हौसेपोटी लिहीत होतो. आकाशवाणीचं नाट्यलेखनातलं एक ठळक पारितोषिक जाता जाता उचलल्यामुळे आकाशवाणीवर माझी नाटकं आणि गाणी सतत वाजत. पु. शि. रेगे, श्री. पु. भागवत, चित्रकार शंकर पळशीकर, नानासाहेब गोरे वगैरे तोलदार असामींबरोबर माझी उठबस होती. साहित्य-संस्कृती मंडळाचा मी पाळणा हलवलेला होता. फर्ड्या आय. सी. एस. अधिकाऱ्यांची माझ्यावर मर्जी होती. आणि हे सारं तिशी ओलांडताना घडत होतं. कशास काही कमी नव्हतं. घरीदारी खुषी होती.

मलाही गाण्याबजावण्याची ओढ होती. देवधरमास्तरांच्या वर्गात मी तबल्याचे हात शिकत होतो. खुद्द पं. मधुकरराव पेडणेकरांनी मला त्यांच्या अक्षरात रागांची नोटेशन्स लिहून दिलेली होती. गोपाळकृष्ण भोबेंच्या बरोबर

सांजसकाळ गायनाविषयी गप्पा व्हायच्या. शिरगावकर इंजिनियरांच्या दिवाणखान्यात उस्ताद अछुदियाखांसाहेब, शिरगावकरांच्या लेकीला भारदस्त तालीम द्यायचे, ती मी कधीकधी ऐकत असे. आणि जरुख म्हातारपणाच्या दोनपावलं अलिकडे असलेल्या त्या तेव्हाच्या महान बालगंधर्वांची बैठक ऐकून मी एकदा अद्‌भुत आनंदाचा धनी झालेला होतो. सुरेशबाबू मान्यांचं रेशमी गाणं ऐकून मी धन्य होई. जोत्स्ना भोळे केवळ माझ्याच नव्हे, तर आम्हा सर्व लट्टू सवंगड्यांच्या हृदयाच्या साक्षात कलिजा होत्या. मात्र मी प्रत्यक्षात रेडिओपासून मैलोन् मैल दूर होतो.

वाटायचं, ह्या रेडिओस्टारांचं नि आपलं गोत्र खऱ्याखुऱ्या अर्थाने केव्हा जुळणार? त्या गुणीजनांचं नि आपलं हस्तांदोलन केव्हा होणार? अर्थात त्याही काळात मी आकाशवाणीचा लेखक होतोच. तिथे माझं काही ना काही किडूकमिडूक सदाचंच चाललेलं असायचं. पण तिथे पटावर असणाऱ्या कलावंतांशी साक्षात संबंध नव्हते. अंतरावरून तळं पाहावं तसा प्रकार होता.

एकदा कामधाम आटोपून उशिरा घरी परतत असताना मरीन लाईन्सच्या रस्त्याच्या कडेच्या आकाशवाणी स्टुडिओकडे रेल्वेतून पाहून मला फार वाटलं, आपण साहेबलोकांच्या सचिवालयात कशाला आहोत? आपण इथं आकाशवाणीवर कलाकारांबरोबर काम केलं पाहिजे! सर्व पाश तोडून एका नव्या पर्वाचा स्वच्छंद शुभारंभ केला पाहिजे. सडे आहोत तोपर्यंत मुसंडी मारून घेतली पाहिजे. अरे, आपल्याला ना आग्या ना पिच्छा!

असं आतून कुठून तरी वाटलं आणि आठा दिसांनी वर्तमानपत्रात जाहिरात फडफडली : आकाशवाणीला सहाय्यक सादरकर्ता हवा आहे!

राज्यशासनात मला मिळत होता त्या मानाने पगार खूपच कमी होता. हुद्दा मात्र मोठा होता. आकर्षक होता. मांडीखाली सत्ता ठेवता येण्यासारखी होती. आर्थिक अधिकार होते, तसंच सांस्कृतिक क्षेत्र मोकळं होतं. मनात आणलं तर दुसऱ्याची कळी खुलविता येण्याची क्षमता त्या पदावरल्या अंमलदाराच्या हातात राहणार होती. मुख्य म्हणजे ह्या ना त्या निमित्तानं पदाधिकाऱ्याच्या नांबाची घोषणा सतत होणार होती. हे मोठंच आमिष होतं. शिवाय तारुण्यसुलभ इतर प्रलोभनंही लुकलुकत होती, आणि मी तर नीतिग्रस्त कधीच नव्हतो नि नाही. तेव्हा मागचापुढचा नि पगारातल्या तफावतीचा पळभरही विचार न करता मी राज्यशासनाच्या भपकेबाज नोकरीचा तडकाफडकी राजीनामा

खरडला नि तांत्रिक अडचणी पार करीत, जवळचा मुहूर्त पाहून आकाशवाणीची खुर्ची पकडली. फक्त शंकर वैद्यांचा मित्र म्हणून सल्ला घेतला. ते म्हणाले, "अवश्य जा रवी. लेका, तिकडे रुजू झालास की तुझी जात बदलेल!" त्यांची बत्तीशी खरी ठरली. आकाशवाणीवर निव्वळ योगायोगाने गेल्या गेल्या बढती मिळून पुढे मी वीस वर्षं मुंबई नभोवाणीच्या मराठी वाङ्मयशाखेचा सादरकर्ता म्हणून उदार मनानं काम केलं. कवि कुमुदबांधव ऊर्फ ज्योतिषी स. आ. शुक्ल यांनी काढून दिलेल्या एका शुभमुहूर्तावर मी आकाशवाणीत डेरेदाखल झालो. सचित्रालयाचं शांत बंदर मागे मागे टाकून माझं जहाज नव्या दर्यात पुढे पुढे सरकायला लागलं.

पासष्ट साली आकाशवाणीवर पदार्पण केलं त्यावेळी तिथं नामवंत गुणी कलाकारांचं आनंदसाम्राज्य नांदत होतं. मो. ग. रांगणेकर, व्ही. जी. जोग, राजा बढे, गजाननराव जोशी, विनायकराव आठवले, वा. रा. कांत, मंगेश पाडगावकर, यशवंत देव, श्रीनिवास खळे, लीलावती भागवत, बाळ कुडतरकर, नीलम प्रभू, प्रभा अत्रे अशा पगारी कलावंतांचा ताफा तिथे झुलत होता. त्यामुळे माझी उमेद वाढली. पं. नारायणराव व्यास, खांसाहेब तिरखवां, कुमार गंधर्व, किशोरी आमोणकर, जितेंद्र अभिषेकी, पु. ल. देशपांडे, नानासाहेब फाटक, केशवराव दाते, सतीश दुभाषी अशा थोरांची त्यावेळी आकाशवाणीवर सहज ये-जा असे. कलेवरली त्यांची हुकमतही मी पाहिली नि अगदी जवळून त्यांच्याशी खाजगी गप्पाही मारल्या. आकाशवाणीच्या चाकोरीप्रमाणे कार्यक्रमाचं तिमाही वेळापत्रक तयार करणं; नवे लेखक, कवी, कलाकार हुडकून काढणं; त्यांची तालीम घेणं, लेखन सुधारणं, करारपत्र करणं आणि अखेरीस ध्वनिमुद्रण निस्तरून कलाकाराच्या हातात धनादेश देणं ही कामं मी सफाईनं करू लागलो. ह्या शास्त्रातला खाल्याचा दिल्लीचा एक खास अभ्यासक्रमही मी पुरा केला.

पुन्हा सुंदर योगायोग असा की माझा जवळचा, 'अरे-तुरे 'तला मित्र कवि मंगेश पाडगावकर हा मला सहकारी म्हणून आकाशवाणीवर सलामीलाच लाभला. त्याचं खातं वेगळं होतं. माझं अलग होतं. तथापि, काम नसेल तेव्हा आम्ही दोघे यथेच्छ वाङ्मयीन गप्पा मारायचो. पाडगावकरचं एक बरं आहे, त्याला गप्पांना विषय लागत नाहीत नि त्याच्या जिभेवर साक्षात् सरस्वतीची वस्ती आहे. तो नेहमी चकाचक साहेबी वेषात असायचा. टाय लावायचा.

राजस चेहेऱ्यावर पावडरही मारायचा. बूट चकचकीत असत. त्याच्या चेहऱ्यावर मूळचाच रुबाब आहे आणि दुसऱ्याला किती अंतरावर उभं ठेवायचं हे त्याला आतूनच कळतं. फालतू कवि-कवयित्रींची त्याच्या केबिनीत प्रवेश करण्याची हिंमत नसे. ते सगळे आळूपाळू भिडू माझ्या खोलीत मला वेढा घालून सांकडं घालायचे ! एकदा एका महाविद्यालयाच्या वरिष्ठ प्राध्यापकांना आकाशवाणीवरून एक भाषण करायची इच्छा झाली. त्यात काहीच वावगं नव्हतं. ते आले. पाडगावकरला भेटले. फालतू हितगुज केलं. नंतर पाडगावकरला त्यांनी मानपान करून लंचलाही नेलं. मात्र, मूळ मुद्द्याची गोष्ट बोलण्याची त्यांना हिंमत झाली नाही. खाणंपिणं साग्रसंगीत झाल्यावर ते प्राध्यापक माझ्याकडे आले नि म्हणाले, " पाडगावकरांचे डोळे काय आहेत हो ! त्यांच्याकडे काही मागण्याची हिंमतच होत नाही ! "

त्यावेळी पाडगावकरच्या काव्यलतेला नुसता घमघमाटी बहर आला होता. ज्याच्या त्याच्या तोंडी त्याची मार डाला भावगीतं असत. यशवंत देव आणि श्रीनिवास खळे तेव्हा ऐन उमेदीत होते. त्यांनाही उज्ज्वल भविष्यकाल खुणावीत होता. पाडगावकरनं गाणं लिहिलं रे लिहिलं की ते उचललं जाई. सर्वोत्तम गायिकेची निवड केली जाई. निर्दोष ध्वनिमुद्रण होई. त्यावेळी दूरदर्शन आसमंतातच नव्हतं. त्यामुळे माणसं हमखास रेडिओच लावीत नि त्यांच्या कानावर पाडगावकरची गाणी पडत. त्यामुळे सुसंस्कारित, सधन वर्गात पाडगावकरचं कौतुक बेफाम झालं नि ते त्याला सतत पावतही गेलं. तो स्टुडिओवर सकाळी किंचित् उशिरा येई. मग आमचा चहा होई. त्यानंतर तो कवितेची जाड बांधणीची वही काढी आणि आपल्या नव्या कवितेचं प्रभावी वाचन करी. त्याचा आवाज बुलंद. म्हणणं हावभाव करीत, आवेशानं. त्यामुळे आजुबाजूचे सहकारी गोळा होत. पाडगावकर फॉर्मात येई. तास केव्हा निघून गेला कळत नसे. सर्वजण टवटवीत होत.

पाडगावकर फारच पापभिरू होता. पैशांच्या व्यवहारात भारी दक्ष होता. आणि जबर महत्त्वाकांक्षी होता. मला सुनवायचा, " शुक्ल कवींनी माझं भविष्य वर्तवलंय. त्यांनी सांगितलंय की ' गावोगाव तुझे सत्कार होतील; तुझे पुतळे उभे राहातील ! ' " पैकी, पाडगावकरचे सत्कार खंडोगणती झाले हा इतिहासच आहे. उत्तरार्ध कसा नि केव्हा फळतो ते नंतर कळेल. त्याला बोरकर कवींबद्दल विलक्षण उमाळा होता. नेहमी म्हणे, " अरे, असं पहा, बोरकर कोण होते रे ?

साधे गोवेकरी शिक्षक ! परिस्थिती अतिसामान्य नि पोसायला हे ऽऽ मोठं कुटुंब. पण ईश्वरदत्त प्रतिभेच्या नि अस्सल कवितेच्या बळावर माणूस कुठे पोचला ? त्याने काय गोव्यातून सालाझाराचे वशिले आणलेवते ? अरे, त्यांची कविता हाच त्यांचा वशिला ! म्हणून कवीने सतत प्रसवीत राहिलं पाहिजे. नि सृजनाचा दर्जाही सांभाळला पाहिजे. लक्षात ठेव, साधनेला फळ हे येणारच. अर्थात् ते फळ मधुर व्हायला पुन्हा दैव अनुकूल हवंच हं. पण ते आपल्या स्वाधीनचं नाही. लेखन स्वाधीनचं आहे. तर, पिंग्या, तू माझं बऱ्या बोलानं ऐक. अरे, आपण निघालो रे कुठून ? मी शांतारामाच्या चाळीतून नि तू आत्मारामाच्या चाळीतून ! काय अवस्था होती आपली ? पण लेखन आपल्याला हात देईल, जर भान ठेवून ते नीट केलं तर. लेखकाने माणसांच्या मनाचा प्रवाह टिपला पाहिजे. त्या दृष्टीने तू चेकॉव्ह वाच. चेकॉव्हकडे एक अंगचंच शहाणपण नि अलिप्तपण आहे. नि तू तुझ्या लेखणीचा उपयोग, चांगलं लेखन करून त्या बळावर चांगले संबंध जोडण्याकडे कर. त्याला पैसे पडत नाहीत. आपलं लेखन उत्तम असल्याशी कारण. पिंगे, अरे, दैवानं तुला आकाशवाणीवर आणून केवढी मोठी संधी दिल्याय रे ! "

पाडगावकरकडे ज्योतिषाचं मोठं मजेशीर अंग होतं. शेकडो कुंडल्या त्याने जमा केल्या होत्या. सर्वांचीच भविष्यं तो फटाफट सांगे. माझी किती बहारदार नि त्यातली काही हलक्या आवाजात कानात सांगितली असतील, त्याची गणतीच नाही ! दर आठवड्याला नवं लखलखीत भविष्य ! मात्र अशा ह्या राजस पाडगावकरच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वात एक दोषांग होतं. त्याच्यापाशी दुसऱ्याला गुदमरून टाकणारा एक दर्प होता. एक दादागिरी होती. मला त्याचा उपसर्ग कधीही झाला नाही; पण कलावंतांचा एक वर्ग त्याच्यावर तेव्हा जळफळत असे. पण त्याच्याविरुद्ध कुणाचंच काही चालत नसे. तो सदान् कदा ऐटीत असे. त्या मिजाशीचे फायदे त्याला मिळाले. त्याचे तोटेही गुपचुपपणे त्याच्या पदरात पडले असतील. देवाला डोळे. मात्र, मंगेश वृत्तीनं सात्विक होता. पुढं तो राजीनामा देऊन अमेरिकन शासनाच्या भारतीय सेवेत गेला नि त्याचं रेडिओतलं संपूर्ण दफ्तर माझ्या गळ्यात आलं !

यशवंत देव अंतर्यामी दुःखी पण प्रतिभावंत होते. त्यांचं नवनवोन्मेषशालिनी स्फुरण साक्षात् चकित करणारं असे. मोजून पाच मिनिटात ते गीताला रेशमी चाल लावू शकत. त्या चालीचा पोत विलक्षण मुलायम असे. पुढ्यात

पेटी न घेताही ते थेट कागदावरच सरगम मांडून मोकळे होत. आम्ही एकाच वयाचे, एकाच विचाराचे, थोडेफार एकाच आचाराचेसुद्धा. ते साधक होते. अमूर्त अशा ईश्वरी संकेतांवर आमचा दोघांचाही बालंबाल विश्वास होता. आपण केवळ निमित्तापुरते. एक वेगळीच दिव्य शक्ती आपल्याकडून कामं करून तरी घेते किंवा कामं करू तरी देत नाही, अशी आमची दोघांचीही श्रद्धा होती. नवीन गायक, गायिका नि संगीतकार आकाशवाणीवर तासा-तासाला उगवत. सादरकर्ते असलेल्या देवांसमोर धरणं धरत. म्हणत, "मी अशी चाल लावली, तशी चाल लावली, ऑडियन्सनं डोक्यावर घेतली." देव अलिप्तपणे रामायण ऐकून घेत. गालातल्या गालात हसत. थातुरमातुर उत्तरं देत. शक्य ती मदत करीत. नंतर मला म्हणत, "चला, जरा चहा पिऊन ताजे होऊया. काय सांगतोय हा माणूस, मी असं केलं नि तसं केलं म्हणून. लेका, ईश्वरी संकेताविना वशीत ओतलेला चहा माणसाच्या ओठाला लागत नाही, अशी खरी परिस्थिती आहे! कशाला ही माणसं बकवास करतात? खरोखर, ह्या पिपासू माणसांपासून दूर पळून जावंसं वाटतं. सकाळपासून रात्रीपर्यंत सर्वजण म्हणतात, 'आम्हाला गायला शिकवा, आमच्या गीतांना चाली बांधा!' पण लेको, जो परमेश्वर जागा आहे, त्याची मूळात तशी इच्छा आहे का, त्याचा विचार करा नं. सगळ्यांना चुटकीसरशी कलावंत व्हायला पाहिजेय! ह्या लोकांच्या दुनियेत आपले दिवस निभावणार नाहीत. त्यांच्या महत्त्वाकांक्षा त्यांच्या त्यांना लखलाभ असोत! पिंगे, तुम्ही काय—आम्ही काय, आपण ईश्वरी प्रसादावर जगणारी माणसं. आपल्याला ह्यांच्या महत्त्वाकांक्षा पेलणार नाहीत. चला, घोटभर चहा पिऊया."

देवांना दैवी अनुग्रह होता. बेळगावजवळच्या बाळेकुंद्री गावातले सत्पुरुष श्रीपंतमहाराज ह्यांच्यावर ते पूर्णपणे विसंबून असत. सुंदर चाली अनेक संगीतकार बेततात. देवांच्या चाली सुंदर असून शिवाय अभिजात असत आणि ती देन केवळ त्या श्रीपंतमहाराजांचीच, ह्याविषयी देव निःशंक होते. श्रीपंत-महाराजांच्या 'दत्तप्रेमलहरीं'ना त्यांनी लावलेल्या चाली ऐकून पहा. स्फुरणाचा तो अस्सल देशी आविष्कार वाटेल. देवांचा दिवस भल्या पहाटे सुरू होई. वर्ईळ सुरू होईपर्यंत ते सरगम घोटवीत. मग दिवसभराची धावपळ. रात्री शांत ईशचिंतन. किती विपरीत दिवस त्यांनी न बोलता धकून नेले, आणि आपल्या पायांनी चालत आलेल्या अलौकिक सुखांनी आतून कसे फुलून

आले, ते मी डोळेझाक करीत पाहिलेलं आहे. देव मोठा समंजस, गुणी माणूस. अनेक विद्या त्यांच्या मुठीत होत्या. आचार्य रजनीशांच्या शिकवणुकीच्या गाभ्याला ते पोहोचले होते नि अनेक माणसं त्यांना विनाअट उमाळ्याने वश होती. बखवख तर देवांपाशी औषधालासुद्धा नव्हती. माणूस खरा कलावंत. पूर्णपणे निर्व्यसनी. फार साधे. व्यवहारात अति दक्ष. उमदे. ज्यांना देवांचं प्रेम लाभलं, त्यांना साक्षात् धन्यताच लाभली!

लीलावती भागवत म्हणजे उत्साहाचं थुईथुई नाचणारं कारंजं होतं. एकेका तासाचा कार्यक्रम एकटाकी लिहून काढण्याची अजब शक्ती त्यांच्यापाशी होती. मी थक्क व्हायचा. बाई रूपाने मोहक. व्यक्तिमत्त्व एकदम तरतरीत. त्यांचे कपडे नुसते बघून घ्यावेत. भपका अजिबात नसे. दिमाख सुसंस्कृत असे. आमची गप्पाष्टकं तासन्तास रंगायची. त्या गुरुवर्य रा. कृ. लागूंच्या आवडत्या विद्यार्थिनी. त्यामुळे वाचन-लेखन मोठ्या शिस्तीत करीत. त्या पूर्ण नास्तिक होत्या. देवधर्म झूट मानीत. तसं सडेतोडपणे सांगत. त्यांच्यापाशी लपाछपीचं नाव नव्हतं. पुढे त्यांच्यावरचा कामाचा ताण वाढत गेला आणि एकदा 'वनिता मंडळा'चा कार्यक्रम चालू असतानाच स्टुडिओतच त्यांना हृदयविकाराचा झटका आला! त्यातून त्या वचावल्या, पण स्वभावानं थोड्या त्रासिक झाल्या. आहारविहारावर काटेकोर बंधनं आली. थोड्याशा आगतिक झाल्या आणि मुदतपूर्व सेवानिवृत्त झाल्या.

नीलम प्रभूंना उपमा फक्त जास्वंदीच्या टक्क फुललेल्या फुलाची! त्या सदा आनंदाने बहरलेल्या असत. प्रत्यक्ष संसारात त्यांची फार ओढगस्त चालू होती. पण आईला तिच्या अंतःकाळी दिलेल्या शब्दासाठी त्यांनी सारं विपरीत गोड करून घेतलं. माझ्या कागदावरची शाई वाळायच्या आत तो मजकूर वाचून चहा मागत तरी, किंवा चहा देत तरी! आकाशवाणीवर यायच्या कैक वर्षं अगोदरपासूनचा मी त्यांचा कौटुंबिक मित्र होतो. त्यांचे वडील हिरामण देसाई हे बडे हौशी नाटकवाले. त्यांच्याकडे मी नि गंगाधर महांबरे बरचेवर जायचो. नीलम त्यावेळी व्यावसायिक रंगभूमीवर एकदम मंदतेज तारका होती. टक्के-टोणपे खाऊन बऱ्याच उशिरा ती आकाशवाणीवर आली आणि तिच्या गुणांचा प्रकाशच चौफेर लखलखला. त्याअगोदर ती यशवंत देवांकडे लडिवाळ भावगीत शिकत असे! हो, तसेही दिवस येऊन गेले! नंतर तिचं गाणं संपलं. नीलम ही उच्च श्रेणीची नाट्यकलावंत आहे हे आज सांगण्याची काहीच आवश्यकता

नाही. तिची भूमिका नसेल तर लोक रेडिओ बंद करतात असा प्रकार आहे. मी मी म्हणणारांना ती मायक्रोफोनवर पाणी पाजू शकते. तथापि, एक वत्सल गृहिणी म्हणून नीलमपाशी जी अजब मोहिनी आहे, तिला तुलनाच नाही. तिचं आंतरिक व्यक्तिमत्त्व सुसंगत नि सुडौल आहे. परमावधीचं दुःख तिनं इतकं अनुभवलेलं आहे की इतरांवर सुखाची बरसात करणं हेच जणू तिनं मनीमानसी पक्कं ठरवलं आहे. तशी रूपाने ती बेतास बात दिसते. सावळी तर आहेच. ठेंगणीही आहे. पण अनेक सुंदरींच्या लल्लाटी नाही तो गोडवा निलमपाशी भरभरून आहे. मी लिहिलेले प्रायः एकूण एक कार्यक्रम नीलमने रेडिओवर स्वेच्छेने वाचले. म्हणून तर श्रोत्यांनी ते ऐकून घेतले! दहा वर्षं ओळीने 'ग्रंथवार्ता' मी एकहाती लिहिल्या नि नीलमने वाचल्या, हा एक विक्रमच आहे! तिने अनिच्छा व्यक्त केल्याची, अळंटळं केल्याची, खेंकसल्याची अशी वीस वर्षातली एकही वेळ मला आठवत नाही. आणि आता मागं वळून पहातो तेव्हा आकाशवाणीतल्या माझ्या प्रदीर्घ रियासतीवर नीलमच्या आपुलकीच्या अंतःस्फूर्त वागणुकीचा मंद शिडकावा पडलेला दिसतो. विशेष म्हणजे नीलमला विद्येबद्दल आणि विद्वत्तेबद्दल जाण तर आहेच, शिवाय आतलाच असा स्फटिकवत् निर्मळ उमाळा आहे. म्हणून तर दुर्गा भागवत आल्या की ती पल्लवीत व्हायची. आनंदून जायची. उत्तम वाङ्मयाशी निलमचा चांगला परिचय आहे. बऱ्यावाईटाचा तिच्याकडे सूक्ष्म विवेक आहे. विधिनिषेधांच्या बाबतीत ती काटेकोर आहे आणि गोविंद तळवलकर तिचे हिरो आहेत असं म्हणायला काहीही हरकत नाही! तळवलकरांचा मला फोन आला की निलमला आनंदाच्या उकळ्या फुटायच्या नि त्यांचा काही निरोप असला तर ती तो मला एक्सप्रेस डिलीव्हरीने सांगायची. दुर्लभ अशी कातळझऱ्यासारखी पारदर्शक स्वच्छ मैत्री प्रिय निलमच्या रूपाने मला मिळून गेली.

करता करता आमची सर्वांचीच वयं वाढत गेली. बहुतेक सगळेच सेवा-निवृत्त झाले. आता कलावंत-लेखक म्हणावेत असे आकाशवाणीच्या पटावर फारसे कुणी दिसत नाहीत. नाही म्हणायला पुणे केंद्रावर सुधा नरवणे तेवढ्या उरल्या आहेत.

आकाशवाणीत आम्ही दिवसरात्र घुमायचो ते इतरांनी लिहिलेले कार्यक्रम प्रक्षेपित करायला. त्यानिमित्ताने, अनेक लहान-मोठे लेखक-लेखिका आकाश-वाणीवर पायधूळ झाडीत. वीस वर्षात कार्यक्रमांची मी पंधरा हजार करारपत्रं

स्वहस्ते पाठवली ! त्यांची कीर्ई तरी कशी ठेवायची ? चमचम करून गेलेली काही नक्षत्रं फार लख्ख आठवतात. ज्याला व्ही. आय. पी. ट्रीटमेंट म्हणतात, ती मुंबई आकाशवाणीवर दोन-चार जणांना अगदी उमाळ्याची मिळाली. पहिला क्रमांक लागतो, अर्थातच दुर्गा भागवतांचा !

दुर्गाबाई म्हणजे आमचं आनंदनिधान होतं. दहा मिनिटांचं ध्वनिक्षेपण, की जे त्यांना सफाईने जमत नसे, ती मामुली बाब होती. त्या निमित्ताने त्यांच्याशी आमच्या ज्या विश्रब्ध गप्पा तासंतास झडत, त्यांची मोहिनी मनावरून आठवडाभर उतरत नसे. घरी परतल्यावर त्यांच्या गप्पाष्टकांची लंबीचौडी टेप मला आमच्या रात्रीच्या सारखती जेवणाच्या वेळी कुटुंबियांना ऐकवावी लागे. त्यामुळे पानातला मासळीभात नि सोलकढी अधिक लज्जतदार लागे ! बाईंचा वेष कमालीचा साधा असे. भाषणाचा मजकूर मात्र केवळ अभिजात असे. परत परत वाचावं नि ज्याचा कित्ता गिरवावा, असं ते अभिजात लेखन असे. मात्र बाईंचा आवाज सुमार होता. त्या ब्रॉडकास्टर नव्हत्याच. ज्ञानमाता होत्या. त्या येणार असल्या की सकाळपासून आम्हाला हुरूप चढे. त्या आल्या की ध्वनिमुद्रणाच्या अगोदर नमनाची कॉफी होई. ध्वनिमुद्रणानंतर पुन्हा हलका फराळ, कॉफी होई. मी अनेकदा गप्पांच्या नादात त्यांना एशियाटिक सोसायटीपर्यंत पोचवायला जाई, इतका चमत्कारिक मंत्र त्यांच्या निर्मळ बोलण्यानं माझ्यावर टाकलेला होता ! बाईंचं हसणं म्हणजे साक्षात् कमळ ! कमालीचं स्वच्छ, सुंदर हसत. 'अरे'ला तिथल्या तिथे 'कारे' करीत. एक घाव दोन तुकडे हा खाक्या. त्यांनी प्रचंड वाचलेलं असे. नि ते जिरवलेलंही असे. मोह न आवरल्यामुळे, ध्वनिक्षेपीत झालेली त्यांची कैक हस्तलिखितं मी लंपास करून घरी नेली ! त्यांचे रागलोभ भलतेच तीव्र, आम्हाला न परवडणारे असे होते. तरीही आम्हाला त्या कुठून तरी आतूनच आवडायला लागल्या. कदाचित मी त्यांच्यावर चिमूटभर प्रेमही करून घेतलं असेन !

जयप्रकाशजी गेले त्या दिवशी कहरच झाला ! काय करावं तेच सुचेना. एकाकी वाटलं. पोरकेपण जाणवलं. दुर्गाबाईंना हाक मारली. त्या श्रद्धांजलीसाठी होत्या तशा आल्या. त्यांचा चेहरा ओहोटीच्या सागरासारखा खिन्न होता. म्हणाल्या, 'कागद दे. मी भाषण लिहून काढते.' मी कागद देऊन एका स्टुडिओत त्यांना बंद केलं. अर्ध्या तासाने बाई बाहेर पडल्या त्या हातात स्वच्छ कोरे कागद घेऊन ! मी खलास ! नेमक्या त्याच वेळी कवयित्री उषा

मेहेता स्टुडिओत प्रकट झाल्या. उषाचे वृद्ध वडील कै. नाना पिंगळे हे संगमनेरचे सर्वोदयी कार्यकर्ते. त्यांच्या संगमनेरच्या घरी जयप्रकाशजी आपलेपणाने जेवूनखाऊन गेलेले. उषाला त्या कोमल आठवणींचे कढ आवरेनात. स्टुडिओत घुसून तिने दुर्गाबाईंना मिठीच मारली नि त्यांच्या कुशीत रडून घेतलं! दुर्गाबाईंनी त्यांना चांदण्यांच्या हातांनी थोपटलं. नंतर दुर्गाबाई एकदम तरतरीत झाल्या. मला म्हणाल्या, "कागद नकोत. मी अशीच बोलत जाते. तू रेकॉर्ड कर. दहा मिनिटं झाल्यावर मला थांबव."

उषाला शेजारी बसवून घेऊन मी दुर्गाबाईंना स्टुडिओत घातलं. ध्वनिमुद्रण सुरू केलं. लाल दिवे लागल्याबरोबर दुर्गाबाईंनी चित्त एकाग्र केलं. डोळे मिटले. नदीच्या प्रवाहासारखं त्या संथ, निर्मळ, निरहंकारी बोलू लागल्या. अडखळल्या नाहीत की शब्दांसाठी चाचपडल्या नाहीत आणि महाआश्चर्य म्हणजे डोळे उघडून ज्या क्षणी त्या थांबल्या, त्या क्षणी नेमकी दहा मिनिटं भरलेली होती. एक सेकंद पलीकडे नाही की अलिकडे नाही. दुर्गाबाईंनी जयप्रकाशजींना वाहिलेली ती अलिखित उत्स्फूर्त श्रद्धांजली, हे आकाशवाणीचं भूषण ठरलं. आजवर मी सतराशेसाठ ध्वनिमुद्रणं फटाफट उडवली आहेत; असा हा अमोघ चमत्कार मात्र एकमेवच.

असाच एक दुसरा चमत्कार एकदा विजय तेंडुलकरांनी दाखविला.

त्यांची कीर्ती दिगंत झाली, त्यावेळची गोष्ट. ते मामुली ध्वनिमुद्रणाला येतील की नाही अशी शंका मनाला पुसटून गेली. म्हणून त्यांच्या घरी जाऊन विचारलं. डायरी पाहून म्हणाले, "येतो."

त्याप्रमाणे आले. मात्र डुलत डुलत हात हलवीत आले. बसले. अतिशय सौम्य सुखद हसले. म्हणाले, "आलोय, पण घरी वेळ मिळाला नाही. हा आला, तो गेला, असं चाललंवतं. तेव्हा मी इथंच स्क्रिप्ट लिहितो."

मी त्यांना स्टुडिओत नेऊन बसवलं. तासाभराने दार उघडलं, तर महाशय शांत चेहऱ्याने स्तब्ध बसलेले! म्हटलं, "काय हो, सुचत नाही?" तर म्हणाले, "माझं झालं लिहून! चला, रेकॉर्ड करूया."

मी थक्क

आशय आणि पेशकारी, ह्या दोन्ही अंगांनी त्या दिवशीचं तेंडुलकरांचं ते चिंतन, केवळ अलौकिक होतं. स्वरभान नि शब्दभान ह्यांचा सुमेळ असलेली किशोरी आमोणकरांची मैफल ऐकल्यावर जसं भारावल्यासारखं होतं, तसा

अनुभव आला. मी शेकडो 'चिंतनं' ध्वनिमुद्रित केली. तेंडुलकरांची सर कुणालाही आली नाही. तो नमुना ऐवज म्हणून आम्ही जपून ठेवलेला आहे.

अनंत काणेकर, गंगाधर गाडगीळ, माधव गडकरी, डॉ. स. गं. मालशे, वसुंधरा पटवर्धन, आप्पा पेंडसे, सरोजिनी वैद्य, रा. भि. जोशी, माधव मनोहर, वसंत बापट हे आमचे नेक वक्ते. त्यातल्या त्यात माधव गडकरींना वाणी विलक्षण वश आहे. त्यांचा हरएक ब्रॉडकास्ट आदर्शवत् असे. काणेकर दोस्तीने वागायचे, नाट्यमन्वंतर ऐकवायचे. फाटकांचा तर आल्या आल्या विडा वगैरे लावण्याचा कार्यक्रम असायचा. टिकेकर बाह्यतः भारी उर्मट वाटायचे. अंतर्यामी नेमके उलट होते. पण शिस्तीला कडक होते. सरोजिनी वैद्य खूप कागदं कशीबशी लिहून आणायच्या नि मग हसत हसत कापाकापीला बसायच्या! बापट हुकमी वक्ते. सदानंद रेग्यांची नि आरती प्रभूंची जातच वेगळी. ते आल्या आल्या विचारायचे, "रे, आजचा विषय काय आहे?" इथून सुरुवात असे! मग कागद मागायचे नि पुड्यात बसून गप्पा मारत विद्युतवेगाने वळणदार अक्षरात, खाडाखोड न करता, मोठं लयबद्ध गद्य लिहायचे. गिरीजा कीरांची वाणी मुलायम. त्यांच्या प्रारंभिक गप्पा, प्रत्यक्ष ध्वनिमुद्रण, नंतरचं भोजन नि त्यानंतरचं आईस्क्रीम--सारं काही त्यांच्या हसण्यासारखंच आनंददायक असे. मालशे एकदम घरगुती नि भलतेच माहीतगार असत. माधव मनोहर बेडर, पूर्णपणे निर्भय नि मुद्द्याला घट्ट. रा. भि. जोशी वडीलधारे आणि संयमी; खरे आस्थेवाईक. गंगाधर गाडगीळ पारदर्शक, सज्जन आणि उदारमनस्क. मोठं जग पाहिलेलं असल्यामुळे गाडगीळांपाशी किरटेपण औषधालासुद्धा नव्हतं. वागणुकीला फार प्रेमळ आणि सलोखेदार.

गोविंद तळवलकर सुरवाती-सुरवातीला आले. संपादकीय व्याप वाढल्यावर यायचे बंद झाले. ते इथे वावरणारे अस्सल लंडनर वाटत. साहेबी, सभ्य, तत्त्वनिष्ठ अवतार. विषयाचा व्यासंग उत्तम. बोलणं मऊ. तोलूनमापून. जाहिरातबाजीत नि एकूणच प्रसिद्धीत त्यांना खरोखरीच रस नव्हता. ते आले की क्षणार्धात वातावरण बदलून टाकीत. भारदस्तपणा, प्रसन्नता, सभ्यता, विद्येचं तेज आणि शिवाय गोडवा, अशा सगळ्या छटांच्या लहरी स्टुडिओत सळसळत. मात्र भाषण करणं हा त्यांचा स्वधर्म नव्हता. विंदा करंदीकर कमालीचे मनमोकळे असत. आंतर्बाह्य कोकणी नमुना. बोलण्यात आडपडदाच नसे. खाडीकाठावरचे दिवस, सावरकरभक्ती, आर्य समाजाचा भागानगरचा

सत्याग्रह, मधुमेह, मंत्रतंत्र, शिकागोतलं वास्तव्य, गावोगावची कविसंमेलनं, पारितोषिकांचे ढीग—असे सर्व विषय ते तल्लीनतेने खुलवत. वसुंधराबाई पटवर्धन ईश्वरनिष्ठ. वेल्हाळ. त्या अर्ध्याअधिक डोळ्यांनीच बोलायच्या! त्यांना प्रकृतीची साथ नव्हती. गर्दीला भीत असत. त्यांचा आर्जवी आवाज नि रूप प्रौढवयातसुद्धा मोहक होतं, मग आम्हाला न दिसलेल्या त्यांच्या तारुण्यात त्या काय दिसत असतील! कोणे एके काळी भावगीतं गाणाऱ्या त्या रेडिओ-स्टारसुद्धा होत्या, हे किती जणांना ठाऊक आहे? व. दि. कुळकर्णी नि दा. सी. देसाई अभ्यासपूर्ण बोलत. गय न करता मी त्यांना आकाशवाणीसाठी भरमसाठ राबवलं. ज्ञानेश्वर नाडकर्णींचा प्रासंगिक वक्त्यांमध्ये प्रथम क्रमांक लागेल. त्याने शेकडो भाषणं ठोकली. दिनकर साक्रीकर, राजा राजवाडे, रमेश मंत्री, केशव मेश्राम, उमाकांत ठोमरे, सुभाष भेंडे, प्रभाकर वायंगणकर, जोसेफ नऱ्होन्हा, अविनाश केळकर, परेन जांभळे ह्या मित्रांची शतपावली ध्वनिक्षेपणाच्या नि त्यानंतरच्या विरंगुळ्याच्या गप्पांच्या निमित्ताने आकाशवाणीवर वारंवार झाली. सांगू त्या घाटाचं ध्वनिक्षेपण ही मंडळी सराईतपणे करीत, आणि आमची वेळ निभावून नेत. त्यातल्या त्यात साक्रीकरांच्या बोलण्याला तत्त्वनिष्ठेची धार असे. वायंगणकर हा हरकामी माणूस.

वाटेत गळून पडलेल्या दोन माणसांच्या आठवणींनी काळजात कालवाकालव होते. पैकी, पहिले आहेत प्रा. ल. ग. जोग. चांगुलपणाचा अर्क व्यक्तिमत्त्वात तुडुंब भरून असलेला जोगांइतका निर्वैर माणूस मला अजून भेटायचा आहे. निगर्वी आणि सालस असे ते सरलमनस्क पंडित होते. अहंकारशून्य. प्रेमाचे भुकेले. वाचेचे मवाळ. आणि सदैव अभ्यासमग्न. त्यांची त्यांच्या लायकीच्या मानानं एकूण उपेक्षाच झाली. तरी ते कधी कुणाबद्दल एकही वावगा शब्द बोलले नाहीत. द्वेषमत्सराच्या पार पलीकडल्या निर्मळ किरणांत ते सदाचेच उभे होते. म्हणायचे, "पिंगे, तुमच्या गप्पा हा माझ्या आनंदाचा विषय आहे. भेटत चला." असा पारदर्शक सज्जन नि उत्तम ब्रॉडकास्टर हृदयविकाराला अकाली बळी पडला. दुसरे म्हणजे कर्करोगग्रस्त वृद्ध कवि सोपानदेव चौधरी. मोठा आनंदी नि उत्साही माणूस. कर्करोगाने त्यांची दशादशा केली, पण त्यांच्या हृदयातल्या आनंदज्योतीवर कळीकाळसुद्धा फुंकर घालू शकला नाही. सारखी कार्ड लिहायचे. चौकशी करायचे. केव्हाही यायचे नि विनोद पिकवायचे. मर्ढेकरांच्या आणि तांब्यांच्या आठवणींवर आठवणी सांगत

तासन् तास बसायचे. कविता चालीवर गावून दाखवायचे. त्यांना माणसांचं प्रेम हवं होतं नि त्यासाठी ते जीव पाखडत होते. त्यांची एक लांबलचक मुलाखत मी ध्वनिमुद्रित केली. त्यांचं त्यांना इतकं अप्रूप वाटलं की त्यांच्या डोळ्यांतून आनंदाच्या अश्रुधारा गळू लागल्या. माझा एक लेख वाचून ते बेहद्द खुष झाले. गहिवरले. माझा उजवा हात त्यांनी हातात घेतला, कुरवाळला आणि घोगऱ्या स्वरात भावनावेगाने म्हणाले, "पहा, रवींद्र, ह्या हाताने तुम्ही जन्मभर लिहीत रहाल. ह्या हाताने जे लिहाल ते उत्तम असेल. ते तुम्हाला जन्मभर पुरेल, कारण ते थेट देवाकडून आलेलं असेल. बाकी गोष्टी येतील-जातील. ह्या हाताने लिहाल ते टिकेल. त्याचं सोनं होईल."

हाताला बरकत येणं नि नाव दुमदुमणं, ह्या झाल्या फार पुढच्या गप्पा. त्यांचा हवाला आताच कुणी द्यावा? तथापि मी लिहिलेलं वाचून आस्थेवाईक रसिकाला मला आशीर्वाद द्यावासं वाटण्याइतपत यत्तेचं लेखन माझ्या हातून घडू लागलं, ह्याचं एकमेव कारण म्हणजे माझ्या आयुष्यात अगदी योग्य वयात उदित झालेलं हे सुलक्षणी आकाशवाणीपर्व. मुळात मी सचिवालयातला वस्ताद. तथापि माझी ती वाटचाल नियतीला नामंजूर झाली तिने खडाखड सांधेबदल केला नि मी मुंबई आकाशवाणीवर अवसानरहित सादरकर्ता म्हणून दाखल झालो. रावसाहेब पटवर्धन आणि फ्रँक मोरायस ह्यांच्याकडून उचललेली सुसंस्कारित मऊ भाषा वापरीत आणि दुर्गा भागवत, गोविंद तळवलकर आणि व्यंकटेश माडगूळकर ह्यांच्याप्रमाणे परंतु माझ्या कुवतीनुसार उत्तम ग्रंथांचा व्यासंग करीत, सर्व छटांचं मधुर आयुष्य, मुंगी होऊन विनातक्रार वीस वर्षं भोगलं. त्याने तृप्त झालो. आता वळून मागे बघताना वाटतं, अखेर प्रत्येक गोष्ट ही नियतीनंच तुमच्या लछाटी लिहिलेली असावी लागते. आपल्या पायांनीच आपल्याला वाट शोधावी लागते वगैरे म्हणणं ठीक आहे; पण पुढल्या वळणावर तेवणारा केशरी दिवा तुमच्यासाठी कुणी लावून ठेवलेला असतो?

□

लक्षावधी पक्ष्यांचं मुंबईमार्गे स्थलांतर

येताजाता पक्षी अवघा आनंदच बहाल करतात. फक्त आपलं भान जागं हवं आणि नजर थोडी झाडामाडात गुंतलेली असल्यास बरी. तशात तुम्ही जुन्या पार्ल्या-सारख्या बैठ्या टापूत वस्ती करीत असाल, तर दुधात साखर. कारण पाखरांना आसरा देणारी खुरटी झाडी तिथे मुबलक. शिवाय असाल तिथून भव्य आकाशाचा जरीपटका फडफडताना दिसतो !

परवा गच्चीत गेलो. अवघे ऐलपैल टिपूर चांदण्याने भारून टाकलेले दिसले. वल्गाळ चंद्रकिरणात बुडालेलं आसंमत गोठल्यासारखं स्तब्ध होतं. तेवढ्यात चारपाच बगळ्यांची एक टोळी पंख फडफडवीत सूर मारीत निघून गेली. बगळ्यांचं चांदण्यातलं आनंदपर्यटन मी प्रथमच पाहात होतो. त्या क्षणदर्शनाचा ऐवज मी जपून ठेवला. दुसऱ्या दिवशी सकाळी आणखी एक वेधक दृश्य दिसलं. भाल्यासारख्या माना पुढे सरसावून दहा-पंधरा फिरंगी बदकांचा एक थवा खारमधल्या झाडीतून झडझडून बाहेर पडला नि पार्ले ओलांडून विहार तलावाच्या दिशेने ऐन वेगात पसार झाला. आणि त्याच दिवशी सायंकाळी उन्हं निमाल्यावर पाचसहा बदकं विहार तलावातला चारा-पाणी उरकून संथपणे माघारी फिरलेलीसुद्धा दिसली.

ऋतुपालटाची बातमी निसर्ग ह्या असल्या लिपीत लिहितो ? असेलसुद्धा. मला नेमकं माहीत नाही. मी शास्त्रवचन पाहिलेलं नाही. सृष्टीचं एक सुंदर कौतुक एवढीच मी त्याची नोंद घेतली. मुंबई केंद्राच्या आकाशवाणीच्या परिसरात कडूजार फळांचा एक वृद्ध वृक्ष आहे. परवा पाहिलं तर त्याच्या हरएक कुरतडलेल्या पानावर एकेक पुष्ट किडा तृप्तीत वेटाळून बसलेला ! वाटलं, निसर्गाने पक्षीसृष्टीला भेटीसाठी पाठविलेल्या ह्या आमंत्रणपत्रिकाच आहेत.

निसर्गाचं औदार्य थोर आहे हाच ह्याचा अर्थ.

उदईक मुशाफिर श्रीकृष्ण वैद्य दारात हजर झाले. त्यांच्या पद्धतीने म्हणाले, "पक्ष्यांचे स्थलांतर कालपासून सुरू झालंय. पहिली सलामीची बॅच काल मला दिसली. अरबस्तानाच्या वाळवंटावरून हजारोंच्या संख्येने पर्यटक-पक्षी यायला लागले आहेत. उद्या पहाटेस माटुंगा स्टेशनावर या. परदेशी पक्ष्यांच्या फर्लांग-भर लांबीच्या माळा पाहायला मिळतील. मी टेलिलेन्स कॅमेरे गोळा करतो."

उगवलेला आनंददायी दिवस चुटकीसरशी मावळला. झोप जेमतेम लागली. दिल्या शब्दाला जागून ऐन पहाटेस पश्चिम रेल्वेच्या माटुंग्याच्या फलाटावर हजर झालो. तिथे अचानक शोध लागला, माटुंगा स्थानकातल्या फलाटाच्या दक्षिण टोकावरून दिसतो तेवढा आभाळाचा ऐसपैस फळा अन्यत्र कुठूनही दिसत नाही. तिथून पूर्वेला काहीच आडवं येत नाही. फक्त सोनशेंदरी किरणांचा गुलाल तेवढा उधळत असतो.

पहाटसमयी पूर्व क्षितिजावर रत्नजडित वैभव लखलखत होतं. चंद्र राज्य करीत होता. त्याच्यापासून आदबशीर अंतर ठेवून जरा खालच्या पायरीवर गुरू चमचमत होता. गुरूच्या खालच्या पायरीवर उणे एकशे ऐंशी डिग्रीच्या कमाल थंड वातावरणात शनि गरगरत होता. त्याखाली चित्रा तारका लुकलुकत होती. खूप खाली शुक्राचा नंदादीप तेवत होता आणि भगव्या क्षितिजकडां-जवळ डोकावताना दिसला दर्शनदुर्लभ बुध! त्याचं मंदतेज रूप डोळ्यांत साठवता साठवता तरल रंगांची मिश्रणं सुरू झाली, तेव्हा वासुदेव गायतोंडेच्या अमूर्त चित्रांची आठवण आली.

दादर चौपाटीच्या ठीक डोक्यावरल्या मोकळ्याच मोकळ्या आकाशात खूप उंचावरून पेन्सिलीने हलकी रेघ ओढलेली दिसावी, तशी पक्ष्यांची लांबच लांब माळ सरकत सरकत जवळ आली. मिनिटभरात पक्ष्यांचा तो उडता थवा थेट डोक्यावर आला नि माटुंगा स्थानक ओलांडून सूर्यबिंबाच्या रोखाने तुर्भेच्या टेकडीपलीकडे दिसेनासा झाला. मागोमाग दुसरी तुकडी आली. अगदी थेट तोच मार्ग. दादर चौपाटीच्या दिशेकडून उंचावरून उडत बागडत यायचं, दादर-माटुंग्याच्या मधून मार्ग काढायचा नि पूर्वेकडच्या दिप्तीत दिसेनासं व्हायचं. प्रत्येक कळपात दोनअडीचशे पक्षी असावेत. अशा पंधरा-वीस लाटा एकामागोमाग एक आल्या. ती बदकं नव्हती हे निश्चित. साधे पक्षिगण होते. रंग तपकिरी असावा, पण सूर्यकिरणांमुळे चकवा निर्माण झाला.

झुंड यावी तसे पक्षी येत, त्यांचा म्होरक्या मध्यभागी किंचित पुढे असे. मधूनच सारा कळप गांगरे, मावारी फिरे. जागच्या जागी काही सेकंद तरंगे. नंतर गिरकी घेऊन पुन्हा एकसाथ सूर्याच्या दिशेला आगेकूच करी. त्यांचा एकोपा अजब होता. सर्वांचे आकार सारखे होते. आणि उड्डाण नीरव होतं. कळपांच्या लाटांमागून लाटा आभाळातून पोहत पोहत ह्या दिशेने आल्या नि त्या दिशेत गुपचुप मिसळून गेल्या. गडबड नाही, गोंधळ नाही. दिशांचे ज्ञान अचूक. आपल्या उंचीचं भान अभिजात.

श्रीकृष्ण वैद्यांचं तुणतुणं बरंच चाललं होतं. उत्तर युरोपात असह्य हिमवृष्टी झाली आहे, म्हणून उबेसाठी हे प्रवासी विषुववृत्ताजवळच्या टापूत लाखांच्या संख्येने उतरतील; निम्मे भरतपूरकडे वळतील. हे जे डोक्यावरून तरंगत गेले, ते हैद्राबादेकडे हुसेनसागराजवळ स्थिरावतील नि तिकडे उन्हं असह्य झाली की, पुन्हा उलटी दिशा पकडून आल्प्स पर्वताच्या पलीकडली आपापली गावं गुपचुप गाठतील. त्यांच्या मस्तकात निसर्गाचं होकायंत्र आहे नि पंखात भूखंड नि महासागर सहज ओलांडण्याचं अजब बळ. ह्या पक्ष्यांचे चार पृथक वंश आहेत. बदकं वेगळी. ढांगा टाकीत चालणारे धिप्पाड करकोचे वेगळे. बगळे वेगळे. सीगल्स वेगळे. शिवाय ते म्हणे इकडची रोगराई तिकडे वाहून नेतात, नि तिकडची इकडे. पृथ्वीवरलं निम्मे अन्न हेच पक्षीगण मधल्या मध्येच मटकावून टाकतात.

असू दे, असू दे.

लाखो वर्षांच्या पुण्याईने गतिमान झालेलं निसर्गचक्र आपण क्षणभरसुद्धा उलट फिरवू शकणार नाही ह्या अफाट विश्वात आपण निसर्गाचे सहप्रवासी आहोत. तशात आपल्याला नेत्र लाभले ही सृष्टीची कृपा. धर्म जरामरणहीन असतो. पाखरांना त्यांचा तो धर्म सुखेनैव पाळू दे. तिबेटी पहाडापलीकडली ती मंडळी समुद्रमार्गे आनंदयात्रेवर निघाली आहेत. पाहता पाहता ती इथवर पोहोचली आहेत. कामधाम जरा बाजूस ठेवा. सूर्योदयाच्या आगेमागे पश्चिम क्षितिजाकडे दूरवर पाहा. त्या मित्रमालिका उडतबागडत समीप आलेल्या दिसतील.

□

एका बोटभर लेखाचा पोटभर आनंद !

डिसेंबर उजाडला होता. दिवस सुखाचे होते.

१ डिसेंबर १९८० च्या माझ्या दैनंदिनीच्या पानावर नोंद आहे : " सकाळी माटुंग्याला धामणकर हाऊसच्या गच्चीवर जाऊन स्थलांतर करीत असलेले पक्षिगण पाहिले. श्रीकृष्ण वैद्यांनी ती सर्व व्यवस्था केली. त्या अनुभवावर रात्री कच्चं टिपण लिहिलं. "

२ डिसेंबरच्या, म्हणजे त्याच्या पुढच्याच पानावर नोंद आहे : " पहाटे उठून पक्ष्यांच्या स्थलांतरावरल्या अनुभवावर ' परदेशी सजण घरी आले ' हा ललित लेख लिहिला व म. टा. मध्ये नेऊन दिला. दि. वि. गोखले म्हणाले, गुरुवारच्या अंकात देतो. रात्री श्रीकृष्ण वैद्यांनी सजावटीच्या दृष्टीने काही फोटो आणून दिले. "

ह्या संक्षिप्त नोंदींच्या आगेमागे थोडासा इतिहास-भूगोल आहे. तो सांगतो.

दिवाळी मागे पडलेली होती; दिवाळी अंकांतून प्रसिद्ध झालेल्या लेखनाचं मानधन थेंबेथेंबे येत होतं. त्यामुळे मन हुशारीत होतं. दोनच दिवस अलीकडे नेत्रा साठेंच्या नव्या माध्यमाने हाताळलेल्या चित्रांचं प्रदर्शन पाहिलं होतं, आणि कालमानाप्रमाणे रुंदावत जाणाऱ्या आविष्काराच्या कक्षांची स्पष्ट जाणीव झाली होती. तिथे नेत्राबाईंचे यजमान आणि माझेच नव्हे, तर सर्व लेखकमंडळींचे दोस्त, कल्याणचे शिल्पकार भाऊराव साठे भेटले. त्यांच्या सुखद भेटीमुळे ताजं ताजं वाटलं. दिल्लीच्या वासुदेव गायतोंडेच्या हातचं एक जबरदस्त रेखाचित्र माझ्यापाशी जपून ठेवलेलं आहे. ठोस रेषांच्या अवघ्या चार-सहा फटकाऱ्यांत नारीएलबाला ह्या शिल्पकाराचं गायतोंड्यांनी जिवंत ध्यान उभं केलं आहे. फार फार किंमत मोजत आलेले गायतोंडेच मती गुंग करणारी अशी किमया करू शकतात; ती अप्रतिभावंतांची कामं नव्हेत. ते

रेखाचित्र पाहायला साठ्यांनी माझ्या घरी यायचं ठरवलं. त्यामुळे आणखीच खुषी झाली. गौतम वीरकर नावाचे, काळे की गोरे ते मी न पाहिलेले, पण माझं अक्षर न् अक्षर कटाक्षाने वाचणारे एक लुब्ध वाचक आहेत. त्यांची म्हणे केव्हापासूनची इच्छा होती, मी त्यांना पंक्तिलाभ द्यावा ! (अहो, असं काय करता वीरकर ? तुम्ही नुसती एका शब्दाने सूचना द्यायची, की आपल्याला तांदळाची गरम ताजी भाकरी नि तिखट्याचं झणझणीत सुकं खायला भंडाऱ्याकडे जायचंय; तुम्हाला काय वाटतं, मी आढेवेढे घेतले असते ? अहो, प्रसन्नवदने क्षणार्धात हजर झालो असतो मी सांगाती ज्ञानेश्वर नाडकर्ण्याला घेऊन ! तर ते एक असो.) तो योग मोरेश्वर पटवर्धनांनी त्यांच्याच बिऱ्हाडी रात्री जुळवून आणला. वीरकर खुष झाले. जेवण तब्बेतशीर झालं. उशिरा घरी परतलो. झोपायच्या अगोदर वासुदेव गायतोंडेचं ते भूल टाकणारं रेखाचित्र पुन्हा परत परत पाहिलं आणि त्या एकाकी, फटिंग चित्रकारावर परमेश्वराने केलेल्या अविरत कृपेचं कौतुक करीत, आणि त्या अथांग कृपादृष्टीचा एक थेंब तरी माझ्या ओंजळीत पडू दे बुवा, अशी विधात्याची करुणा भाकीत नेहेमीच झोपतो तसा शांतपणे झोपी गेलो.

पहाटे उठून एका नवोदित कवीच्या पहिल्यावहिल्या कवितासंग्रहाला प्रस्तावना लिहून काढली. वाचा : 'वधस्तंभ' हा काव्यसंग्रह. कवी : प्रमोद शांताराम खेडलेकर तथा कवी सुशिलानंदन ! मुक्काम नाशिक.

नंतर निष्फळ पत्रलेखन केलं.

त्यानंतर स्नानसंध्या आटोपून मी लोकलला लटकलो. तसाच लटकून दिवेलागणीला परत आलो. पंखा सोडला नि सर्व चित्त एकवटून मेष राशीचं साप्ताहिक भविष्य वाचायला सुरवात केली, कारण ती रास माझ्या पत्नीची आहे ! खुद्द माझी रास कुंभ आहे. पण जिथे मी जाणून आहे की माझं ह्या दिव्य इहलोकीचं भविष्य फक्त मेष राशीची स्वकुलोद्धारकच पक्कं करणार आहे, तिथे मी कुंभेचं फलज्योतिष नाहक कशासाठी वाचायचं ? वाचण्याचा मात्र हकनाक त्रास व्हयचा.

करता करता दारावर टकटक वाजलं. म्हणून दार उघडलं. तर, दारात दोस्त श्रीकृष्ण वैद्य शांत मुद्रेने उभे.

वैद्य सात्त्विक आहेत. ते दिसले की सारी यातायात विसरायला होते. जगावं कसं ? वैद्यांसारखं ! त्यांनी मालबोटींवर कोळसे भरत जगाला पाच फेऱ्या

मारल्या आहेत; निसर्ग डोळे भरून पाहिला आहे. सगळे सागर-महासागर, देश-विदेश, सगळी नक्षत्रं, सगळे पशुपक्षी, सगळ्या भरत्या-ओहोट्या पाहून झाल्या आहेत. ते कमालीचे तृप्त आहेत. वखवख अजिबात नाही. इमानेइतबारे कामधंदा करावा, नाकासमोर चालावं, आणि प्रपंच करता करता अष्टौप्रहर दृष्टीला पडणारं सृष्टीचं कौतुक न्याहाळून ते रोजच्या रोज वहीत नीट नोंदवून ठेवावं, ह्यापरता वैद्यांना अन्य स्वर्ग नाही. "काल रात्री चंद्राच्या दिशेने पांढरे ढग जमू लागले आणि क्षणात त्यांची पांगापांग झाली" किंवा, "हनुमान सोसायटीच्या गच्चीच्या कठड्यावर सकाळी दयाळ पक्षी दिसला. नंतर समोरच्या रामाच्या देवळाच्या झाडीत तो उडून गेला," असल्या नोंदींनी त्यांच्या वह्या भरलेल्या आहेत. अशी माणसं किती असतील? आमच्या पाल्यात तरी ते एकटेच आहेत. नि मी दुसरा!

वैद्य उभ्या उभ्या म्हणाले, "तुमच्या वाचनात व्यत्यय तर नाही ना आला? मी आज सकाळी दादरच्या चौपाटीवरून उडत येणारी परदेशी बदकं पाहिली. ह्याचा अर्थ पक्ष्यांच्या स्थलांतराला सुरवात झाली आहे. उद्या पहाटेस तुम्ही माटुंगा स्टेशनवर थांबा. मी येतो. नि तुम्हाला धामणकर हाऊसच्या गच्चीवर नेतो. दुर्बिणींची नि कॅमेऱ्याची व्यवस्था केलेली आहे."

वैद्य दयाळ पक्ष्यासारखे आले, टेकले नि पळाले.

आखून घेतल्याप्रमाणे मी माटुंग्याच्या धामणकर हाऊसच्या गच्चीवरून स्थलांतर करीत थव्याने निघालेली परदेशी बदकं डोळेभरून पाहिली. डोळ्यांची पारणी फिटली. माझा बराच काळ कोकणातल्या आगरात नि आंबरायांत गेलेला आहे. माझं उपळं गाव ऐन खाडीकाठावर आहे नि घर व्हाळाच्या कडेला आहे. पुढे-मागे विहिरी आहेत; समोर गर्द झाडी आहे नि पिछाडीला रान आहे. रानाच्या पलीकडे हाकेच्या अंतरावर शेत आहे नि शेतात खोल खोल काळोखी वाघबीळ आहे. माणसं त्या बाजूला एकटीदुकटी फिरकत नाहीत. रात्र पडली की गावात भुकेलेलं वाघूट अधूनमधून चक्कर टाकून जातं. शेतकरी त्याची उपेक्षा करतात. परिसर हा असा अरण्यरूपधारक असल्यामुळे मी आमच्या लत्यात लागतील तितके रंगीबेरंगी पक्षी पाहिलेले आहेत. जबर ताकदीच्या विष्णुगरुडापासून इवल्याल्या नीळकंठापर्यंत. पण लक्षावधी मैलांची अंतरं सालोसाल कापणाऱ्या ह्या परदेशी बदकांची दुनिया काही औरच!

पक्ष्यांच्या स्थलांतराला एक जीवशास्त्रीय बाजू आहे. तिच्याविषयी मला

ओ म्हणता ठो कळत नाही. पण स्थलांतराला निघालेल्या पक्ष्यांचं उड्डाण पहाणं हा मात्र रोमांचकारी अनुभव आहे. त्याची घाटदार नोंद करणं हे ललित लेखक म्हणून माझं काम आहे; माझंच काम आहे.

पहाटेस दोन तास खपून मी लेख सिद्ध केला : 'परदेशी सजण घरी आले.'

गुरुवार, दि. ४ डिसेंबर १९८० च्या माझ्या दैनंदिनीत नोंद आहे : 'आजच्या म. टा. मध्ये माझा पक्षी स्थलांतरावर छोटेखानी लेख प्रसिद्ध झाला आहे. संपादक मंडळींनी पाखरांचा फोटो छापला नाही; शीर्षक बदललं आणि कसाबसा शेवटच्या पानावर लेख छापला.'

खरी गोष्ट अशी आहे : मी मिळवलेले पक्ष्यांचे फोटो अस्पष्ट होते. त्यांचा ठसा निरुपयोगी झाला असता. लेख आतल्या पानावर, पण खास चौकट मारून मखरात बसवला होता. आणि शीर्षक लक्ष्यवेधी होण्यासाठी गोखल्यांनी त्याचं शब्दांतर केलं होतं, "लक्षावधी पक्ष्यांचे मुंबईमार्गे स्थलांतर." आमच्या जुन्यापुराण्या स्नेहदीपाची वात थोडी मंद करून पाहिलं, तर वास्तव अधिक स्पष्ट दिसतं; बंडोपंत गोखल्यांच्या बातमी सजवण्याच्या क्षेत्रातल्या पल्लेदार अनुभवाची महती पटते. टिपण लिहिताना माझी भूमिका फक्त विशिष्ट तरल अनुभव कुरवळणाऱ्या निखळ कलावादी लेखकाची होती. गोखल्यांनी त्या मजकुराला ताज्या बातमीचं अंगडंरुपडं घातलं; कारण त्यांच्यातला पत्रकार जागा होता. नंतर ते मला म्हणालेच, "शाबास, म्हणजे फक्त ललितलेखच तेवढा कलात्मक असावा काय? बातमी नको कलात्मक? आम्ही ताजी बातमीही कलात्मक केली पाहिजे. तो आमचा आनंद आहे."

हे सारं आता पटतं. तेव्हा मात्र लेख आतल्या पानावर गेल्यामुळे मन झाकोळलं होतं. अर्थात, एक गोष्ट स्पष्टच आहे की, तुमचा लेख प्रारंभी असो वा शेवटी, तो सकस असेल तर वाचक तो हुडकून काढून वाचणारच. त्यापेक्षाही तुम्ही सातत्याने शैलीदार लिहून पुण्याई गोळा केली असेल, तर वाचक तुमचा अखेरच्या पानावरचा लेख प्रथम वाचणार नि मग अन्यत्र वळणार. बर्ट्रांड रसेलचं आठ-दहा ओळींचं पत्र 'एन्काऊंटर'च्या शेवटच्या पानावर छापलं गेलं. आम्ही त्या वेळी 'एन्काऊंटर' शेवटच्या पानापासून वाचायला प्रारंभ केला होताच की! रविवारच्या 'केसरी'त शकुंतला परांजप्यांचं इच्छामरणाच्या नितांत आवश्यकतेवर एक चिमुकलं पण अर्थपूर्ण

टिपण मधल्याच पानावर दाटीवाटीने कोंबून प्रसिद्ध झालं आहे. माझी खात्री आहे, वाचकांनी त्या दिवशीचं 'केसरी'चं वाचन नेमकं त्या टिचभर टिपणापासून सुरू केलं असणार; डोळे सुंदराकडेच वळणार. बुद्धी अर्थपूर्णाचाच पाठलाग करणार.

पुन्हा एकदा : हे सारं आता पटतं. तेव्हा मात्र लेख आतल्या पानावर गेल्यामुळे निराशेने मन क्लांत झालं होतं. समाधान एवढंच होतं की नोकरीतल्या साहचार्यामुळे ज्या नीलम प्रभू माझ्या सर्वच हस्तलिखितांच्या जवळपास पहिल्या वाचक असतात, त्यांनी त्या लेखाचं हस्तलिखित वाचून म्हटलं होतं, 'किती गोड लिहिलंयत हो तुम्ही पाखरांविषयी!' तो तेवढा आधार होता. पण लेख म. टा.मध्ये शेवटच्या पानावर प्रसिद्ध झाल्यावर मी जरा नरम होतो.

नंतर वारं पालटलं.

निरपेक्ष संतोष व्यक्त करणारा पहिला अभिप्राय दूरध्वनीवरून सुहासिनी मुळगावकरांनी दिला. म्हणाल्या, 'बहोत अच्छा!'

दुसऱ्या दिवशी दूरदर्शनचा विनय धुमाळे दत्त म्हणून आकाशवाणीवर हजर झाला. म्हणाला, 'तुमचा परवाचा पक्ष्यांवरचा लेख मला इतका आवडलाय की मी तुम्हाला बॅग प्रेझेंट द्यायला आणली आहे!' आणि इतकं बोलून विनयने दिल्लीला खरेदी केलेली नवी कोरी भारीतली बॅग मला तिथल्या तिथे बहाल करून टाकली! कानांवर नि डोळ्यांवर माझा विश्वासच बसेना. पण घडलेलं खरं होतं.

ती बॅग मिरवीत मिरवीत घरी नेली. घरात लेखाचं काही नव्हे पण बॅगचं भारी कौतुक झालं. जो तो म्हणू लागला, ही आम्ही वापरणार! अशा लाडिक मागण्यांना नकार कसा देणार? मी पंखा सोडला. सतरंजी पसरली. वाचत पडलो. प्रथम टपाल हाताशी घेतलं. तर पहिलंच पत्र देवासहून आलेलं दिसलं. उघडून पाहिलं तर ते कुमारांचं नव्हतं; देवासचे राजकवी गोविंद झोकरकर ह्यांचं फर्ड्या अक्षरातलं होतं. त्यांची कविता मला माहीत होती. कवी मात्र पूर्णपणे अपरिचित. त्यांनी लिहिलं होतं, "तुमचा पक्ष्यांच्या स्थलांतरावरला लेख वाचला नसता, तर आयुष्यातल्या एका अपूर्व सांस्कृतिक आनंदाला मी मुकलो असतो. तुम्ही तो आनंद दिलात."

ते शब्द वाचून लेख लिहिल्याचं सार्थक झाल्यासारखं वाटलं.

त्या पत्राची घडी मिटतो न मिटतो तोच दारावर टकटक झाली. दार उघडलं.

एक तरतरीत दिसणारे गृहस्थ सप्तोर उभे ठाकले. त्यांच्या हातात कागदाची भेंडोळी होती. म्हणाले,

"आपणच पिंगे नं? मी प्रभाकर गोखले. आर्किटेक्ट आहे. आपला पक्ष्यांवरचा लेख वाचला. तो आवडला म्हणून मुद्दाम भेटायला आलो."

मी या, बसा म्हटलं. ते टेकले. म्हणाले,

"उद्या अनायासे रविवारच आहे, तर चला आमच्याबरोबर पक्षी पाहायला. मी तुम्हाला आणखीन काही पाखरं दाखवेन. अंधेरीच्या पलीकडे एक तलाव आहे. ती पक्ष्यांची छावणीच आहे. उजाडता उजाडता आपण तिथे हजर होऊ या."

"हे सगळं इतक्या कमी वेळात कसं काय जमणार? मी पहाटेस उठतो; तो प्रश्नच नाही. पण सकाळी अंधेरीपर्यंत जाणं मुष्कील आहे." मी म्हणालो.

"त्याची काळजी तुम्ही नका करू. मी ठीक सातला माझी गाडी घेऊन येईन. मग आपण जाऊ. मला तुम्हाला काही पाणबदकं दाखवायची आहेत." ते सद्गृहस्थ उद्गारले.

हे कुणाचे कोण प्रभाकर गोखले? पण आले बुवा ठीक सातला आपली गाडी घेऊन. जीन्स घातलेली त्यांची लेक चाकावर होती. मी माझ्या मुलाला घेऊन गाडीत बसलो. दोन-चार वळणं मारल्यावर आम्ही अंधेरीच्या भवन्स महाविद्यालयाच्या पटांगणावर उतरलो. उतरल्या उतरल्याच शकुन घडला. शेकडो पाणबदकांचा थवा माझ्या टाळूलाच चाटून समोरच्या तलावात घुसला. ढगांची सावली पडते, तशी पक्ष्यांच्या त्या झोताची सावलीसुद्धा पुसटशी पडल्यासारखी वाटली. मी हरखून गेलो.

जिथे आज भवन्स महाविद्यालय उभं आहे तिथे म्हणे फार पूर्वी खाडीचा जिवंत फाटा होता. त्या वेळी मंत्रिमंडळात असलेल्या कन्हैयालाल मुन्शींच्या प्रेरणेने नंतर बांधबंदिस्ती करून भरतीचं पाणी आत घेतलं नि मातीची भिंत घालून ते वाहतं धन अडकवून टाकलं. अशा रीतीने ते कृत्रिम तळं तयार झालं. काठावर झाडं लावली. त्यामुळे अभयारण्यात जलाशय असावा तसा तो झाडांच्या कोंडाळ्यातला पाण्याचा कोंदट तुकडा तयार झाला. पाण्याची मूळची चव खारट होती; पण पावसाची गळती त्याच्यात मिसळून ते नीमखारट, नीमगोडं असं अधमुरं झालं. स्थलांतर करणाऱ्या बदकांना त्याची चव लागली. विश्रांतीसाठी झाडंझुडपं नि कुरणं होतीच. शिवाय माणसांची रहदारी नाही.

त्यामुळे ते तळं म्हणजे परदेशी पाखरांचा निवांत असा ट्रॅन्झीट कॅम्प झाला.

त्या ट्रॅन्झीट कॅम्पवर आज प्रमुख पाहुणे होते पिंगे पितापुत्र, लेकीसहवर्तमान गोखले, आणि त्यांचे एक कौटुंबिक स्नेही श्री. राणे, जे मुदलात स्थापत्य-शास्त्रज्ञ तर होतेच, शिवाय हौशी पक्षीनिरीक्षक नि वनस्पतितज्ज्ञही अस्सल होते. आमच्यापाशी शक्तिमान दुर्बीण होती. पक्ष्यांवरलं सलीम अलींचं रेडी-रेकनर होतं.

सूर्य वर आला होता. त्याचे उबदार किरण तलावात पसरले होते आणि या सुखद साम्राज्यात नाना प्रकारचे पक्षी निर्भयपणे संथ पोहत होते. लाल चोचींची, तशीच सफेत चोचींची गुलजार बदकं होती. खंड्या अर्थातच होता. राखी पानढोक डझनावारी होते. त्यांच्या माना सापासारख्या लांब होत्या. कोतवाल, तांबट, बुलबुल, खुजे बगळे, सारेजण तलावात हजेरी लावायला जमले होते. आम्ही दुर्बिणीच्या भिंगातून त्यांच्या मनपसंत क्रीडा पाहिल्या. आश्चर्य म्हणजे चिरंजीव सांबाप्रसाद पाण्याकडे बोट दाखवीत मला म्हणाला, 'बाबा, तो बघा पाणसर्प चाललाय!' नि ते खरं होतं. पाण्यात एक धिवड शांतपणे पोहत होता नि त्याला पाखरं डरत नव्हती. जणू पाणसर्पासहीत समस्त पशुपक्ष्यांचं ते एकत्र कुटुंबच होतं. प्रेम नि विश्वास हा त्या कुटुंबाचा गाभा.

ऊन तापलं. झाडामाडांची नक्षीदार प्रतिबिंबं तळ्यात थरथरू लागली. मग दमलेले पक्षी तळं सोडू लागले. जवळच्या पानापाकळ्यांत त्यांनी आश्रय घेतला.

आम्ही ओळखलं, परतायची वेळ झाली आहे.

एक मामुली लेख लिहून माणसाच्या पदरात निसर्गाचा इतका सुखद नि जिवंत चित्रपट पडू शकतो, ह्यावर विश्वास ठेवीत ठेवीत मी घरी परतलो.

नंतर दुसऱ्या दिवसापासून खुषी-पत्रांची रीघ सुरू झाली. वाचकांची तर पत्रं आलीच, शिवाय सोलापूरचे पक्षीनिरीक्षक बी. एस. कुळकर्णी ह्यांचंही तारीफ करणारं पत्र आलं नि सोबत त्यांनी माळढोक पक्ष्याचं सुंदर रंगीत छायाचित्रही पाठवल, त्याने आनंद द्विगुणित झाला. प्रा. रा. वि. सोवनी आकाशवाणीवर येऊन खुषी मुद्दाम सांगून गेले.

त्यानंतरच्या रविवारची गोष्ट. दुपारचे बारा वाजून गेले होते. मी काहीतरी लिहीत बसलो होतो. इतक्यात दारात पद्मजा फाटक ह्या लेखिका फार घाईत आलेल्या दिसल्या. म्हणून त्यांच्या समाचारासाठी उठलो. तर त्या म्हणाल्या.

"अहो, मी सैंपाक अर्ध्यावर टाकून आल्येय. मला तुमचा तो पक्ष्यांच्या स्थलांतरावरला लेख फारच आवडला. तुम्हाला सांगायचं ठरवलं, पण सवडच मिळेना. म्हटलं, आता विसरायच्या आत तुम्हाला सांगितलेलं बरं म्हणून धावत धावत आले. सांगायचं होतं ते तुम्हाला सांगितलं. आता तडक परत जाते. सैंपाक अर्ध्यावर टाकून आल्येय!' आणि आवंढा न गिळता इतकं बोलून आल्यापावली त्या निघून गेल्या! एका संसारी बाईने भर दुपारी बारा वाजता सैंपाक अर्ध्यावर टाकून, अर्धा मैल उन्हातून वाट तुडवीत, केवळ लेख आवडला हे सांगायला लेखकाच्या दारात यावं, नि आल्यापावली पळावं हे मला अजबच वाटलं. बाईच्या औदार्याबद्दल फार कृतज्ञता वाटली. मी त्यांना साधं गूळपाणीही विचारलं नाही, ह्याची खंत वाटली.

दुसऱ्या दिवशी ऑफिसमध्ये पुढचा चमत्कार झाला. पालकर नावाचा एक तरुण अनोळखी मुलगा माझा लेख वाचून मला नुसतं पाहायला आकाशवाणी-पर्यंत चालत आला! मी थक्क झालो.

तो गेला आणि कॉलेजकुमारांचं एक टोळकं माझ्या केबिनमध्ये आलं. म्हटलं, 'तुम्हाला काय हवंय?' तर त्यांचा म्होरक्या म्हणाला, 'काहीही नकोय. फक्त तुमचा लेख वाचून आम्हाला भलताच संतोष वाटला ते सांगायचं होतं.' मी विचारलं, 'तुम्ही पक्षीनिरीक्षक आहात काय?' तर म्हणाले, 'नाही. आम्ही माटुंग्याच्या रुपारेलचे विद्यार्थी आहोत. तुमच्या लेखात तुम्ही माटुंग्याच्या प्लॅटफॉर्मवरून आकाश फार सुंदर दिसतं असं लिहिलंत. हे आजवर आमच्या लक्षातच आलं नव्हतं. म्हणून आम्ही मुद्दाम जाऊन पाहिलं, तर खरंच आभाळाचा फार विशाल पट्टा तिथून दिसला. तेव्हा म्हटलं, आमच्या रेल्वे स्टेशनाबद्दल ज्याने गौरवून लिहिलंय, त्यांना भेटून आभार मानून येऊया. तेव्हा थँक्स. येतो!'

मी चकित!

पार्ल्यात आप्पासाहेब भागवत नावाचे माझे एक वडीलधारे हितचिंतक सुहृद् आहेत. त्यांच्या घरी हे सगळं कौतुक सांगायला म्हणून निघालो, तर सौंदर्याची आणखी एक अनपेक्षित छटा सामोरी आली. भागवतांच्या दारात एक दुधीभोपळ्याचा सुका वेल आहे. त्याच्यावर एक इवलासा बुलबुल पक्षी बसलेला दिसला. आमची दृष्टादृष्ट झाल्यावर मला वाटलं तो भीतीने पळेल; पण नाही. माझ्याकडे ओळखीचं पाहून त्याने चक्क गाणंच म्हणायला सुरवात केली!

उभ्या उभ्याच ते सुस्वर मी ऐकून घेतले; तृप्त झालो. प्रश्न पडला, हा गाणारा बुलबुलसुद्धा माझा वाचक तर नाही नं ?

लेखकाच्या दुनियेत अशी मजाच मजा आहे ! आपण बोटभर पेरतो; त्यातून पसाभर उगवतं. ते डोळ्यांना दिसतं. आपण फक्त त्रयस्थपणे कौतुक पहायचं. ओंजळीत धन्यता टाकणारी शक्ती वेगळीच आहे. संतवाणीचा दाखला आहे :

नित्य नवे जे देईल माधव
लाडू अनारसे नाही कामाचे
साधूची अंबील बरी रे उद्धवा, साधूची अंबील बरी.

□

पावरी

पावसाळा पालटल्यानंतरची गोष्ट. पहावं तिकडे हिरवंगार रान. मळ्यात पाणी बुदबुदलेलं. शिवाय, पायवाटा बंद. जाणार कुठे नि करणार काय ? बंदराची दिशा बंदच. बोटी बंद. त्यामुळे मुसलमान होड्या काढीत नसत. चिखलात फिरणं शक्यच नव्हतं. गुरावासरांचीसुद्धा चिखलात फे-फे व्हायची, तिथे माणसांचा काय पाड ? मी आख्खा दिवस माच्यावर टांगळून काढी. कंटाळा आला तर मूठभर पोहे खाई. त्याचाही वीट आला तर पंतांच्या आर्या म्हणे. अधूनमधून सोहिरोबांची पदं नि स्तोत्रं.

एकदा अचानक माझ्या ध्यानात आलं, कृष्णपक्ष सुरू झाला असून सावरीची सावली अंगण ओलांडून उगवतीच्या दिशेने परसवापलीकडे पळालेली आहे. म्हणजे, सांजेचे पाच बाजून गेलेत. ही तर चिंबोऱ्या बाहेर निघायची वेळ !

तसाच उठलो. बांबूचा चिमटा घेतला. झाकणाची रोवळी घेतली, नि चिखल तुडवीत बंदर गाठलं.

तरीवर शुकशुकाट होता. मावळतीची कोमट, तांबूस उन्हं खाडीवर पसरलेली होती. ओहोटी लागलेली होती. उदास, मातकट पाणी डुबुकडुबुक करीत दर्याच्या अंगाला घसरत होतं. काठावर चिखलाचे उंचवटे वाढत होते. तिथेच कडेला टिटवी पक्षिणी चरत होती. पाण्याने गिळंकृत केलेली काठावरची बिळं आता मोकळी झाली होती नि त्यातून खेकडे पाय फेंगडत बाहेर पडत होते.

अंधारू लागलं तशी खेकड्यांची संख्या वाढू लागली.

माझ्या जीभेला पाणी सुटलं. चार चिंबोऱ्या म्हणजे फर्मास कालवण. सात-

आठ नग म्हणजे साक्षात पार्टी !

चिमटा सरसावून मी बिळाच्या मागून मागून हलक्या पावलाने चाल्लू लागलो. माझी चाहूल लागून बिळातून डोकावणारे खेकडे अंग आक्रसून बिळात नाहीसे व्हायला लागले.

मी दबा धरून बसलो. इतक्यात तरीवरून पुकारा आला,

"कुर्ल्याक इलास मां ?"

आवाज तुळसकर टेलरांचा होता. मी होकार दिला. ते वडिलधारे. म्हणून काठावरल्या चिखलावरून त्यांच्या समोर आलो. त्यांनी विचारलं,

"मास्तर काय करतात ?"

"काय करणार ? पेन्शन पडल्याय. आतां घरींच बसतात."

"पेन्शनीचा आकडा ?"

"साठ म्हणतात बापडी."

"त्यात भागतं ? तुम्ही पाच मानसा नव्हेत ?"

"हो. नि सध्या आडिवऱ्याची आत्यापण आल्याय."

"ध्या ! म्हणजे एकादशीच्या घरी शिवरात्र ! मग तू एखादा कामधंदा का नाही बघत ?"

"इथें उपळ्यात कसलां काम नि कसला धंदा ?"

"दिला तर करश्याल मा ?"

"कां नाय करणार ? उमेदीने करीन."

"बघ हो—"

"तुम्ही देऊन तरी बघा खरे."

"ऐक, आतां तुळशीच्या लग्नापासून मुहुर्त सुरू होतील. खरं मा ?"

"खरं."

"म्हणजे घरोघर ढोल-तासे लागणार. पिपाण्या लागणार. खरं मा ?"

"लागणार."

"त्यात पितळेची पावरी वाजवणारा असला तर वाजंत्र्यांची ऐट वाढणार. खरं मा ?"

"खरं."

"मग पावरी वाजवून तू चार पैसे तरी मिळव म्हणतों मी. सोपी गोष्ट आहे. कसं ?"

"पण लग्नाची वाजंत्री हे आमचे धंदे नव्हत. आम्ही ब्राह्मण नं? बोलतां काय तुम्ही? ताशाचं कंत्राट मुसलमानांचं."

"हेच भोंवतंय! तो म्हातारा तात्याराव खारेपाटणात घसा कोरडा करून गेला, की अरे मुलांनो, उत्तम तासेवाजंत्री वाजवायला शिका नि आपली पारंपरिक वाद्यविद्या म्लेंच्छांकडे गहाण पडल्याय, ती सोडवून माघारीं आणा! पण तात्यारावाचं ऐकतो कोण?"

"भलतंच काय सांगता? अहो, हिंदूंनी तासे वाजवले तर अरुस्या खाडीत लोक हसतील, माहीत हाय?" मी म्हणालो.

"अरे, झाल्लममध्ये गेले हंसणारे रे! विचार कर बाबल्या, पावरी वाजवशील तर महिन्याकाठी वीस-पंचविसाला आपल्या खाडीत मरण नाही."

"वीसपंचवीस? ते कसे?"

"एका आमंत्रणाचे पाच रुपये हे नक्की. महिन्यात चारपाच तरी कार्यांना मरण नाही. बरं, सगळा वेव्हार रोखीचा! उधारीची बोली नाय. दोनचार महिने पावरी वाजवलीस तर बापासमोर शंभराची रास ओतशील! विचार कर, पुरता विचार कर. सावरकरांनी सांगितलं तेच बरोबर आहे. अरे, बॅलीस्टर माणूस ना तो?"

माझ्या डोळ्यांसमोर नक्षत्रं लखलखली. चिंबोऱ्या पकडणारा नि मुळ्ये वेचणारा पिंगेमास्तरांचा हा बाबल्या, शंभर रूपे रोख मिळवणार? शंभर रूपे?

माझी झोप गायब!

एकदा वाटे, तुळसकर टेलर हिंदूमहासभावाला. तो नुसती कांडी लावणार नि नाहीसा होणार. दुसरीकडून वाटे, खरोखर बोलाफुलाला गाठ पडली नि समजा शंभराची रक्कम मला इथे कोकणात भेटलीच, तर बाबांची आनंदाने वाचाच जाईल!

दोनतीन दिवस मोठ्या बेचैनीत काढले. मग रात्रीची जेवणंखाणं झाल्यावर धीर करून बाबांकडे विषय काढला,

"परवा तुळसकर टेलर भेटलावता तरीवर."

"काय म्हणतो तो सावरकर?"

"म्हणाला, हिंदू पोरग्यांनी तासे वाजवाची कंत्राटं घेतली पाहिजेत लग्नांतून."

"आणि दंगे झाले तर? पण कल्पना वाईट नाही. आपल्या खाडीवर

वर्षाकाठी गेलाबाजार पाचपंचवीस तरी कार्यं लागतात. मी म्हणतो त्यातले निम्मे पैसे तरी हिंदूंच्या घरात बळतील. सावरकर तसा डोकेबाज. उगाच काय बॅरिस्टर झाला ? पण तिकडून ब्रिटेश त्याला चाप लावतात नि इकडून आमचेच भाऊबंध त्याची टिंगल करतात ! काय करेल बिचारा एकटा सावरकर ? "

" तुळसकर म्हणाले, खुद्द मीच पावरी वाजवायला लागावं. तो शिकवेल. "

माझ हे वाक्य ऐकताच बाबा चमकले. कावरे-बावरे झाले. म्हणाले,

" तूं ? तू पावरी वाजवणार गावकऱ्यांच्या लग्नात ? डोकं फिरलंय त्या तुळसकराचं. "

" चार महिन्यात शे-सव्वाशे रूपे राहतील म्हणाला. "

" चूड लागो त्या तसल्या पैशाला ! आपल्या घरात हे पाप कशाला ? तो तुळसकर टेलर नि त्याचा तो बॅरिष्टर, बाहेर काय बाष्टेल ते करोत. आमची ना नाही. पण आमच्या घरात अमंगळ काही नको बाबा. देवदेयेनं आपल्याला दोन वेळच्या ताकभाताला मरण नाही. गावोगाव वाजंत्रीवाल्यांमागून हिंडायचं, घाट्या तुडवायच्या, स्वतःचं हसू करून घ्यायचं–सांगितल्यात कुणी हे धंदे ? आपली ब्राम्हणांची लाईन नाही ती. डोक्यातून काढून टाक ते खूळ. छेः ! नसत्या काळज्या निर्माण करतोस बाबा तूं. "

" तुळसकर टेलर एव्हांना सर्वांना सांगूनही मोकळा झाला असेल ! " मी म्हणालो.

" खरं ? मग मी आत्ताच्या आत्ता त्याचा बंदोबस्त करून येतो. जातो नि सांगतो, बाबा, ही नसती चूड तूं आमच्या शेणव्यांच्या वाडीत आणू नकोस. बाहेर हिंदूसमाज काय ओस पडलाय ? गुरव आहेत, सोनार-कासार आहेत, तांबट आहेत, कुणबी आहेत आणि खुद्द तुझे जातभाई शिंपीही आहेत. तू आपला तिकडे जा कसा ! आमचे देवधर्म आम्हाला सोडायचे नाहीत. मास्तरांचा लेक जरीची टोपी नि जाकीट घालून वाण्यांच्या खळ्यात वाजंत्री वाजवीत बसलाय, हे चित्र डोळ्यांना कसं दिसेल ? छेः ! एक लक्षात ठेवायचं बाबल्या, की जे आपल्या वाडवडिलांनी केलं नाही, ते आपणही करायचं नाही ! काय वाष्टेल ते होवो, कुळाला बट्टा लावायचा नाही ! "

इतकं तरातरा बोलून धास्तावलेले बाबा उठले. मूठभर जोक्या पेटवल्या. बहाणा घातल्या. काठी घेतली. नि शिंप्यांच्या घरांच्या दिशेने चूडीच्या प्रकाशात ते झपाझप चालू लागले.

ती रात्र आज मला इतक्या वर्षांनी आठवली !

किती वर्षांनी आठवली ? तर, मोजून पंचेचाळीस वर्षांनी, की जेव्हा कोकणातल्या त्याच पडवीत बसून मी माझ्या मुंबईतल्या मुलाच्या भवितव्या-बद्दल काळजी करत आहे !

पंचेचाळीस वर्षं !

दरम्यानच्या काळात बाबा गेले. तुळसकर टेलर गेले. खारेपाटणाच्या खाडीत टाहो फोडून सावरकर तर मागेच गेले. काळ बदलला. दोन पिढ्या संपल्या. पृथ्वीवर युद्धं झाली. नवे भूखंड सापडले. शोध लागले. माणसांच्या आयुष्याचा नकाशा बदलला, पण त्रिभुवनातली आम्ही समस्त बापमंडळी जिथे होतो तिथेच घट्ट आहोत. आमचं अवतारकृत्य अवघं एक : पोराबाळांची काळजी करणं; फक्त काळजी करणं !

□


ग्रंथ संग्रहालय ठाणे
3374
दा. क्र. २५/५८
निर्लेखित
२२/३/८८

मी आणि माझे वाचक

लेखकाला आपखुषीने वाचक लाभणं, आणि लाभलेला वाचक टिकणं, ह्यापरतं लेखनाचं अन्य ते साफल्य कोणतं ? लेखकांना वाचकांचा स्वयंस्फूर्त प्रतिसाद मिळणं ही परम भाग्याची बाब आहे. वाचकांची खुषी कळली, किंवा नुसती प्रतिक्रिया कळली, तरी लेखकाला बागेतून चक्कर टाकून आल्यासारखं ताजंतवानं वाटतं. वाचकाची दाद म्हणजे काय दाट समाधान आहे, तो अनुभव ज्याचा त्याने ध्यायचा आहे. रातराणीच्या खुष्बुतली किमया शब्दात कशी वर्णन करता येईल ? एका अर्थी लेखक हा उन्हातान्हातून भटकत असतो. त्याला सारखं मेजाजबळ बसून लिहावं लागतं. इतर मंडळी जेव्हा झोपेचं सुख घेत असतात तेव्हा लेखक बिचारा बत्तीच्या प्रकाशात मान मोडून घाईघाईत लिहीत सुटलेला असतो. त्याला ना मिळतो विसावा, की ना दिसतात धनाचे हंडे. ज्या कायमच्या ताणाखाली त्याच्या मनाला वावरावं लागतं, त्या मानाने त्याच्या पदरात पडणारं चिमूटभर मानधन म्हणजे पक्षाला उडण्यासाठी अवघं एकच पीस मिळण्यासारखं आहे. अशा वेळी वाचकाचा अंतःस्फूर्त प्रतिसाद मिळणं, म्हणजे लेखकाला सावली लाभण्यासारखंच आहे. वाचक नसलेला लेखक म्हणजे पाण्याचा ठणठणाट असलेल्या विहिरीवर निघालेला तहानलेला माणूस.

दैवाचा अनुग्रह लाभलेला, सातत्य जपणारा मी एक लहान लेखक आहे. घागर घेऊन मी ज्या ज्या वेळी पाणवठ्यावर गेलो, त्या त्या वेळी तिथे ताजं चवदार पाणी झुळकत होतंच. माझ्या प्रायः प्रत्येक लेखाला वाचकांचा प्रतिसाद हा आपोआपच मिळाला. मी लिहिलं आणि वाचकांचा प्रतिसाद मूक राहिला असं आजवर कधी घडलं नाही. माझं आणि माझ्या वाचकांचं हस्तांदोलन सदैव नि सस्मित झालेलं आहे.

माझ्यापाशी वाचकांची शेकडो पत्रं अगदी ह्या क्षणी आहेत, कारण दोन-तीन पथ्यं मी काटेकोरपणे पाळली नि यापुढेही पाळीन. ती म्हणजे, आटोपशीर, बंदिस्त, घाटदार आणि प्रसन्न लिहायचं. आक्रोश करायचा नाही. कुणाचा न्याय करण्याचा बहाणा करायचा नाही. पवित्रा घ्यायचा नाही. रोजच्या रोज अळंटळं न करता पहाटेस उठून लिहायचं. लेखनातलं सातत्य पाळायचं. डफरवायचं नाही. वेळ मारून न्यायची नाही. शॉर्टकट शोधायचा नाही. कासवासारखं पुढे पुढे सरकत राहायचं. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे अशा सरत मेहेनतीतून जे काही लिहून होईल ते शक्यतोवर फार मोठा खप असणाऱ्या आणि दूरपर्यंत पोहोचणाऱ्या नियतकालिकांमधून प्रसिद्ध करायचं. अन्यत्र नाही. महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, पुणे सकाळ, तरुण भारत, केसरी, अशा लाखांच्या संख्येतल्या खपाच्या नि फार दूरपर्यंत रिंगण घालणाऱ्या दैनिकांच्या रविवारच्या पुरवण्यातून मी माझं बहुतेक ललित लेखन केलेलं आहे. हे वळण मी यापुढेही चालू ठेवेन. बदलण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. ह्याचा फायदा असतो नि तो मला पोटभर मिळाला. झटपट लिहिण्याचा सराव झाला. शब्दसंख्येवर आपोआप मर्यादा पडली. प्रासंगिकावरही रंजक लिहिता आलं. लेखननाम सतत वाचकांच्या समोर राहिलं आणि मुख्य म्हणजे लेखन दूरवर पोहोचलं. कलकत्ता, इंदूर, बंगलोर, हैदराबाद, मद्रास, जबलपूर, दिल्ली, ग्वाहेर, अहमदाबाद, अशा महाराष्ट्राच्या बाहेरच्या शहरात त्या दैनिकांचा वावर आहे. त्यामुळे त्या कानाकोपऱ्यातले वाचक मला अनायासे लाभले. सुदैवाने, परदेशातही माझे वाचक आहेत. जपान, स्कॅन्डेनेव्हीया, इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, फ्रान्स, अशा प्रमुख देशात मराठी मंडळी आहेत. ते माझं लेखन तिथे वाचून संतोष तत्परतेने कळवतात. काही मंडळी तिकडून माझी पुस्तकं मागवतात.

'महाराष्ट्र टाइम्स'चा मी अगदी सुरवातीच्या दिवसांपासूनचा लेखक आहे. त्याचा मला अतोनात फायदा झाला. तिथे माझे शेकडो ललित लेख आणि स्तंभ प्रसिद्ध झाले. त्यांच्या एका दिवाळी अंकात मी शृंगेरीच्या श्रीशंकराचार्यांच्या मठावर "जगद्गुरुंचा सोवळा मठ" हा प्रवासवर्णनपर लेख लिहिला. "मासळी भात नि सोलकढी" हा आम्हा सारस्वतांच्या मासळी-प्रेमाचं वर्णन करणारा लेख लिहिला. झालंच तर, "बकुळ फुलं" ही लेख-मालिका लिहिली. "साहित्यसंचार" तर कैक महिने लिहीत होतो. सध्या चार वर्षं "पुस्तक पर्व" सतत लिहीत आहे. इतरही भरपूर लिहितो. हे सगळं मी

धावून धावून लिहिलं. त्याचे पैसे तर मनपसंत मिळालेच, शिवाय फार मोठ्या प्रमाणावर हस्तांदोलन करणारा वाचकवर्ग लाभला. श्रीशंकराचार्यांवरचा माझा लेख एका वाचकाने जपानमध्ये वाचला नि त्याचं कात्रण पुण्यातल्या आपल्या घरी पत्नीला वाचनासाठी पाठवून दिलं! "मासळीभाता"च्या प्रती काढून काही मासळीप्रिय वाचकांनी त्या त्यांच्या आप्तांना इंग्लंड-अमेरिकेत मुद्दाम पाठवून दिल्या! माझ्या ललित लेखांच्या कात्रणाच्या फायली सांभाळणाऱ्या वाङ्मयप्रेमी गृहिणी, माझ्या भाषणांच्या दौऱ्यात वरचेवर भेटतात. हे प्रौढीने लिहीत नाही. वाचकांचं वाङ्मयप्रेम आपल्या अपेक्षेच्या पलिकडे कसं पसरलेलं असतं त्याचा स्पष्ट पुरावा म्हणून हे सांगितलं. लेखकाने शांतपणे नि सातत्याने लिहीत रहावं, बंदिस्त लिहावं, ते मोठ्या खपाच्या नियतकालिकांमधून प्रसिद्ध करण्याचं भान जागृत ठेवावं. वाचक त्यांचं काम करतात. त्यांना आवडणाऱ्या लेखकांना निरपेक्ष प्रेम देतात.

सामान्य रसिक वाचकाप्रमाणेच प्रतिभासंपन्न साहित्यिकांनीही माझं लेखन वाचून पसंतीची टाळी वाजवलेली आहे. माझ्या एकटक ललित लेखनाची सुरुवात खऱ्या अर्थाने 'माणूस' साप्ताहिकातून झाली. तो योग म्हणजे सफळ योगायोगांच्या मालिकेतलं पताकास्थान ठरलं. 'सांस्कृतिक मुंबई' वगैरे किरकोळ स्तंभ तिथे नमुन्यादाखल लिहून झाल्यावर १७-४-१९७१ पासून मी माणूस 'मध्ये 'शतपावली' हे वाङ्मयीन सदर सुरू केलं. हाताशी येईल त्या वाङ्मयीन विषयावर त्या सदरात मी रंगून लिहिलं. संपादकांनीही माझ्या त्या उत्साहाचं चीज केलं. माझ्या लेखनाला उठाव मिळेल अशा धोरणाने प्रसिद्धी दिली. 'माणूस 'मधलं माझं लेखन भाऊसाहेब खांडेकरांच्या वाचनात आलं. ते उत्तम लेखक, तसेच महामना रसिकही होते. मी चांगलं लिहितो आहे आणि काळाची नेमकी नस मला सापडलेली आहे, असं अनाहूत शिफारसपत्र वि. स. खांडेकरांनी परस्परच संपादक श्री. माजगावकर ह्यांना पाठवलं. संपादकांनीही लागलीच ते संपूर्ण पत्र 'माणूस 'च्या मुखपृष्ठावर खांडेकरांच्या छायाचित्रासह प्रसिद्ध केलं. त्याचा मला केवढा दिलासा वाटला म्हणून सांगू! भाऊसाहेब खांडेकर आणि संपादक माजगांवकर, दोघेही सुहृद जणू माझ्या सहाय्याला गुलाबपाणी शिंपडत आले! खांडेकरांच्या चार ओळींच्या त्या पत्राने माझा आत्मविश्वास तर बाढलाच, शंकाच नाही; शिवाय, अनेकांचं लक्ष माझ्या लेखनाकडे वेधलं गेलं. प्रभाकर पाध्ये, पं. महादेवशास्त्री

जोशी, रा. भि. जोशी, वा. ल. कुलकर्णी, गंगाधर गाडगीळ, माधव मनोहर, द. बा. डावरे, रा. प्र. कानिटकर, राम शेवाळकर, पु. ल. देशपांडे, दुर्गा भागवत, ना. ग. गोरे, आ. ना. देशपांडे, आनंद साधले, मंगेश पाडगांवकर, विंदा करंदीकर, व. दि. कुलकर्णी, गो. नी. दांडेकर, उमाकांत ठोमरे, श्री. ज. जोशी, विद्याधर पुंडलीक, जयवंत दळवी, वसुंधरा पटवर्धन, संजिवनी मराठे, सुधा नरवणे, विजया राजाध्यक्ष, गंगाधर पाटील, भीमराव कुलकर्णी, ही सर्व साहित्यसेवक मंडळी माझे वाचक आहेत नि वेळोवेळी त्यांनी आपली खुषी मला अगत्याने कळवलेली आहे. हरिभाऊ मोटे तर एकदा बोलूनच गेले 'पिंगे, माझं प्रकाशन आता बंदच आहे. नाहीतर तुमचं एक पुस्तक मी प्रेमाने काढलं असतं!"

लेखकाला आणखी-आणखी ते काय हवं असतं?

भिन्न भिन्न पातळ्यांवर वेगवेगळ्या घाटांचं लेखन करणारा फार मोठा मित्र-वर्ग माझ्या आजुबाजूला पसरलेला आहे. कुणी संपादक, कुणी समीक्षक, कुणी कवी, तर कुणी कथा-कथनकार. तेही माझे वाचक आहेत. उदा. गिरिजा कीर, गं. ना. जोगळेकर, व. पु. काळे, वंदना विटणकर, अनुराधा औरंगाबादकर, दिनकर गांगल, जोसेफ नोऱ्होना, यशवंत देव, चंद्रशेखर राजे, सुहासिनी मुळगावकर, स्मिता राजवाडे, गंगाधर महांबरे, हरिहर आठलेकर, रंगा मराठे, मेघा काळे आणि शकुन्तला क्षीरसागर, वगैरे. तथापि आम्ही सारेजण एकाच पिढीतले लिहिल्या हाताचे धनी आहोत. आम्ही एकमेकांचं आतुरतेने वाचणारच. खुष किंवा नाखुष होणारच. मला दिलासा ह्याचा आहे की चाळीशीच्या अलिकडल्या उगवत्या पिढीतसुद्धा माझ्या लेखनाला निःसंकोच दाद देणारे नि माझ्या पाऊलखुणा ध्यानात ठेवून मागून मागून येणारेही लेखकलेखिका आहेत. आज ना उद्या ते योग्य त्या स्वतंत्र पाऊलवाटा पकडून धन्य होतील.

ललित लेखनात मला ठळक अशी पारितोषिकं लाभली वगैरे, ठिक आहे. ते चालायचंच. पण वाचकांकडून तीन-चार मोठी हृदयंगम पारितोषिकं लाभली, तीही ओघात सांगून टाकतो.

छापखान्यातले जुळारी अक्षरांचे खिळे जुळवून जुळवून टेकीला आलेले असतात. नको तो लेख नि नको ते मुद्रित-शोधन, अशी त्यांची विमनस्क अवस्था असते. पण 'महाराष्ट्र टाइम्स'च्या दिवाळी अंकात आलेल्या 'वाळूचं तळं तिथे मधाचे पाणी' ह्या माझ्या कच्छच्या रणातल्या प्रवासावर लिहिलेल्या

लेखाने रम्य अनुभव दिला.

तो लेख कंपोजला गेला. पहिली दोन-तीन वाक्यं वाचल्यावर कंपोजिटर त्यात गुंतला नि त्याने कंपोझिंगचं काम बाजूला ठेवून बसल्या-बसल्या सगळा लेख वाचून काढला ! इतक्यावर भागलं नाही. मग त्याने तो लेख दुसऱ्या कंपोजिटरला शिफारशीसह वाचायला दिला. दुसऱ्याने तिसऱ्याला, तिसऱ्याने चवथ्याला नि चवथ्याने पाचव्याला असं निव्वळ वाचायचं चक्र सुरू झालं ! नंतर माझा तो लेख त्या पहिल्या कंपोजिटरकडे आला. त्याने तो कंपोज तर केलाच, पण संपादकीय विभागात निरोप ठेवला की पिंगे आले की जरा आमच्याकडे पाठवून द्या ! भालचंद्र वैद्यांनी तो निरोप मला सांगितला. मी गेलो. मला काहीच कल्पना येईना. वाटलं, लेखाचं एखादं पान मागे-पुढे झालं असेल किंवा गहाळ झालं असेल. म्हणून मी मजकूर पुन्हा लिहून देण्याच्या तयारीने कंपोजिटर्सच्या विभागात गेलो. मी गेल्याबरोबर ते पाच-सहा कंपोजिटर्स गोळा झाले. त्यांनी माझ्या लेखनाची वाखाणणी केली नि वर आग्रहपूर्वक चहा पाजला !

असाच अनुभव 'माणूस'मध्ये 'शतपावली' लिहिताना वारंवार यायचा. तिथे कंपोजिटर्स नि मुद्रितशोधक सांगायचे, तुमचा लेख आम्ही अगोदर वाचून काढतो नि नंतर जुळवायला घेतो. 'बकुळ फुलं' छापतानासुद्धा हाच अनुभव आला. कंपोजिटर्स अगोदर लेख उत्सुकतेने वाचीत. नंतर जुळवीत.

किती लेखकांना छापखान्यातल्या खिळे जुळवणाऱ्यांनी खुष होऊन दिलेला चहा पिण्याचं भाग्य लाभलं असेल ? माझ्या माहितीत फक्त विजय तेंडुलकरांना तेवढा हा अनुभव आलेला आहे.

एकदा कविवर्य सोपानदेव चौधरींनी घरी बोलावून घेतलं. चहापाणी झालं. मग एकदम सद्गदित होवून त्यांनी माझा उजवा हात आपल्या हातात घेतला. खांद्यापासून कुरवाळला नि कापऱ्या स्वरात आशीर्वाद दिला, "पहा, रवींद्र, ह्या हाताने तुम्ही जन्मभर लिहित रहाल. ह्या हाताने जे लिहाल ते उत्तम असेल. ते तुम्हाला जन्मभर पुरेल, कारण ते थेट देवाकडून आलेलं असेल. बाकी गोष्टी येतील-जातील. ह्या हाताने लिहाल ते टिकेल. त्याचं सोनं होईल."

लेखनाचं सोनं होणं, ते टिकणं, वगैरे गोष्टी फार दूरच्या आहेत. तिथपर्यंत नजर पोहचत नाही. पण मी जे काही कलातत्त्वांचं पूर्ण भान ठेवून प्रसन्नतेच्या

पातळीवरचं लिहिलं, त्याला वाचकांनी पावती दिली नाही, असं आजवर कधीही घडलेलं नाही. मी काही पु. ल. देशपांडे नाही, की कुसुमाग्रज नाही, की विजय तेंडुलकरही नाही. आहे तो शंभर टक्के 'रवींद्र पिंगे' आहे. त्या रवींद्र पिंग्यांचंही वाचक प्रेमाने वाचतात हा अनुभव सुख देतो. आणि, त्या आस्थेवाईक वाचकांमध्ये माझे म्हातारे वडिल अग्रक्रमाने होते, ही आठवण स्वर्गसुखाच्या समिप नेते !

□

उजळलेली दिशा

केव्हा उजळतील ह्या दिशा? आयुष्यात धरावं काय नि सोडावं काय, त्याचा अंदाज यायला कबूल नाही. आणि लेखनाचा तर पसारा मांडून बसलोय.

कशासाठी?

'इतर लोक पाहा कसे दोन्ही हातांनी पैसे ओढताहेत, नाहीतर तुम्ही!' हा बहुतेक सगळ्याच मराठी लेखकांना घरोघर ऐकावा लागणारा शेरा खुद्द माझ्याच घरात ऐकून ऐकून माझं डोकं आता बथ्थड झालंय. पूर्वी मी सांगत असे, की मराठी लेखक मिळवून मिळवून असे कितीसे पैसे मिळवतील? वर्षाकाठी चार-दोन हजार म्हणजे डोक्यावरून पाणी गेलं आणि तेही सुखासुखी नाहीतच. ती गंगा अंगणात खेचून आणण्यासाठी ओक्साबोक्सी काम करावं लागतं, जाग्रणं करावी लागतात. त्यापेक्षा दोन वेळा ताकभात चापून आरामात राहावं, वाचावं, भटकावं, करंट आलाच तर आनंदात हिडावं नि जो काही दाम कटकट न होता सुटेल, तो कनवटीला लावून सुखी राहावं, हा उत्तम पक्ष. अरे, ज्याला दोन वेळा पोटभर ताकभात मिळाला, नि ज्याला ब्राह्मी तेल न चोपडता झोप लागते, त्याला आणखी काय हवं? कोरडा आटापिटा करण्यात काय स्वारस्य आहे? बंगालमध्ये 'शंकर' नावाच्या एका नव्या कादंबरीकाराच्या एका लोकप्रिय कादंबरीच्या एकशेतेवीस आवृत्त्या निघाल्याचं परवा कलकत्त्यात ऐकलं, तेव्हा मी थरारून गेलो. म्हटलं, ह्याला म्हणतात पैशांचा पाऊस! भाग्याचा असा मळा मराठीत कुठला आलाय फुलायला? सात कोटींच्या मराठी मुलुखात असलं भरघोस मानधनाचं टपोरं फूल छातीला लावून मिरवायला लेखाकाला मिळणं अशक्यच. फुलाच्या इवलाल्या पाकळीवर समाधान मानायचं वळण आता मनाला पडून गेलंय. आणि, एरव्हीसुद्धा दुसऱ्याचं असतं ते आपलं नसतंच.

अलीकडे तर हा बचावही द्यायचं सोडून दिलंय. कुणी कितीही करवादो, मी जागच्या जागी शांत असतो.

परवा सहज वाटलं, इतर लोक खोऱ्याने पैसे ओढतात, हे तरी खरं आहे काय त्याचा आपण कधीतरी पडताळा घेतला पाहिजे. ज्यांना आपण धनाढ्य म्हणतो, ते कदाचित भांडवल म्हणून पैशांच्या राशी ओतीत असतील, की ज्या आम्हाला दिसत नाहीत. नि त्यातून जे धन निर्माण होतं, ते मात्र आमच्या डोळ्यात भरतं. किंबहुना डोळे दिपतात. त्यामानानं लेखकाचं भांडवल ते काय असतं? आम्ही आमची आख्खी जिंदगी लेखनावाचनात जाळतो, बगैरे वेदान्त मला माहीत आहे. त्याला काही अर्थ नाही. लेखक प्रत्यक्षात जे पेरतात किंवा पेरल्यासारखं करतात, त्यामानानं त्यांना बरं मिळतं. चिमूटभर डावंउजवं होणारच.

योगायोग असा, की माझं हे विचारचक्र सुरू असतानाच एक मित्र आले नि त्यांनी नेमक्या लक्ष्मीपुत्रांच्याच गोष्टी सुरू केल्या. त्यांची घरदुरुस्ती सुरू आहे. त्यानिमित्तानं त्यांच्या घरी बांधकामाचा एक पोरगेलासा कंत्राटदार आला होता. होता राजस्थानातला. मुस्लिम. आमच्या मित्रान त्याला सहज विचारलं, की धंदापाणी सध्या कसं आहे? त्यावर कंत्राटदार म्हणाला, 'देवाच्या दयेनं उत्तम चाललंय. सध्या बाजारात तेजी आहे.'

मित्राला प्रश्न पडला, 'उत्तम' म्हणजे किती उत्तम असेल? म्हणून त्यानं त्या कंत्राटदाराला विचारलं,

'तुझं वय काय?'

'एकोणतीस.' कंत्राटदारानं सांगितलं.

त्यांच्यात नंतर झडलेला नि माझ्यापर्यंत झिरपत आलेला संवाद पुढीलप्रमाणे:

'किती वर्षं धंद्यात आहेस?'

'आमच्या पाच-सहा पिढ्या ह्याच उद्योगात खपल्या. माझा बापही कंत्राटदार होता.'

'तो कुठं असतो?'

'तो केव्हाच मेला. मी तेव्हा जेमतेम पंधरा वर्षांचा होतो असेन.'

'त्यानं डबोलं ठेवलं असणार तुझ्यासाठी.'

'छे-छे! उलट त्यांचं दीड लाखाचं कर्ज माझ्या डोक्यावर आलं.'

'मग तू साफ झाला असशील.'

'अजिबात नाही, मी ते सर्व कर्ज माझ्या हिमतीवर पै-पै फेडलं.'

'कसं फेडलंस?'

'धंदा करून.'

'शाबास!'

'शिवाय, वर तीन लाख रुपये फायदा मिळवला.'

'काय सांगतोस?'

'अल्लाशपथ खरं सांगतोय.'

'मग त्या तीन लाखाचं केलंस तरी काय?'

'बहिणींची लग्नं केली. आत्येला तिचा संसार उभा करून दिला.'

'त्याला असा कितीसा पैसा लागणार?'

'राजस्थानात लग्न म्हणजे पैसा पाण्यासारखा लागतो. किमान एका लाखाची पुंजी नसेल तर तुमची मुलगी मुळी राजस्थानात खपणारच नाही. एक लाख म्हणजे मी कमीत कमी आकडा सांगतोय. आमच्याडे सोन्याचं फार प्रस्थ आहे. शेरांनी सोनं द्यावं लागतं.'

'मग तू पुरता टेकीला आला असशील.'

'अजिबात नाही. मला अजूनही बऱ्याच कौटुंबिक जबाबदाऱ्या आहेत. जवळ जवळ दहा लाख रुपये लागतील. नि देवदयेनं तेवढे माझ्यापाशी आहेतही!'

'हे एवढे पैसे तू कुठून आणलेस?'

'कुठून आणलेस म्हणजे? मी धंद्यात कमावले.'

'दहा लाख रुपये?'

'त्यात काय आश्चर्य आहे? मी चौदा वर्षं धंद्यात आहे नं. धंद्यात इतके पैसे तर कमवावेच लागतात. नाही कमावले, तर माझे भाईबंद मला हसतील.'

'सर्व धंदेबाल्यांजवळ इतकी पुंजी असते?'

'ह्यापेक्षा अधिक असते. आम्ही कंत्राटदार लाखांनी ओततो नि लाखांनी कमावतो.'

'ह्यापुढे काय करणार ह्या पैशाचं?'

'हवेली बांधणार. गावाकडच्या सगळ्या तरुण नातेवाइकांना मुंबईला आणणार नि धंद्याला लावणार. बघालच तुम्ही.'

'तथास्तु! तुझ्या मनासारखं होवो, बाबा!'

'आभारी आहे मी तुमचा. पण तुमचा दुवा मला वेगळ्या कामासाठी हवा आहे.'

'कोणत्या?'

'गावची पोरंबाळं ह्या धंद्यात घालून मी मोकळा होणार नि काहीतरी देवाचं काम करणार. हे दगडाविटांचं काम जन्मभर करण्यात काय बहादुरी आहे, साहेब? पैसे तर सर्वत्र उगवताहेत. मला काहीतरी वेगळं देवाचं काम करायचं. नि मी ते करीन. सराई बांधेन. नाहीतर गावाकडे मशिदीला जोडून मोफत दवाखाना काढेन. आंधळ्यांची शाळा काढेन. काहीतरी करेन. नुसता दगडाविटात मरणार नाही. खूप पैसे पाहिल्येत मी–मला त्याच्या पलीकडे जायचंय–नि मी जाईन. तेवढा दुवा द्या!'

'दिला!'

मित्रानं सांगितलेल्या त्या धनवंतांची ही हकीगत ऐकून मी थक्क झालो.

खरोखर, माणसानं समाधान कशात मानायचं? पैसे गोळा करण्यात, की, त्यांच्या पलिकडल्या अपार्थिव विश्वाकडे नजर टाकण्यात? लेखक म्हणून मी नजर कुठं लावायची? दोन्ही हातांनी मानधनाच्या रकमा गोळा करण्याकडे, की त्याच्यापलिकडे अन्य श्रेय शोधण्याकडे माझा कल हवा?

मला नेमकं समाधान कशानं मिळेल?

त्यानंतर दुसऱ्या दिवशी घडलेली गोष्ट.

मोटार–दुरुस्तीचं गॅरेज टाकून बघता बघता गबर झालेल्या एका नव-श्रीमंताची माझी अलीकडेच ओळख झालेली होती. त्यानं घरी चहाला बोलावलं. मी गेलो.

तो जवान लखपती सांगू लागला.

'पाहा, मी एका शून्यातून ही दुनिया निर्माण करून दाखवली. काय होतं माझ्याकडे? काहीही नव्हतं. फक्त लोखंडासारखं भक्कम शरीर होतं. म्हणून मी थेट सैन्यात शिरलो. चार गावं फिरलो. खपलो. एक दिवस किरकोळ अपघात झाला नि थोडासा लंगडायला लागलो. सैन्यात लंगडणं कसं खपावं? तेव्हा सैन्यातले सुखाचे दिवस संपले. पण फौजी आदमी म्हणून मला सवलती मिळाल्या. आता माझ्यासमोर तीन दिशा होत्या. गावी जाऊन विहिरीवर पंप बसवायचा नि भाजीपाला घ्यायचा. किंवा, गावाकडे एका टूकच्या जिवावर मालाची ने–आण सुरू करायची, किंवा, शहरात रस्त्याच्या कडेला गॅरेज

टाकायचं. मी सरळ शहराची कास धरली. फौजी आदमी म्हणून मला मोक्याची जागा मिळाली. बॉयलर सूट चढवला नि एक पान्हा हातात घेऊन धंद्याची सुरुवात केली. गिऱ्हाईक मिळत गेलं. धंदा वाढला. मग मी मेकॅनिक ठेवले. धंदा वाढतच गेला. बघता बघता वीस वर्षांत मी लखपती झालो. घर घेतलं. गाडी घेतली. बायकामुलांना झोकात ठेवलं. काही कमी म्हणून नाहीच. पाऊल नेहमी पुढेच पडत गेलं.'

'शाब्बास!' मी उद्‌गारलो.

'इतक्यात शाबासकी देऊ नका, ती नंतर द्या.' तो म्हणाला.

'म्हणजे? आता काय जिंकायचं उरलंय तुम्हाला?' मी विचारलं.

'सांगतो. मी इतका धनाढ्य झालो; पण लोक मला ओळखत नाहीत, हा वांधा आहे! नुकताच मी एका गाण्याच्या मैफलीला गेलो होतो. तिथं सर्वांत रुबाबदार कपडे माझेच होते. पण आश्चर्य असं, की श्रोत्यांनी मला ओळखलंच नाही. पण बाजूलाच इतर कलावंत होते. माझ्या मानानं गरीबच. सामान्य. पण श्रोते त्यांना नमस्कार-चमत्कार आदबीनं करीत होते! तेव्हा माझ्या लक्षात आलं, की नुसता पैसा कामाचा नाही; लौकिक हवा. त्याला महत्त्व आहे.'

'तुमच्या धंद्यात तुम्हांला लौकिक असणारच की.'

'तो काय कामाचा? माझ्या क्षेत्राच्या बाहेर माझा लौकिक पसरला पाहिजे, तर खरं! म्हणून मी ठरवलंय, आता आपण चित्रपटनिर्मिती करायची! मी पैसा ओतला की पैसा दामदुपटीनं मिळतो. शिवाय, चित्रपटामुळं माझं नाव बघता बघता दहा तोंडी होईल. लोक मला आपोआप ओळखयला लागतील. अहो, माणसाला चौफेर मान नाही, तर नुसता पैसा काय चाटायचाय? चालता चालता मुजरे पडले पाहिजेत, तर ते खरं!'

पुन्हा मी चक्रावलो.

खरोखर, माणसाला मनातल्या मनात खोलवर कसली तहान लागलेली असते? कसलं श्रेय हवं असतं? आणि हृदयात जपलेल्या त्या श्रेयाचा नि पैशांचा संबंध किती असतो? मान खरेदी करता येतो? श्रेय बाजारात विकत मिळतं?

माझं विचारचक्र सुरू असतानाच उमाकांत ठोमरे आले. बोलता बोलता त्यांनी एक आठवण सांगितली.

'वीणा' मासिकाच्या अमदानीतली गोष्ट.

त्या काळात साहित्याशी संबंधित ते सगळेच कफल्लक होते. मात्र, प्रत्येकजण धुंद होता. काही ना काही निर्माण करीत होता. शिंपत होता.

'वीणा' मासिकाची कचेरी म्हणजे एक जुनाट खोली. तिचाही अवतारच होता. एक संपादकीय टेबल. एक खुर्ची संपादकाला. समोर दोन खुर्च्या नि एक स्टूल पाहुण्यांसाठी. आणि भिंतीवर चित्रकार द. ग. गोडसे ह्यांनी माधव मनोहरांच्या 'एक आणि दोन' ह्या कादंबरीच्या वेष्टनासाठी तयार केलेलं निथळत्या पावसाळी कोकणाचं चित्र. चित्र एकदम साधं. चार-दोन हिरवीगार केळीची पानं. माडा-पोफळीच्या भिजलेल्या झावळ्या. लाल करवंदी कौलारू छप्पर. ओथंबलेलं आभाळ. फक्त इतकंच.

पाहुणे आले, की ठोमरे समोरच्या केरळी मोपल्याकडून कडक चहा मागवायचे. लगोलग, दहा वर्षांचा एक तरतरीत मोपला मुलगा चहा घेऊन हजर व्हायचा नि पाहुणे तो पिऊन टाकेपर्यंत दारात उभा राहायचा. त्याची नजर नेहमी भिंतीवरल्या त्या रंगीत चित्राकडे रोखलेली असायची. एकटक तो ते चित्र पाहायचा.

एकदा खुद्द चित्रकार गोडसेच कचेरीत आले. ठोमरेंनी चहा मागवला. लगोलग तो मोपला मुलगा चहा घेऊन आला. त्यानं पाहुण्यांना चहा दिला नि दारात उभा राहिला. त्याचं सगळं लक्ष भिंतीवरल्या त्या हिरव्यागार वनश्रीच्या चित्रात गुंतलं होतं.

ठोमरेंनी त्या मोपला मुलाला गोडश्यांसमक्ष विचारलं,

'काय रे, तू नेहमी–नेहमी त्या चित्राकडे का बघत असतोस इतकं?'

तो चहावाला पोऱ्या म्हणाला,

'हे चित्र पाहिलं, की मला माझं केरळातलं घर आठवतं. माझं गाव आठवतं.'

हा संवाद ऐकून गोडसे शांत शांत झाले. तृप्तीत ठोमऱ्यांना म्हणाले,

'ठोमरे, मला सर्व काही मिळालं, मानधन भरून पावलं. चित्र काढल्याचे सगळे श्रम आज सार्थकी लागले.'

हे सर्व आठवलं आणि अखेर माणसाला काय मिळावं लागतं नि कलावंताला कसली तहान लागलेली असते, त्याची एक अंधुकशी दिशा, त्या क्षणी माझ्या डोळ्यांसमोर उजळली.

□

ब्रह्मलिखित

वय नकळत वाढत जातं. म्हातारपण छुपी चाल करून येतं. मोठमोठ्यांचा भुगा पडतो, तिथे अंगुष्ठमात्र जिवांचा काय पाड ? एच. जी. वेल्स म्हणजे साक्षात वटवृक्ष. सर्व बाजूंनी डेरेदार वाढलेला आणि सकलांना सावली देण्याचं व्रत आजन्म पाळलेला. त्यालाही जरेनं गाठलं.

वेल्सचं लेखकीय आयुष्य म्हणजे भन्नाट अनुभवांचा खळाळ. विश्वास बसत नाही अशा अनुपम सुखाची फुलं त्यानं जन्मभर वेचली. बालपण तेबढे वजा करता त्याचं उर्वरित आयुष्य हा वसंतऋतूच होता. जगात सर्वात जास्त खप असलेलं पुस्तक अशी बायबलची ख्याती आहे. त्याच्या खालोखाल खपला वेल्सकृत जगाचा रूपरेषात्मक इतिहास ! म्हणचे हिऱ्या-मोत्यांच्या राशीच त्याच्या अंगणात पडल्या. मानधनाच्या टक्क्यांचा तो टापू दूर ठेवला घटकाभर, तरी नवस करून पदरात पडायला कबूल नसतं ते वाङ्मयात नवी वाट पाडण्याचं नि ती निर्धाराने मळण्याचं अमोघ श्रेय वेल्सने मिळवलंच. निव्वळ कल्पनेवर भिस्त ठेवून नव्हे तर उपलब्ध शास्त्रीय ज्ञानावर विसंबून प्रतिभाबळाच्या अंगाने वैज्ञानिक कथासृष्टीचं डोळस सृजन सर्वप्रथम वेल्समहाशयांनीच केलं, अशी आंग्ल वाङ्मयेतिहासात नोंद झाली. त्याने जग-प्रवास केले. सोविएत संघराज्याच्या उदयाचा तो साक्षीदार झाला. समाजवादाची नांदी गाणाऱ्या आद्य बुद्धिवादी खेळियांमध्ये तो प्रमुख होता. स्त्री-सुखाच्या इतक्या नाना परी त्याने विनधास्त संतोषाने नि इज्जतीने भोगल्या, की ती कीर्द वाचून पायाखालची जमीन आज सुद्धा सरकल्यासारखी वाटते ! आणि नीतीग्रस्ततेचा फुकाचा भयाण शाप न भोगणाऱ्या त्याच्या खिलाडू परिवाराने त्या हकिगती निःसंकोच भाषेत लिहून ठेवलेल्या आहेत. वेल्स म्हणे, तुम्ही पावाला लोणी लावायला जेवढा वेळ घेता तेवढ्या निसटत्या क्षणात मी लेखाचा

एक परिच्छेद पुरा करून डॉलर्स खिशात टाकतो! औरस आणि अनौरस अशा दोन्ही संततींना जन्मोजन्मी पुरेल इतकी माया करून त्याने त्यांची व्यवस्था लावून दिली, इतकंच नव्हे तर कुटुंब-कबिल्यातल्या नोकरचाकरांसहित एकूण एकाला आपल्या हातानेच कष्टार्जित इस्टेटीचे भाग तोडून दिले. जिंकायचं किंवा निस्तरायचं अमूक एक राहून गेलं असं वेल्सच्या बाबतीत म्हणण्याची सोय नाही.

महामानवाचं जीवन जगलेला असा हा, चक्रपाणी! मात्र, म्हातारपण त्यालाही चुकलं नाही. त्याच्या त्या अखेरच्या दशेची लीळा वर्णन करताना मॉमने लिहिलं आहे.

'युद्धकाळात वेल्सला मी पाहिलं ते शेवटचं. त्यावेळी मी न्यूयॉर्कमध्ये होतो नि तो अमेरिकेत भाषणांच्या दौऱ्यावर आलेला होता. इंग्लंडला परतण्याच्या अगोदर तो माझ्याकडे भोजनासाठी आला होता. त्याचं म्हातारवय झालेलं दिसत होतं, थकावट जाणवत होती. देह वाकलेला होता. पूर्वीप्रमाणेच तो उसळ्या मारी. मात्र, आता त्यासाठी प्रयास पडत. त्याच्या भाषणबाजीचा बट्ट्याबोळ झाला होता. मुद्दलात तो वक्ता कधीच नव्हता. इतकी हयात त्याने सार्वजनिक सभासंमेलनात घालवली, पण हातात कागद न धरता भाषण करणं त्याला जमलं नाही, हे चमत्कारिकच म्हणायचं. लिहिलेले कागद वाचून दाखवणं त्याला भाग पडायचं. त्याचा आवाज चिरका आणि किनरा होता. वाचताना तो कागदांना नाक भिडवी. श्रोत्यांना त्याचं बोलणं ऐकू जात नसे. साहजिकच ते घोळक्याघोळक्याने सभागृहातून पळ काढीत. वजनदार मंडळींत त्याची उठबस असे. सभ्यतेमुळे ते त्याचं म्हणणं ऐकून घेत, परंतु आपली छाप श्रोत्यांवर पडत नाही हे वेल्सला कळून चुकलं होतं. म्हणून तो खिन्न आणि हताश झाला होता. मला तो म्हणाला, 'त्याच त्याच गोष्टी लोकांच्या कानीकपाळी घालण्याचा घोषा मी गेली तीस वर्षं लावलाय, पण लोक मुळी लक्षच देत नाहीत!' हीच मख्खी होती. तोच तोच मुद्दा त्याने अति उगाळला. त्याच्या बोलण्यात तथ्य होतं. कल्पनाही क्लिष्ट नव्हत्या. पण गटेसारखंच त्यालाही वाटे की सत्याचा पुकारा पुनः पुन्हा केला पाहिजे. साहजिकच, लोकांना ठीक माहीत असलेल्या गोष्टी तो फिरून सुनवू लागला की श्रोते पांगत. वास्तविक, एका पिढीवर वेल्सची छाप होती आणि तिचं मतपरिवर्तन करण्यासाठी त्याने बहुत काही केलेलंही होतं. पण आता त्याची खेळी संपलेली

होती. लोक आपल्याला केवळ 'झाला-गेला माणूस' समजतात हे कळण्याची नामुष्की त्याच्यावर ओढवली. लोक कधी त्याच्याशी सहमत असत; कधी नसत. त्याचं म्हणणं जे ऐकून घेत ते पूर्वीसारखं उत्तेजित होऊन विलकुल नसे, तर आपलंच तुणतुणं वाजवणाऱ्या म्हातारबाबांना थोड्याशा उदार बुद्धीने बागवलं जातं तसं ते त्याचं बोलणं जेमतेम ऐकून घेत. निराश माणसाचं मरण वेल्सला आलं.'

ऋद्धिसिद्धी दारी उभ्या असलेल्या वेल्ससारख्या ताकदवान लेखकाची ही कथा!

जवळपास हाच अध्याय अनेक ज्ञानोपासकांच्या लांबलचक आयुष्याच्या अखेरीस वाचायला मिळतो. आपल्याकडले लोकहितवादी, श्रीपाद कृष्ण, दत्तो वामन आणि पां. वा. काणे हे महामहोपाध्यायद्वय, वगैरे आर्थिक विपदा टाळण्याची दक्षता घेतलेल्या सव्यसाची लेखणीबहादुरांच्या कुंडल्यांमधले योग सांगतात, तुम्ही कितीही बलाढ्य गडकोट बांधा, त्यांच्या भिंताडावरून अलगद उडी मारून तुमचा निरुपाय करणारं अटळ म्हातारपण तुमच्या नकळत तुमच्या अंगणात उतरेल नि यथेच्छ गोंधळ घालील; तुम्ही काडीही हलवू शकणार नाही!

ह्या विपरीतावर मात करणारी दोन प्रसन्न उदाहरणं, उन्हाच्या तोबऱ्यांनी जग भाजून निघत असताना त्याच ज्वाळात जास्वंदीचे झेले तेवढे टक्क फुलून झुलावेत, तशी कायमचा दिलासा देणारी आहेत.

निरभिलाष थोरोने खुद्द जरेलाच गुंगारा दिला! त्याने म्हातारपण टाळलं आणि आयुष्याच्या धारेतून जिवंतपणी लोकसंपर्क कटाक्षाने बगळला. प्रचलितात न गुरफटलेला एकांडा थोरो लोकांचं काहीही देणंघेणं लागत नव्हता. फक्त बालपण आणि तारुण्य ह्या दोनच दशा त्याने अनुभवल्या. सतत स्वतःला रुचेल तेच लिहिलं. सत्याग्रहाचं अमोघ हत्यार स्वतः पाजळून नंतर दुनियेच्या स्वाधीन केलं. ज्याने गेल्या शतकात पेरलं ते अजून पसापसा उगवतंय, असा हा प्रज्ञाशाली योगी! त्याने नातं जोडलं थेट निसर्गाशी आणि तो मूक नि आपल्याच आत आत बघणारा झाला. त्याचे शब्द आहेत :

'By my intimacy with nature I find myself withdrawn from man. My interest in the sun and the moon, in the morning and evening, compels me to solitude.'

निसर्गाशी थोरोनं नातं जोडलं. त्याच्या मोहिनीत तो रममाण झाला नि ऐन तारुण्यातच निसर्गात शांतपणे विलीनही झाला. त्याने जिंकलं.

किटकिट करणाऱ्या म्हातारपणाला परस्पर निरोप दिल्याचं आणखी एक सदासुंदर उदाहरण आहे.

फ्लोरा रॉबसन ही उमेदवारीत किडुकमिडुक करून पुढे लौकिकाच्या झगमगाटात आलेली थोर ब्रिटिश नटी. रंगभूमीची ती निस्सीम सेवक. पुढे सम्राज्ञीने तिला उच्च किताबही बहाल केला. मिस फ्लोरा उत्तरार्धात डेम फ्लोरा रॉबसन झाली. केनेथ बॅरो ह्या नाट्यसमीक्षकाने 'फ्लोरा' हे तिच्या जिन्दगीवर प्रकाश टाकणारं चरित्र लिहिलं. फार फार वाचनीय आहे ते.

फ्लोरा रीतीप्रमाणे अडुसष्टाव्या वर्षी, म्हणजे म्हातारपणाच्या उंबरठ्यावर रंगभूमीवरून निवृत्त झाली. तसं तिने जाहीरही केलं. तथापि तिच्या कलागुणांबर आषक असलेला प्रेक्षकवर्ग जागृत होताच. डेमच्या निवृत्तीचा हेतू त्या ब्रिटिश प्रेक्षकांनी मंजूर केला नाही. तिला पुनः पुन्हा तोंडाला रंग फासायला लावलं. रसिकांच्या मिडेस्तव तिनेही म्हातारपणात यशस्वी पुनरागमनाचा अध्याय प्राणांचा ब्रह्मदेव करून लिहिला. तथापि, इतपत उडी अनेक लोकप्रिय कलाकार मारतात. डेम फ्लोराचा अभिजात विशेष असा की रसिकांच्या सक्रीय प्रेमामुळे तिने कधीही आपला गैरसमज होऊ दिला नाही. हेही दिवस पालटणार आहेत, ही मर्माची गोष्ट ती विसरली नाही. ना ती मातली, ना ती उतली. त्यामुळे वार्धक्य तिची फजिती करू शकलं नाही. अंगच्याच शहाणपणानं तिने मनाला बजावलं,

'I know it will all be over soon, and everyone will forget about me. I know I have always been respected by my public, but I have never been loved.'

मानसन्मान आणि प्रेम ह्यातला सूक्ष्म फरक कळण्याइतपत शहाणपण नि असाधारण भान कितीजणांना लाभतं ?

□

कदंब : दुर्गाबाईंचा आणि माझा

अगदी सकाळी सकाळी दुर्गाबाईंचा फोन आला. जरा चकित झालो. म्हटलं, असं दिवस उगवताना बाईंनी काय काम काढलं असावं? तर्क चालेना. फोन उचलला, तर बाई पलिकडून तरातरा सांगू लागल्या;

'अरे, तुमच्याकडे कदंबावर भाषण कुणी केलं? मी ऐकलेलं नाही. पण माझी मैत्रिण म्हणाली की पुण्याहून कोणी तरी कदंबावर बोललं. कोण बरं असेल?'

'मला काहीच कल्पना नाही'; मी सांगितलं, 'मी पुण्याहून सगळी माहिती मिळवितो नि तुम्हाला कळवतो. पण मध्येच ही कदंबाची कशी काय आठवण झाली तुम्हाला?'

'मी कदंबावर लिहित्येय. त्या फुलझाडाची आपण मंडळींनी पूर्ण उपेक्षा केलीय. पण पुण्याहून त्याच्यावर एक भाषण झालं ही किती नामी गोष्ट आहे! मला वक्त्याचं नाव, गाव कळव. मी लिहिते त्याला. अरे बाबा, कुठे काय हाताला नवीन लागेल सांगता येत नाही. तर, तेवढं कर.'

बाईंची ही ज्ञानलोलुपता, जिज्ञासा, पाऊणशेच्या पटात पाऊल टाकताना! मी चकित नव्हे, खजिल झालो.

कचेरीतून फोनाफोनी केली. छडा लागला. मग बाईंना कार्ड टाकलं, डेक्कन कॉलेजच्या संस्कृत शब्दकोशात कुणी मालती गोखले म्हणून विदुषी आहेत, त्या पुणे आकाशवाणीवरून कदंबावर बोलल्या.

प्रकरण संपलं. पण पुरतं निकालात निघालं नाही. चोरपावलांनी शिरलेला कदंब माझ्याही मानगुटीवर बसला. मी आठवू लागलो की, कदंब कधी कुठे आपल्याला दिसला काय? फुलाचं नाव तर परिचित आहे, पण आजवर देखलेला तर नाही, हे कसं काय? कोकणात तसे दुर्लक्षित वृक्ष रग्गड आहेत.

तामन आहे, कांचन आहे, अर्जुन आहे, गोरखचिंच आहे. आणि खुद्द माझ्याच वाडीत बांबूच्या जाती तर दर्यामे खसखस आहेत ! पण कोण मोजदाद ठेवतो त्यांची, नि कशाला ? झाडं लावा, ही ओरड तशी आजची नाही. शंभर वर्षांपूर्वी डॉ. भाऊ दाजी लाडांनीही तोच आकांत केला. देशी झाडांची रीतसर नोंद केली. त्यांचे औषधी गुणधर्म सांगितले. वृक्षांचा महिमा वर्णिला आणि गप्प बसले नाहीत. एक पाऊल पुढे जाऊन त्यांनी शास्त्रीय दृष्टीने वृक्षारोपण केलं. राणीच्या बागेत चालून चालून पाय दुखल्यावर आपण अंमळ झाडाच्या सावलीला बसतो, ते भाऊ दाजींचं हातझाड असू शकतं. त्या माणसापाशी ती नजर होती. आणि कदंब तर मी, त्याच भाऊदाजींचा जातभाई असून धड पाहिलेलासुद्धा नाही ! अजब आहे.

बालपणापासूनच्या आठवणींचा उपसा केला तेव्हा लक्षात आलं, कदंब सर्वप्रथम मला सोहिरोबांच्या पदात भेटला होता. कोकणात झोपाळ्यावर बसून बायका गाणं गात :

येई बा, हरि सांवळिया !
कदंबाचे तळी मुरली वाजतां ऐकुनी
येती मज कळवळिया
सर्व रूपी तूचि एक देखोनि सोहिरा
म्हणे गातो लळिया
येई बा, हरि सांवळिया !!

पुढे कृष्णलीलेच्या संदर्भात कदंब सतत आडवा यायचा. 'गीतगोविंदा 'त तर त्याची मैत्रीच झाली. दिसला मात्र कधीच नाही.

दुर्गाबाईंचा फोन आल्यापासून कदंबाच्या दृष्टभेटीची तहान लागली. कसा असेल तो ? केवढा असेल ? कधी फुलत असेल ?

चार जाणत्यांना मी पत्रं टाकली. तेव्हा खुद्द मालती गोखल्यांनीच कळवलं, दादरला मकरंद सोसायटी आहे. तिच्या आवारात 'शिरीष' नावाची वास्तू आहे. तिच्या पिछाडीला जो वृक्ष आहे तोच कदंब असू शकेल.

चलो मकरंद सोसायटी !

तिथे गेल्यावर वेगळीच कृष्णलीला झडली ! तिथे नाटकवाल्यांचा छबिना उभा होता. ते म्हणाले, 'ह्या दुर्गाबाईंच्या नादाला कशाला लागता ? ती पोथ्यापुराणं त्यांची त्यांना वाचू देत. आपण नाटकवाले ! आपलं काय देणंघेणं

आहे त्या कदंबाशी ? चला थिएटरवर. किती दिवसात तुम्ही दिसलेले नाहीत रंगपटात ! अशी वहिवाट विसरून कसं चालेल ? चला.'

बोंबला !

नंतर महिना उलटला आणि खुद्द दुर्गाबाईच अकस्मात भेटल्या. दुपारचे दोन वाजलेले होते. पण ऊन जाणवत नव्हतं, कारण दिवस पावसाळी होते. आभाळ भरून आलेलं होतं.

दुर्गाबाई फार वाळल्या आहेत. पूर्वी तरतरीत डेलियासारख्या डोळ्यात भरायच्या. आता दुर्लक्षित वेलीसारख्या मलूल भासल्या.

मी कादंबाचा विषय काढला मात्र, त्यांचे डोळे एकदम ताऱ्यासारखे लुकलुकले. वाणीत बळ संचारलं. भडाभडा सांगू लागल्या,

'एकूणचाळीस सालापासून मी कदंबाचा पाठलाग करत्येय. महाभारतात उल्लेख होता, पण ते झाड कुठे दृष्टीस पडत नाही, हा काय प्रकार आहे ? काही ठाव लागेना. मग न. र. फाटकांकडे गेले. म्हटलं, 'मला कदंब दाखवा. फाटक म्हणाले, 'तुला कशाला हवाय तो ? कदंब हा कल्पनिक वृक्ष आहे. तीन-चार हजार वर्षांपूर्वी तो कदाचित होताही असेल. नंतर नष्ट झाला. आता उपलब्ध नाही.' पण माझं समाधान होईना. अरे, शतकानुशतकं कवी, महाकवी कदंबाची गाणी गाताहेत, नि तो नाहीसा झाला ? हे शक्य नाही. तो जवळपासच असला पाहिजे. फक्त आपल्याला त्याची दाद नाही. मग मी पुन्हा बौद्धांचं वाङ्मय वाचलं. जैनांचं वाचलं. तो वृक्ष तिथेही होता. मग असा गेला कुठे ? मी भाऊ दाजींचे रेकॉर्डस् पाहिले. तिथेही तो नोंदलेला आहे, मग गेला कुठे ? अरे, आपली देशी झाडं नष्ट होताहेत, त्याची ह्या देशात कुणालाच लाज कशी वाटत नाही ? मी कानीकपाळी ओरडल्याय लोकांच्या की, वनसंपत्तीचा आपला वारसा थोर आहे. तो जपा. ह्या भूमीला आणखी एक भाऊ दाजी लाड मिळायला हवा ! कदंब दिसत नाही ह्याचा अर्थ काय ? इतक्यात आमच्या एका सूनबाईचं डोहाळे जेवण निघालं. तर तिच्या माहेरची माणसं म्हणाली 'आपण कदंबाच्या पानांवर जेवण करू !' ह्याचा अर्थ कदंब जिवंत आहे ! आणि, तसा तो कोकणात सापडलाही ! आता दोन-चार झाडं इकडे तिकडे दिसताहेत. चल तुला आत्ताच्या आत्ता दाखवते कदंब !'

आमची वृक्षदर्शनयात्रा सुरू झाली. नरीमन टोकापासून आम्ही निघालो,

घुमत घुमत 'योगक्षेम'च्या समोर शासकीय बराकी आहेत, त्यांच्या फाटकापाशी आलो. तिथे आरे गौळीवाड्याचा दुधाचा ठेला आहे. तिथे उभे राहिलो. वाटेत शे–दोनशे वृक्षांचा नि त्यांच्या वंशाचा पंचनामा बाईनी यथाशास्त्र केला होता. त्या दुधाच्या ठेल्याजवळ बाई म्हणाल्या, 'आता मान वर करून बघ. दिसतंय ते झाड कदंबाचं आहे.'

मी गार पडलो !

आकाशवाणीच्या परिसरातल्या हया झाडाखाली मी मोजून पाच हजार वेळा उभा राहिलेलो असेन ! अजूनही जनता तिथे सावलीला उभी राहाते नि पान-तंबाखू चोळते. कचेरीतल्या माझ्या खिडकीतून हा वृक्षराज मी रोज सांजसकाळ पाहतो. लक्षावधी चाकरमाने तो येताजाता पाहतात नि तो चक्क कदंब असतो ! आणि आम्ही तमाम सगळे ठार वृक्षांध असतो !

नंतर बाईंनी आपल्या संकल्पित ग्रंथाची रूपरेषा सांगितली. झाडांमाडांबद्दलचा त्यांचा शास्त्रपूत उमाळा मला बिलकूल नवीन नव्हता. मागे त्या आकाशवाणीवर यायच्या तेव्हा एकदा सहज म्हणून गेल्या होत्या, 'अरे, एकेका झाडावर बोलण्यासारखं खूप आहे. हरएक झाडाचे संदर्भ आपल्या वाङ्मयात आढळतात. प्रत्येकाला इतिहास आहे. गोत्र आहे. नुसत्या फणसाच्या झाडावर मी एक भाषण देईन तुमच्याकडे. बोललं पाहिजे फणसावद्दल.'

खरं आहे. दुर्गाबाई तुम्ही फणसावद्दल फर्मास बोललं पाहिजे; मी ते माझी पुण्याई पणाला लावून ध्वनिमुद्रितही करायला हवं. दरम्यानच्या काळात कारल्याच्या वेलाला जरा फूल लागू दे.

दुर्गाबाई गेल्या, आणि डॉ. पु. ज. देवरस उगवले. ते म्हणजे चालता-बोलता ज्ञानकोश. मी म्हटलं,

'डॉक्टर, आज अजब घडलं ! मी कदंब पाहिला. मला तो दुर्गाबाईंनी दाखवला. ते दुर्मिळ झाड कुठेच नाही म्हणतात.'

देवरस ताडकन उद्गारले, 'कोण सांगतो कदंब दुर्मिळ आहे म्हणून ? माझ्याबरोबर वापीला चला, मी कदंबांचं रान दाखवतो ! आणि तुम्ही ह्या परिसरात पाहिलीत म्हणता ती झाडं मी पाठपुरावा केला, म्हणून शासनाने लावलेली आहेत. कदंब ह्या भूमीतला वृक्ष आहे. कोकणात तो आहे. पण आपल्याकडे एकूणच सृष्टीकडे उपेक्षेने बघण्याची रीत पडल्याय. सगळीकडे राजनीती शिरजोर झाल्याय, त्याचा हा परिणाम आहे. झाडांचं महत्त्वच कोणाला कळत नाही.'

'कदंब आणखी कुठे आहे म्हणता?'

'पाहिजे तिकडे आहेत! खुद्द आमच्या साहित्य सहवासात माझ्याच खिडकीला लागून आहे!'

हा शुद्ध षटकार होता!

संस्कृत महाकाव्यापासून कोकणातल्या सोहिरोबांच्या पदांपर्यंत सर्वत्र संचार करणारा आणि दुर्गाबाईंना हुलकावण्या देणारा कदंब, साहित्यिकांच्या छावणीत निमूटपणे फुलत असतो, आणि रसिक म्हणवून घेणाऱ्या आम्हा लेखकांना त्याची गंधवार्ताच नसते! किती खोटी माणसं आहोत आम्ही!

त्यानंतर पुन्हा पंधरा वीस दिवस लोटले. श्रावण लागला. सूर्याने आश्लेषा नक्षत्रात प्रवेश केला. वाहन बेडूक होतं. समीकरण जुळून आलं आणि श्रावण-सरी धो धो बरसू लागल्या. मला कदंबाची पुन्हा आठवण आली. ऑफिसमधून मी उठलो नि श्रावणसरीत चिंब भिजलेला तो मागीलदारचा वृक्षराज बघायला ऐन पावसातच निघालो. पाहतो तर कदंब आरपार फुलून गेलेला होता! कंच हिरवा त्याचा पर्णसंभार नि त्याला लागलेली चेंडूसारखी गोलगोल सफेत केसराळ फुलं. शे-दोनशे घोस सहज असतील. पण सगळी फुलं उंचावर लागलेली. हाती लागायला कबूल नाहीत. त्यांचा मंद सुवास हवेत मुरला होता. तो हुंगून घेतला. दिलखुष झालो.

कामधाम आटोपून निघतो तर चर्चगेटजवळ एक गुजराती गुमास्ता हातात कदंबाची फुललेली ताजी डहाळी घेऊन कुठेतरी झपाझप चाललेला दिसला! ह्याचा अर्थ उघड आहे. चर्चगेटच्या परिसरात कदंबाचा बहरलेला वृक्ष आहे नि त्याच्या फांद्या हाती लागण्याइतक्या खाली वाकलेल्या आहेत!

ते आश्चर्य खिशात ठेवून लोकल पकडली. घरी परतलो. तर पत्नी म्हणाली,

'अहो, आता मार्केटमध्ये तुमचे राजाभाऊ गोखले भेटले होते. त्यांच्या हातात फुलांचे गोल गोल झुपके लागलेली फांदी होती. विचारलं, तर म्हणाले, ही कदंबाची फुलं आहेत.'

म्हणजे, जिथे मला जन्म काढायचा आहे त्या आमच्या पार्ल्यातही कदंबाचं झाड मोहरत आहे!

आता फक्त तो साहित्य-सहवासातला डॉ. देवरसांच्या खिडकीजवळ उभा असलेला कदंबराज तेवढा पहायचा शिल्लक होता. म्हणून त्यांच्याकडे गेलो. ते म्हणाले,

'मी शासनाला सांगितलं अरे ठिक आहे रे, तुम्ही नव्या विधानभवनाच्या उद्घाटनाला मराठी संस्कृतीला साजेलसं इंदिराबाईंना नऊवारीत आणणार ते, पण त्यांच्या हातून चांगली मोहरणारी झाडं तरी लावून घ्या ! झाडं लावणं महत्त्वाचं आहे. आज पंतप्रधानांनी झाडं लावली तर लाजेकाजेस्तव इतरही लोक झाडं लावतील. शेवटी होय नाही करता करता कदंबाची चार रोपं त्यांनी नव्या विधानभवनाच्या आवारात लावली आहेत. चला, आपलं तेवढंच काम झालं.'

'ही रोपं तुम्हाला मिळाली तरी कुठे ?' मी विचारलं.

'गुजरातेतून आणली. गुजरातेत अजूनही कदंब जोरात आहे. पूर्वी मथुरेपासून राजपुतान्यापर्यंत सर्व जंगल होतं. राजस्थानातल्या जंगलात तर गेंडा हिंडत होता ! दोन हजार वर्षांमागे राजस्थानात जंगलाची क्रूर कत्तल झाली. अनेक झाडं गेली. त्यात कदंबाचं रानही गेलं. गेंडाही गेला. आणि आज उरलं आहे राजस्तानचं कोरडं वाळवंट ! कदंब ह्या भूमीतला आहे. फोफावणारा आहे. पण ऐकतो कोण ? पहा, मी तुम्हाला शंभर रोपं भेट म्हणून देतो. पन्नास कदंबांची नि पन्नास कैलासपतींची. भराभर वाढतील नि घमघमतील. घेता जबाबदारी ?'

मी विषय बदलला. मग तेच म्हणाले, चला, आपण कदंबाच्या सावलीला जाऊ या.

दुपार झाली होती. ऊन कडक पडलं होतं. कदंबाच्या सावलीत मात्र गार वाटलं. झाड उंचच्या उंच गेलं होतं नि आडव्या कृश फांद्या पूर्ण चक्राकारात शिस्तशीर पसरल्या होत्या. प्रसादासाठी हात पुढे करावेत तशा झेपावल्या होत्या. फुलांचा मोसम नव्हता. पानं मात्र फणसाच्या जातकुळीतली, पण रुंदट वाटली. रंग हिरवा कंच आणि आभाळाला भिडलेल्या अगदी उंचावरल्या फांदीवर कोकिळेने आपलं घरटं बांधलेलं होतं. ते तिथे होतं, त्यानं समाधान रसवत्तर झालं. मनात आलं, कदंब वंशाच्या राजांनी कोकणावर नि गोव्यावर राज्य केलं होतं. त्यांनीही प्रजेला असाच उदार आधार नि सफल आश्रय दिला असेल ! झाडाने नुसतं वाढायचं नसतं, नुसतं फुलायचं नसतं. राजवंशाप्रमाणे कुणाला तरी आधार, आश्रय द्यायचा असतो. सौंदर्य हवं तसं औदार्यही हवं. दोहोंचा संतुलित मिलाफ म्हणजे जीवनसाफल्य.

□

शुभारंभ

तुमच्या घराला गच्ची आहे काय? असेल तर कामधाम आटोपल्यावर नि भोवती सामसूम झाल्यावर, जरा वर गच्चीत या. एकटंच बरं का. आणि जरा स्वस्थ बसा. अंग सैल सोडून बसल्यावर आपोआप तुम्ही वर आभाळाकडे पहाल. दूरच्या डोंगररांगांकडे बघाल. तुमच्या मनात येईल, केवढं हे विस्तीर्ण विश्व! आणि त्या सनातन पसाऱ्यात आपण तर शुद्ध कणवत; अफाट सरोवरातली एक मासोळीच जणू. ज्याच्यामागून आपण दिवसभर धापा टाकतो त्याला खरोखर काही अर्थ आहे का? काय केले तर आपला अहंकार विझेल नि हपापणं संपेल? विराटापुढे नम्र होणं असंच खोलखोल पाझरत गेलं तर आपण जन्माचे सुखाला लागू! निदान माझी तरी तशी भावना आहे.

मी पार्ल्यात राहातो. ह्याचा अर्थ पन्नास टक्के लढाई मी अगोदरच जिंकली आहे असं पार्ल्याबाहेरचं जग मानतं. ते अगदीच खोटं नसावं. विशेषतः, माझी वस्ती पार्ल्यातल्या झाडामाडांनी झाकलेल्या परम शांत कोपऱ्यात आहे नि शिवाय शेजारच्या इतर इमारती तिच्यावर उंच फडा उगारून रागाने पाहात नाहीत, हीसुद्धा भाग्याचीच बाब. रोज रात्री मी गच्चीत वावरतो. चालतो. फेऱ्या घालतो. बसतो. पुटपुटतो. कधीमधी गातसुद्धा असेन. आणि, दर वेळी आकाशाच्या घुमटाखाली एकच एक विचार अंकुरतो मनात: अरे, ही दुनिया केवढी नि मी केवढा? ह्या वातावरणात आपण पृथ्वीतलावर असलो काय, नि नसलो काय, सारखंच. तेव्हा, जे काय चार दिवस जगायचं ते भलेपणा जोडीत नि त्याची शेखी न मिरवीत जगूया की. आज मी इथे आहे हे सत्य आहे. नि उद्या मी इथे नक्कीच नसेन ही त्या नाण्याचीच दुसरी अदृष्ट बाजू आहे. चित्र इतकं स्वच्छ आहे तर बेटा कामाला लाग की!

ते तेवढं घडत नाही! माणसांच्या जगात उतरलं की माणसांसारखंच वागावं लागतं : पड्रिपूंना कुरवाळीत, समजावीत, हर्षखेदांसकट रोजची लढाई खेळावी लागते. मन आकुंचन पावतं, आक्रसतं. लहान होतं. आणि लहाणपणात मग्न होतं. वरचं विशाल आभाळ वर राहातं नि पायाखालची धरणी तिच्या विकट वास्तवासह प्राप्त होते. खोटंनाटं करीत मी माझं एकपदरी आयुष्य जगत असतो.

कधीतरी मग मधूनच आश्चर्याचा धक्का बसतो. अगदी रोजच्या स्पर्धिष्णू जगातसुद्धा निरपेक्ष, निस्वार्थ, आणि चांगुलपणाने शिगोशीग भरलेल्या गोष्टी दिसतात. वरकरणी किरकोळ; आतून पुलकित.

उपनगरात राहातो, चाकरमान्या असतो आणि आठ-बावीसची फास्ट लोकल पकडीत नाही, असा आसामी शोधूनही सापडायचा नाही. शिळ्या पाण्याचा हंडा ओतून टाकावा तशी आमची उपनगरं रोज सकाळी रिकामी होतात. माणसं मार्गी लागतात. सर्वांचाच हा रोजचाच अनुभव असतो. मीही त्याला अपवाद अर्थात नाही. तर असा मी आठ-बावीससाठी उभा होतो. त्या दिवशी वानखेडे स्टेडियमवर मॅच होती. साहजिकच नेहमीच्या चौपट-पाचपट गर्दी होती. माणसं टपावर चढली होती. दोन डब्यांच्या मधल्या फटीत घुसली होती. खिडक्यांना लोंबकळत होती. आणि नेमक्या त्याच गाडीला मुक्या नि बहिऱ्या शाळकरी मुलांची एक छोटीशी टोळीही गाडीत प्रवेश मिळवायला फलाटावर उभी होती. त्यांच्या हातात शाळेची दफ्तरं होती, त्यावरून त्यांच्या परीक्षा होत्या हे मी ताडलं. मला त्या लहान जीवांची दया आली. म्हटलं, जिथे आमची डाळ शिजत नाही तिथे ही सर्वस्वी अपंग मुलं काय करणार? माझी तर खात्रीच झाली, ह्या मुलांना तासभर तरी गाड्या सोडाव्या लागतील नि तोंडं उघडी टाकून असहाय्यपणे ताटकळावं लागेल. प्रत्येक लोकलमधला गार्डाच्या डब्यातला अर्धा भाग रेल्वे निव्वळ अपंगासाठी का राखून ठेवीत नाही, असा अव्यवहार्य विचारसुद्धा मला चाटून गेला.

इतक्यात माझ्या डोळ्यादेखत चमत्कार घडला.

तुडुंब भरलेल्या त्या गाडीचा गार्ड शांतपणे फलाटावर उतरला. त्याने त्या पाच-सहा बहिऱ्या मुक्या मुलांना गोळा केलं नि आपल्या डब्यात त्यांना चढवलं. त्या मुलांच्या आनंदलेल्या नजरा मला क्षणभर दिसल्या. ती उचंबळून आलेली मुलं गार्डाच्या डब्यात शिरली. नि त्यांच्या भाषेत एकमेकांना खाणा-खुणांनी काही तरी सांगू लागली. गाडी हलली. मी फलाटावरच उभा! पण

मला फार संतोष झाला होता. मी गार्डला म्हणालो, 'थँक्स!' तर गार्ड हसत म्हणाले, 'अहो, आपलीच लेकरं आहेत ही!'

विश्वास ठेवा, तो माझा दिवस विलक्षण सुखात गेला. निरपेक्ष चांगुलपणाचा श्रीकार टाकला गेलेला मी माझ्या डोळ्यांनी पाहिला, हे केवढे माझं भाग्य! ती मुकी नि बहिरी शाळकरी बाळं माझी कुणीच नव्हती. तो गार्ड त्या मुलांचं छदाम देणं लागत नव्हता, ती मुलं गार्डाला ओळखीत नव्हती. आणि गार्डने जे कृत्य केलं, ते रेल्वेच्या शिस्तीत तर अजिबातच बसत नव्हतं. किंबहुना, गार्डाने आपल्या डब्यात प्रवासी घेऊन चढणं एका परीने उघड-उघड नियमबाह्य आणि वरिष्ठांच्या लेखी आक्षेपार्ह कृत्य होतं. पण ते गार्डाने करुणेच्या हाकेसरशी क्षणार्धात केलं होतं. तो गार्ड, ती शाळकरी मुलं नि मी, की ज्यांच्यात एकमेकांशी बाह्यतः काहीच बंधन नव्हतं, ते एकाच वेळी केवळ एका सत्कृत्याने सांधल्यामुळे माझी गाडी चुकल्याची मला पर्वा नव्हती. पाच मिनिटं कचेरीला उशिरा पोहोचलो तर आभाळ कोसळणार नव्हतं. वाचासुख हरवलेली ती असहाय्य मुलं मात्र सुखरूप पुढे जाणं अगदी अगत्याचं होतं नि तसं घडलं होतं.

त्या क्षणापासून माझा तो दिवस तरी बदलत गेला!

कालबाह्य नीतिनियमांविषयी मला मुळातच आदर कमी. माणूस मोठा. सुख श्रेष्ठ. समाधान पवित्र आणि हे तीन घटक एकत्र यावेत म्हणून नियमांच्या साखळ्या केलेल्या असतात. पण कुणाचा तरी अविवेक उसळतो, नि कुणाची तरी हडेलहप्पी जागृत होते. ते साखळ्या अधिक जड करतात. अधिक करकचून बांधतात. कशासाठी, हे धड त्याचं त्यालाही कळत नाही.

सारखं सारखं मला आठवू लागलं, की जगण्याच्या ह्या नियमबद्ध चक्रात कितीतरी चांगल्या गोष्टी करावयाच्या आहेत नि त्या तशाच राहून गेल्या आहेत! गोष्टी तशा वरकरणी क्षुल्लक आहेत. परिणामी मात्र जगण्यातली कृतार्थता अनुभवाला आणून देणाऱ्या आहेत.

किती गोष्टी करावयाच्या राहून गेल्या आहेत!

माझ्या परतण्याची वाट पाहणाऱ्या घरातल्या मांजराच्या पाठीवरून हात फिरवायचा राहून गेलाय. घरी पाऊल टाकलं की असेल नसेल तिथून मांजर येतं नि पायात गुरफटतं. अंग घासतं. पावलांना मस्तक चोळतं. उलटं पालटं होऊन बागडतं. नि मी त्याला धुडकावून लावतो. पायांनीच दूर सारतो! हे

असं उलट्या काळजाचं वागणं यापुढे बंद. जो जीव प्रेम देतो, त्याची परतफेड करणं हे इथून आपलं कर्तव्य-क्रमांक एक!

मध्यंतरी राजकीय सत्ता भोगून गेलेला एक वरच्या पातळीवरला कार्यकर्ता, निरर्थक रस्सीखेचीत शक्ती आटवून न टाकता, सध्या नगर जिल्ह्यातल्या दुष्काळी भागात झाडं लावण्याचं एकाकी काम एकहाती करतो आहे. उजाड, बोडके माळ हिरवे होण्याचं स्वप्न कष्टपूर्वक तो फुलवीत आहे. नगरच्या दुष्काळाचा प्रश्न अवाढव्य आहे. त्याला अनेक पापुद्रे आहेत. भौगोलिक आहेत, तसेच राजकीयही आहेत. एका पक्षाच्या माणसाने लावलेली झाडं दुसऱ्या पक्षाच्या माणसांनी उपटून टाकणंही अशक्य नाही. तरीही एक पेरता माणूस भगभगीत भूमी पल्लवीत करू पाहातोय नि मी इथून हे नुसतं पाहातोय! आता दोन तीन गोष्टी लागोलग करायच्या. एक : त्याला कृतज्ञता सांगणारं पत्र लिहायचं. दोन : त्याच्या कामाला वेळीच लेख लिहून प्रसिद्धी द्यायची. सत्कार्याची बुज राखायची.

आणि क्रमांक तीनचं काम : प्रेमाने केलेले वायदे पुरे करायचे! शब्दांच्या देवाण-घेवाणीला सफल करायचं, अर्थ द्यायचा.

कोकणातल्या सार्वजनिक ग्रंथालयाने माझ्याकडे पुस्तकांची मागणी केल्याला नि मी आनंदाने होकार भरल्याला आता वर्ष लोटलं. माझ्याकडे नको इतकी वरकड पुस्तकं दाटीवाटीने गोळा झाली आहेत. एक प्रकारचं ओझंच ते. ती पुस्तकं कोकणात जाणाऱ्या ट्रकवर लादून द्यायची आहेत. बंदीवासातून मोकळं करून माझ्याकडल्या पुस्तकांना मोठ्या संख्येने वाचक लाभून द्यायचे आहेत. म्हणजेच, एकापरीने त्या ग्रंथकर्त्यांना न्याय मिळवून द्यायचा आहे, निरपेक्षपणे.

आजवर अनेक लेखकांचं उमाळ्याचं लेखन वाचून मी सुखावलो. पाणी पाजलेल्या रोपासारखा तरतरून आलो. काही लेखकांचं लेखन वाचून तर मी स्वतःच लिहिता झालो. आस्ते आस्ते माझ्या नावावर चार अक्षरं जमा झाली. प्रभाकर पाध्यांचा कित्ता समोर नसता तर मी लेखन केलं असतं? ऋणातून उतराई होण्यासाठी त्या प्रेरक लेखकांची कृतज्ञ आणि साग्रसंगीत नोंद करून ठेवायची आहे. ओझं जरा हलकं करायचं आहे—पुढचा प्रवास सुखदायी होण्यासाठी.

दिव्याने दिवा लागतो तसंच एका सत्कृत्यात दुसऱ्या सत्कृत्याला विनबोभाट जन्म देण्याचं सामर्थ्य दडून बसलेलं असतं. ह्याचा दाखला जो रेल्वेच्या

फलाटावर आला, त्याला शब्दरूप तर द्यायलाच हवं होतं.

ही गोष्ट म्हणा, हकीगत म्हणा, चिंतन म्हणा, किंवा तुकडे जुळणी म्हणा— हा सगळा, पुस्तकी पांडित्य बाजूला सारून केलेला, इवलासा शुभारंभ आहे. कार्व्हरचं सांगणं आहे, 'शुभकार्याला मुहूर्त पाहण्यात वेळ दवडू नकोस, असशील तेथे, असेल त्या क्षणी, झारी उचल आणि शिंपायला सुरुवात कर. दामदुपटीने परतफेड करण्याइतकी धरित्री उदार आहे!

□

शाबासकी

परवा शालान्त परीक्षांच्या निकालावरून सहज नजर टाकली आणि चकित झालो. विद्यार्थ्यांवर यंदा मार्कांचा नुसता पाऊस कोसळल्यासारखा वाटला. शेकडा नव्वद गुणांच्यावर मजल मारणाऱ्या मुलांची यादीमध्ये अक्षरशः रेलचेल होती. मनात आलं, मार्कांची ही नामी खिरापत मुठीमुठीने वाटतो तरी कोण? आणि त्यांचे निकष तरी काय असतात? पूर्वी वारा धो धो वाहायचा. आता मार्कही धो धो वाहायला लागले आहेत! जमानाच बदलला, दुसरं काय?

पंचवीस वर्षांपूर्वी या महापूराचा मागमूस नव्हता आणि चाळीस वर्षांपूर्वी म्हणजे स्वातंत्र्याच्या पूर्वीच्या काळात तर परीक्षेत पन्नास टक्के गुणांची रेषा ओलांडणाऱ्या बहादुरांना कौतुकाने 'स्कॉलर' म्हटलं जाई. पहिल्या वर्गात उत्तीर्ण झालेल्या मुलाला मुद्दाम हुडकून काढून डोळे भरून पहावा लागे— जसं विहिरीचं पाणी आपण मुद्दाम डोकावून पाहातो तसं! त्याकाळी क्वचित कुणाला पहिल्या वर्गाचा टिळा लागे. माझ्या माहितीतलं त्या कठोर काळातलं असं एकमेव उंबराचं फूल म्हणजे आजचे दिल्लीचे बडे बॉस जयवंत दुभाषी. खरं तर दुसऱ्या वर्गात मिरवणारी स्कॉलर मुलंही तेव्हा जेमतेम मूठभर असत. त्यामानाने आमचा समस्तांचा तिसरा वर्ग हाच खरा लोकमान्य 'अपना बझार!'. उत्तीर्ण झालेल्यांपैकी शेकडा नव्वदाहून अधिक भिडू त्या खपाट्यातले प्रवासी असत. मॅट्रिकच्या परीक्षेच्या उंबऱ्यावर वारंवार डोकं आपटूनही, पेढे वाटण्याचं भाग्य भाळी नसलेले असंख्य नॉनमॅट्रिक त्याकाळी चाळीचाळीतून होते. मुलींमध्ये त्यांचा भरणा कांकणभर अधिक असे. वय झालेल्या त्या मंडळींना सध्याचा हा मार्कांचा मुसळधार पाऊस पाहून काय वाटत असेल?

स्वातंत्र्य उगवलं आणि ओढ्याचं पाणी पालटलं. विद्यार्थ्यांचे लोंढे वाहू

लागले. त्यांच्या झुंडी कोचिंग क्लासेसवर धडका मारू लागल्या. करियर कोर्सेसच्या आकर्षक जाहिरातींनी हातपाय पसरले. पालकही जागे झाले. त्यांनी आपल्या महत्त्वाकांक्षांचे हंडे मुलांच्या डोक्यावर ठेवले. स्पर्धा वाढली. बघता बघता परीक्षांना मिरवणुकीची कळा आली. एकूण काम राक्षसी झालं आणि एके दिवशी पाहातो तर तो राक्षस खुद्द माझ्याच दारात उभा!

टामटुमीत निघालेल्या या महामिरवणुकीत माझ्या मुलांनीही कायावाचामनेकरून झोकून देणं अपरिहार्यच होतं. ज्यांना कालपरवापर्यंत दोन हातांच्या ओंजळीत घेऊन जोजवलं नि आभाळातला चांदोबा दाखवला, त्या लेकरांना पाठीवर मणामणाची वह्या-पुस्तकांची ओझी घेऊन पळताना पाहून मला विषण्ण वाटे. पण धारेला लागण्याशिवाय त्यांना गत्यंतरच नव्हतं. मग रितीप्रमाणे मुलांनीही कळशा भरभरून मार्क घरी आणण्याला सुरुवात केली. एके दिवशी तर मी म्हणालोच की, 'बाळांनो, मार्कांचे हंडे रस्त्यातून सावकाशीने आणा बरं. नाहीतर डुचमळून मार्क रस्त्यात पडतील नि रस्त्यावर कचरा टाकल्याचा तुमच्यावर ठपका येईल!'

यथावकाश मुलं महाविद्यालयांच्या नि विद्यापीठांच्या परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा मला आनंद झाला. मी घरात म्हणालोच, 'मुलं पहिल्या सटक्यासरशी पास झाली हे बेस झालं. चारचौघात सांगायला मोकळा झालो.'

तर त्यावर माझ्या दिशेने फेकलेले हे जळजळीत उद्गार : "काय म्हणालात! मुलं पास झाल्याचा आनंद? अहो, किमान पंच्याहत्तर टक्के तरी मार्क न मिळवती आपली मुलं तर आम्हाला पार्ल्यात तोंड दाखवायला जागा नव्हती! आता मुलं घरी परतली की घसघशीत शाबासकी द्या त्यांना... ऐंशी टक्क्यांवर मार्क मिळल्यायत!"

'छायागीत' बघायला वेळेवर घरी परतलेल्या माझ्या लेकाला आज्ञेबरहुकुम मी शाबासकी दिली. प्रत्यक्ष व्यवहारातला त्याचा सरळ नि सोपा अर्थ, आठशे रुपयांची नवी कोरी सायकल मुलाला घेऊन देणं मला भाग पडलं, असा झाला. एकशेऐंशी रुपयांचे चटेरीपटरी बूट आले. पार्टीसाठी रोख रक्कम द्यावी लागली ती वेगळीच. आणि, न देऊन सांगणार कुणाला? आर्किटेक्ट व्हायचं नि तेही रुबाबात म्हणजे म्हणे किमान इतपत तरी प्राथमिक सरंजाम लागतोच. न पेलणारी अवजारं, बोर्डस, ड्रॉइंगपेपर्स, फी, वगैरे अटळ खर्चाचं प्रसारशील चक्र, या सगळ्या पुढच्या गोष्टी.

मागोमाग मुलीनेही मार्कांचे गोणते भरून आणले. हातभार लावून ते मी घरात उतरून घेतले. हे मार्क मांडून ठेवायचे तरी कुठल्या कपाटात ? शेवटी तिलाही चारपाचशे रुपयाच्या वस्तूंची भेट शाबासकी म्हणून द्यावी लागलीच. शिवाय, एक अमेरिकन गॉगल !

मी हात टेकले. आणि मुलांना एकीकडे अभ्यास करताना दुसरीकडे शांतपणे गाणी ऐकता यावीत म्हणून कानाला लावायचा 'वॉकमन' घेऊन देण्याचा प्रस्ताव आडवळणाने माझ्यासमोर येऊ घातल्याची चाहूल लागली, तेव्हा कामाची अचानक आठवण झाल्याची बतावणी करून मी घराबाहेर पडलो आणि सार्वजनिक बागेतलं बाकडं गाठलं !

बागेतलं वातावरण शांत होतं. हिरवळीवर जांभळी इवलाली फुलं उमलली होती. सृजनाचा तो जयजयकार पाहून मन पालवलं. जुन्या आठवणींच्या पाखरांनी पंख फडफडले.

प्रथम आठवलं की, आम्ही मॅट्रिकच्या वर्गातल्या काही गिरगावकर मुलांनी चर्नीरोडच्या सार्वजनिक बागेतल्या बाकड्यावर बसून दुपारच्या अशाच शांत वेळी अभ्यास केला होता ! समाजातलं ते वळण कुठे लुप्त झालं ? हल्ली अभ्यासात गुंग झालेली गरीब, गरजू मुलं इतकी तुरळक कशामुळे झाली ?

दुसरी आठवण डोकं ठिकाणावर आणणारी होती. लग्न–मुंजीची पर्वणी वगळता एकमेकांना एरव्ही भेटवस्तू वगैरे देण्याघेण्याची त्या काळात समाजात वहिवाटच नव्हती. तसंच मला कुणी शाबाकी द्यावी, अशी तरवारही मी कधी मारलेली नव्हती. शालेय जीवनाची आमची गाडी सदैव डुगडुगतच गेली आणि हाकेवरचा पल्ला गाठून ती समाधान पावली. शिष्यवृत्ती वगैरे मला कधी मिळालीच नाही. ती मिळून दाखवावी, असंही कधी वाटलं नाही. लेखनातली ठळक पारितोषिकं नि पुरस्कार चालीचालीने बरेच लाभले, पण ते मिळाले नाहीत तरी कुणाला ? तेव्हां त्यांचं अग्रुप शून्य. मात्र शाबासकीच्या वेगळ्याच घाटाचा एक अभिजात अनुभव अगदी अचानक माझ्या ओंजळीत एकदा पडला होता. तो क्षण अगदी सजीव होऊन डोळ्यांसमोर आला.

दहा वर्षांपूर्वीची गोष्ट. बाबा इस्पितळात दाखल झालेले होते. त्यांचं वयही झालेलं होतं. शस्त्रक्रिया केव्हा उरकायची याबाबत तज्ज्ञांचा निर्णय होत नव्हता. पेशंटला घरी न्यायलाही परवानगी नव्हती. त्यामुळे वाढत्या अंगाचे इस्पितळातले ढिगाळ कपडे चढवून ते खाटेवर नुसते निपचित पडून राहात.

दिवसच्या दिवस असे भाकड जाऊ लागले. मी बेचैन झालो. मन अरमाळून गेलं. शेवटी जिवाचा हिय्या करून मी केरळची कंच हिरवी वाट पकडली!

केरळामधली भ्रमंती मला पावली. तिथल्या नारळी-पोफळींच्या बनातून वाट काढत काढत मी पेरियार नदीच्या काठावर गेलो. आद्य श्रीशंकराचार्यांच्या जन्मगावी वस्ती केली. तिथून शृंगेरीचा कडा चढून गेलो आणि श्रींच्या तिथल्या सोवळ्या मठावर एक लेख घुसळून काढला. दिवाळी अंकाच्या निमित्ताने तो छपाईच्या यंत्रावर चढला. त्या लेखाचं एक प्रसिद्धीपूर्व कात्रण मी मित्रांकडून मिळवलं. मग ते छापील भेंडोळे घेऊन बाबांच्या भेटीसाठी इस्पितळात येऊन थडकलो.

बाबा खाटेवर निपचित पडलेले होते. त्यांना तो छापील मजकूर सहज म्हणून दिला. ते म्हणाले,

"वाचायला आणलंस हे बरं केलंस!"

नंतर दुसऱ्या दिवशी पुन्हा गेलो.

बाबांची कळी खुललेली दिसली. माझे कागद परत करीत ते म्हणाले,

"घे. उत्तम आहे! किती बारीकसारीक टिपलंयस रे! मला तर वाटत होतं, मीच तुझ्याबरोबर केरळातून हिंडतोय. आता यापुढे या विषयावर कुणाला लिहायलाच नको".

इतकं बोलून ते अंथरुणावर उठून बसले. त्यांनी उशी उचलली आणि तिच्याखालून वर्तमानपत्राच्या तुकडयात गुंडाळून ठेवलेलं एक उकडलेलं अंडं बाहेर काढलं. ते माझ्या हातात देत बाबा म्हणाले,

"हे घे नि गुपचुप तोंडात टाक. हेच तुला माझ्याकडचं पारितोषिक!"

"पण हे अंडं तुमच्याकडे कसं आलं?" मी विचारलं.

"सकाळच्या न्याहारीत ते होतं. तुझ्यासाठी बाजूला काढून ठेवलं. आता कुणी बघण्यापूर्वी हे पटकन् खाऊन टाक नि वसून पाणी पी".

ती पुरचूंडी मी घेतली नि अंडं खाण्याच्या निमित्ताने बाहेर व्हरांड्यात आलो. तिथे पुडी उघडली, तेव्हा गळ्यात हुंदका दाटला. तो गिळला. अंडं खाल्लं आणि नंतर पाणी वसून प्यालो.

□

गंगाजळ

माझा एक अनुभव वेळीच नमूद करून ठेवतो.

मला सुरवातीला एकदा लेखनकलेतलं राज्य-पारितोषिक मिळालं होतं. किंवा सोईसाठी म्हणू या, खिरापतीसाठी अनेक हात पुढे झाले, आणि त्या झोंबा-झोंबीत माझाही लग्गा लागून गेला. वट्ट पंधराशे रुपये सुटले. इतकी चळचळीत रोकड तोवर मला कधीच मिळाली नव्हती. ती याचि देही याचि डोळा लाभली. जीव शांत झाला.

तो काळही सुरेख होता. लेखक आपापली पुस्तकं सरकारात पाठवीत. पंडितसभेत गुफ्तगूं होई. नंतर निकाल जाहीर होई. मतलबी राजकारणाचं सध्याच्या इतकं अमानुष खग्रास ग्रहण तेव्हा वर्तमानपत्रांना लागलेलं नव्हतं. त्यामुळे तो इटुकला वाङ्मयीन मामला वर्तमानपत्रं मोठ्या टायपात पहिल्या पानावर छापीत. लेखक-कवींचे फोटोही झळकत. माझाही झळकला. अर्थात पैशांचा अनुभव यायचा तोच आला. पैसे परदेशी पाखरांसारखे आले—आले नि गेले — गेले.

रसिकांच्या नजरेत साहित्याबद्दल अगत्य आणि खुद्दांबद्दल कौतुक आहे, असं सलामीच्या दोनचार दिवसांत मला फार वाटलं. पण अखेर लोक भले मुरब्बी साहित्यप्रेमी असले, तरी मुद्दलात ते वृत्तीनं उपेक्षापट्टूच असल्यामुळं तीनचार सूर्यास्तानंतर ते सारेजण आपल्या मूळच्या थंडगार वळणावर गेले.

आठवडा संपला आणि माझा स्वच्छसुंदर भ्रमनिरास झाला. होताहोता महिना उलटला. पैसे तर संपलेच होते. दरम्यान कढईतून काढलेल्या गरमागरम जिलेबीसारख्या इतर नव्या बातम्या लोकांच्या समोर वाढून आल्या, आणि त्या खरपूस घमघमाटासमोर माझ्या बक्षिसप्राप्तीच्या त्या मावळून गेलेल्या कोमट वृत्ताला यथाकाल शिळ्या चपात्यांची कळा आली. मात्र ताज्या असोत वा

बाश्या, चपाट्या ह्या चपात्याच असल्यामुळे मी त्या माझ्या डब्यात नीट झाकून ठेवल्या. कौतुक माझ्याजवळ नि माझ्यापुरतंच राहिलं.

नंतर कहर झाला. रस्त्यात जो जो म्हणून दोस्त भेटे, त्याला कधी ना कधी ते तसलंच पारितोषिक मिळून गेल्याची ज्ञानप्राप्ती मला व्हायला लागली! मग त्या व्यवहारातली सारी मजाच निघून गेली. मी इतरांपेक्षा वेगळा नव्हतो; इतरांसारखाच छापाचा गणपती होतो, ह्याची खातरजमा झाली. उदास वाटलं. साहित्यातला तो खासा सन्मान मला सुगरिणीच्या लोंबणाऱ्या पोकळ घरट्यासारखा वाटू लागला.

करताकरता वर्षअखेर आली. सालाबादप्रमाणं नव्या पारितोषिक-विजेत्यांची एक नवी लंबीचवडी यादी वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली. मागोमाग त्यांचा बोलबाला सुरू झाला. माझ्याविषयी अर्थातच सगळीकडे सामसूम! आपल्याला एकदा ते पारितोषिक लाभलं होतं, हे सुद्धा मी ओघानंच विसरून गेलो.

राज्यपारितोषिकाच्या विजेत्यांना जांभळ्या मखमालीच्या वेष्टनात मांडून शोभिवंत केलेलं ब्राँझचं एक टपोरं पदकही मिळतं. त्याच्यावर तुमचं नाव-गाव, कुळ-कुंडली, तुमची समशेरबहादरी, वगैरे सारं कोरून ठेवलेलं असतं. हाती पडलं तेव्हा ते पदक कुठं टेवूसं मला झालं होतं. पुढं वर्षभरात तेही दृष्टीआड झालं.

कालपरवाची गोष्ट. मला पेन्सिलीचा तुकडा हवा होता म्हणून मी माझ्या शाळकरी लेकीचं दप्तर चाचपलं, तर हाताला अचानक एक चक्राकार वस्तू लागली. ती बाहेर काढून पहातो, तर पारितोषिकाच्या रकमेबरोबर मला मिळालेलं ते ब्राँझचं पदकच होतं! चकिताश्चर्यानं मी त्या अमोल वस्तूकडे पाहिलं नि लेकीला विचारलं, "अग, ही वस्तू तुझ्या दप्तरात कशी?" तर तिनं थंड शब्दांत उत्तर दिलं, "ते माझं पेपरवेट आहे!"

फुड जिंकल्याची निशाणी म्हणून बाजतगाजत मिळालेल्या जरीच्या फेट्याचं रूपांतर पुढल्या पिढीच्या हिशेबी शुद्ध चिरगुटात कसं गुपचुप होतं, ते इथवर सांगितलं. येऊनजाऊन आपण अवघ्या ओहोटीच्याच पाण्यात उभे आहोत ह्याची खातरजमा नंतरचे वेगवान अनुभव करून देतात.

मला बक्षिस लागलं त्यावेळी सर्वश्री आवळे, जावळे, बावळे, कावळे, मावळे वगैरे वाङ्मयातली सरकारमान्य दहाबारा न्यायनिष्ठुर माणसं समितीवर दाटीवाटीनं मांडलेली होती. तसे ते सगळेच साक्षर होते असं माझ्या कानावर आहे.

त्यातला निम्म्या पंडितांच्या नावावर काही ना काही बुकं होतीच. दोनतीन आसामी मात्र साहित्यात मातबर म्हणून नावाजलेले होते. आणि एक तर पाचपन्नास वर्षांपूर्वी जिल्हा साहित्यसंमेलनाचं अध्यक्षस्थानही भूषवून गेलेला होता. तेव्हा तात्त्विक तक्रारीला जागा नव्हती.

बक्षिस लागल्यामुळं प्राप्त झालेली खुषी ओसरायच्या आतच मला पंडित आवळ्यांनी रस्त्यात गाठलं. कानाला लागून ते म्हणाले, "रे, मीच आग्रह धरला की, तुलाच लेका बक्षिस मिळायला पाहिजे! तर जावळे, कावळे, बावळे —एकजात माझ्यावर तुटून पडले! अजिबात तयार नाहीत तुला बक्षिस द्यायला! शेवटी मी म्हणालो, 'राव, तत्त्व म्हणजे तत्त्व! जर ह्या लेखकाला पारितोषिक देणार नसाल तर, हा घ्या माझा राजीनामा!' मग लेकाचे वरमले, तुझ्या बाजूनं मी लढलो, म्हणून वाचलास बेटा तू."

सद्गदित होऊन मी पंडित आवळ्यांना जवळच्या हॉटेलात मुर्गी चारली.

दुसऱ्या दिवशी प्राध्यापक जावळे थेट घरीच मला भेटायला आले. म्हणाले, "यार, मी सज्ज होतो म्हणून बक्षिस मिळालं तुला! तुझं नाव मी पुढं करताक्षणीच आवळे डाफरायला लागला. आवळ्याचं बघून बावळेही विथरला. एकजात सगळे तुझ्याविरुद्ध! पण मी नेट लावला. म्हटलं, 'आमचा दोस्त म्हणून नव्हे, तर लेखनात कस आहे म्हणून ह्याला बक्षिस देऊन टाका.' तर सगळेच लेकाचे नाराज! पण मी धोका पत्करला. म्हणालो, 'तत्त्व म्हणजे तत्त्व! ह्या पुस्तकाला पारितोषिक देणार नसाल, तर हा घ्या माझा राजीनामा!' मग सगळे सरळसूत आले. असं लढावं लागतं मित्राच्या बाजूनं, कळलं का?"

मित्रवर्य प्राध्यापक जावळ्यांना मी त्या दिवशी घरी जेवायलाच ठेवून घेतलं.

कमिटीवर काम केलेल्या बावळे, कावळे, मावळे वगैरे माझ्या उरलेल्या निःस्पृह हितचिंतकांनी मला त्यानंतरच्या आठवड्यात अगदी टिपूनटिपून गाठलं आणि केवळ माझ्या साहित्यगुणांनी प्रभावित होऊन त्यांनी माझ्या नावाची पारितोषिकासाठी ठोस शिफारस कशी केली, त्याला इतर रेम्याडोक्यांनी एकसंध विरोध कसा केला, त्यावर प्रतिवाद म्हणून माझ्याच नावाचा हेका आपल्याला कसा निर्धाराने धरावा लागला, प्रश्न तत्त्वाचा असल्यामुळं आपण राजीनामा देण्याची भाषा कशी केली, आणि अखेर बक्षिस माझ्याच झोळीत पाडण्याची व्यवस्था ह्या कानाचं त्या कानाला न कळता कशी झाली, ते रामायण मला सुनावलं. कान धन्य झाले. मी त्यांचा जन्मोजन्मीचा उतराई झालो.

हा झाला आपल्याकडचा खास स्वदेशी प्रकार. ह्या भूमीत जन्मोजन्मी लाभणारी 'मी राजा–तू प्रजा' ही चिरंजीव शिकवण, मांडी ठोकून बसलेली जरामरणहीन विषमता, तिच्या पोटी अवतार धारण केलेली अखंड वखवख, न्यूनगंडाची कायमची सोबत, सर्वांची सदासर्वकाळ नड, लाजेकाजेच्या कल्पनेच्या सिंहासनाचा कायमचा त्याग केलेले लोकोत्तर राजकारणी नि त्यांच्या ताटाखालच्या वंद्य मांजरांचे उगारलेले पंजे — असा अलौकिक मिलाप, विधिलिखित म्हणून तुमच्यासमोर वाढून येतो, तेव्हा लेखकूंच्या ललाटी अन्य कोणती अक्षरं कोरलेली वाचायला मिळणार? झडप घालणं आणि ताव मारणं, ह्या दोनच दोन क्रिया ह्या देशात बहुत काळ बाजी मारणार, ही दगडावरची रेघ!

अर्थात अपवाद आहेत. आणि रुचिपालट म्हणून तेही पेश करून ठेवतो. एक आहे अस्सल विलायती वाण; दुसरा स्वदेशी.

अभिजात औदार्य हे ज्याचं बळ त्या ई० एम० फॉर्स्टरबद्दल लिहिताना डेव्हिड गार्नेटनं त्याची एक मनोज्ञ आठवण नोंदवली आहे. गार्नेट लिहितो, "आजच्यासारखे फॉर्स्टर तेव्हा जगद्विख्यात वगैरे झालेले नव्हते. मी पुस्तकांचं दुकान टाकलं होतं. फॉर्स्टरनी माझ्यासाठी शब्द खर्च केला, आणि जुन्या हैदराबाद संस्थानाला पुस्तकं पुरवण्याचं एक कंत्राट मला मिळालं. पॅलेस्टाइनला नकाशे हवे होते. फॉर्स्टरनी माझ्याकडे बोट दाखवलं. लागलीच तीही ऑर्डर माझ्याकडे चालून आली. फॉर्स्टरनी माझ्यासाठी चिठी खरडली आणि मी 'डेली हेराल्ड'वर ग्रंथसमीक्षक म्हणून चिकटलो. मी ललितलेखन करू लागल्यावर माझं लेखन डॅनिश भाषेत अनुवादण्याची शिफारस त्यांनी एका डच लेखिकेला परस्परच केली. परिणामी, माझी कादंबरी डॅनिशमधे अवतरली. ह्या सर्व उपकारांबद्दल मी साहेबमजकुरांचा सदाचाच ऋणी आहे. पण त्याहीपेक्षा मी त्यांना आवडतो ह्या जन्मसाफल्याचा प्रत्यय देणाऱ्या भावनेचं बीज त्यांनी माझ्या हृदयात रुजवलं, ही गोष्ट केवळ अनमोल आहे,"

एका माणसानं दुसऱ्याचं जगणं सुसह्य होण्यासाठी काय करायचं असतं, आणि ते अर्थपूर्णरीत्या कृतार्थ ठरण्यासाठी निःशब्दपणं काय पेरायचं असतं, ह्याचा फॉर्स्टरनं जणू कित्ताच घालून दिला आहे.

आपल्याकडेसुद्धा ह्याच जातकुळीचं एक शुचिष्मंत उदाहरण आहे.

सावरकर भावंडांमधे बाबाराव थोरले, तात्याराव धाकटे. दोघेही पैलथडीला

अंदमानात एकाच वेळी देहदंड भोगीत होते. पुढं दोघेही भाऊ दैवगतीनं ऐलतीरी जिवंत परतले. आपापली कार्यं एकटक करू लागले. पैकी, खांद्यावर जालिम शब्दांचा परशू वाहणाऱ्या कविश्रेष्ठ तात्यारावांचा अफाट उदोउदो झाला. ते साक्षात हिंदुहृदयसम्राट झाले. उलट, नागपुराकडे झुकांडलेले हिंदु-संघटक बाबाराव शब्ददुबळेपणा नडल्यामुळे सावलीत जमा झाले. सरस्वतीचा अनुग्रह न लाभलेल्या बाबारावांनी धाकट्या तात्यांचा पक्षिनजरेनं निःशब्द संभाळ केला. तात्यांचे नगारे दशदिशांत झडल्यानंतर त्यांच्या थोरवीचं श्रेय ओरबाडण्याचं बाबारावांच्या स्वप्नातही कधी आलं नाही. कृतज्ञ तात्यारावांनी मात्र श्रेयाचं पुरतं माप आपखुषीनं बाबारावांच्या पदरात टाकलं. 'वडिलांचे सप्रेम सेवेशी' लिहिलेल्या घरगुती पत्रात धाकटे तात्याराव, थोरले भाऊ बाबाराव यांना लिहितात, "माझ्या नावाला एवढे महत्त्व येण्याचे कारणही अर्धेअधिक कष्ट, कौटुंबिक नि राष्ट्रीय, आपण भोगलेत; नावे मात्र माझ्या पडत राहिले हेच होय."

केंब्रिजच्या अभ्यासिकेत विद्याधन वेचणाऱ्या फॉर्स्टरसाहेबांना काय किंवा नागपुरी उन्हात पायपीट करणाऱ्या आमच्या बाबारावांना काय, एक अभिजात मूल्य आतूनच उमगलेलं होतं : बळेच ओरबाडता येते ती फक्त वरवरची साल ! ती काहीच नव्हे. अपार कृतज्ञतेचं तळं खूप आत आत असतं. जगण्या-तल्या बहादुरीला सार्थकतेचा लाभ तेच गंगाजळ पुरवतं.

□

श्रीपाद काळ्यांचं कोकणी घर

आभाळातून चांदण्याचा विपुल अभिषेक चालू असतानाच बोटीने देवगडच्या दर्यात नांगर टाकला. पाण्यात लखलखाटाचा क्षणिक डोंब उसळला. नंतर त्याचा आत्मा शांत झाला. रेशीमधागे सांधले गेले. चंदेरी पाणी एकजीव झालं.

खपाट्यातून धक्क्यावर उतरलो तेव्हा मध्यरात्र टळली होती. हवेत गारवा होता. वारा भणाणत होता.

देवगडाच्या डाकबंगल्याचं ठिकाण नामी आहे. आटपाट सडा निरंतर पसरलेला आहे. वस्तीची जाग नाही. समोर दीपगृहाचा प्रकाशमान पहारा. दूरवर डोंगरमाळा. सागराचा वक्रकक्षाकार निळा पट्टा ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत घरंगळत गेलेला आहे. आणि, वर घुमटाकार आकाशात भरून राहिलेले आहेत चांदण्याच्या बासरीचे मंजुळ सूर. ऐलपैल कसं डोळ्यांनी पिऊन घ्यावं!

पहाटेची कळी उमलायला अजून घटकाभराचा अवकाश होता. पौर्णिमेच्या डोहात फुललेलं पहाटेचं कमळ दिसण्याची झक्क संधी अगदी हाकेवर उभी होती. अशा समयी झोपेल कोण?

घरभाटावर शतपावली घातली. उगवतीकडचा तो रम्य सोहळा पाहिला. अगोदर दिशा तरतरीत झाल्या. मग तांबूस कोवळ्या किरणांचा जरीपटका फडफडला. मागोमाग रविबिंब डोकावलं. तांब्याच्या तापलेल्या पत्र्यासारखं चकाकणारं ते गरगरीत सूर्यबिंब डोंगराच्या वर स्थिर झालं. त्याची सोनसळी डूब सागरपृष्ठावर उतू गेली. पक्ष्यांची पालाणं सुरू झाली.

फक्कड उजाडलं, तशी गावातली कामं उरकली आणि तरीपार झालो.

देवगडच्या खाडीवरील ही निवांत वाडा–तर. मुख्य गाव जो वाडा, तो

इथून दोन कोसांवर आतल्या अंगाला झाडीत गुरफटलेला आहे.

भिंतीवरला नकाशा नि फळीवरलं भूगोलाचं पुस्तक काहीही सांगो, श्रीपाद काळे नावाच्या कोकणातल्या एका जबर लेखकाच्या कायम वस्तीचं ठिकाण, एवढीच माझ्या हिशेबी वाड्याची ख्याती आहे.

वाडे गाव शुचिर्भूत आणि प्रसन्न तरुवरांनी झाकलेलं आहे. दक्षिण कोकणातल्या किमान पंधरा आणे वस्त्या ओढगस्तीतल्या दिसतात, आणि तशा त्या असतातही. वाड्याचा अपवाद करावा लागेल. इथले पोपटी मळे, स्वच्छ परसवं, चिरेबंदी कौलारू घरं, आणि कलमांच्या दरवळणाऱ्या पुष्ट बागा सांगतात, ह्या परिसरात लक्ष्मीचा फेरा आहे. सडकेवर नेने ग्रंथालय आणि केळकर विद्यालय ह्यांच्या इमारती आमनेसामने आहेत. तात्पर्य : सरस्वतीचा पायरवही गावात आहेच.

झाडामाडांकडे नेणारी एक पायवाट पकडून मी उंचावरल्या ब्राह्मण रहाळात आलो.

हे काळेमंडळींचं आवाठ.

वृक्षवेलींची रेलचेल. सारवलेलं अंगण. अंगणाला खेटून किंचित उंचावर, गावठी चणीचं गणपतीचं, एका खोलीच्या मापाचं हे देऊळ. हे देऊळ हीच वेदशाळा. समोर अंगणात पूजेतलं तुळशी वृंदावन. बाजूला पाण्याची डोणी.

काळ्यांची ही वास्तू शतायू तर असणारच. गवती शाकार जाऊन कौलं बसली, हा एक फरक वजा करता, घराचा उरलेला अवतार शे-सव्वाशे वर्षांत बदललेला नसेल. गो-पद्मांची रांगोळी, अंगण, पडवी, माचा, झोपाळा, ओटी, कोनाडे, खुंट्या, फडताळं, देवदेवतांच्या तसबिरी, माजघर, देवघर, तिथे पडलेले उन्हाचे थरथरते कवडसे, स्वयंपाकघर, मागीलदार, तिथला सुंभाने बांधलेला फळीचा बायकांसाठीचा झोपाळा, गोठा, न्हाणीघर, परसू, विहीर, आळवाचं खाचर, आगर आणि सरतेशेवटी मळे, असा अवघा कोकणी तोंडवळा आहे. वास्तूचं लक्षण बाळबोध आहे.

आगर घरंदाज आहे. नारळी, पोफळी, आंबे, अननस, काजू, फणस, करवंदी, कापशीण, कळक, मेथी, मिरची, जास्वंद, आबोली, प्राजक्त, रातराणी, गुलाब, चाफा, तुळस, असा हरकामी ताफा आहे. आणि वास तरी किती नाना प्रकारचे तरंगताहेत सभोवती ? स्वयंपाकाच्या खोलीतून कडधान्य उकडत ठेवल्याचा; न्हाणीघरातून सर्पणाच्या धुराचा; गोठ्यातून शिळ्या

शेणामुताचा; चूलखंडाजवळ करपलेल्या काजुबियांचा; आगरात भिजक्या मातीचा नि परसंत्रात सुक्या गोवऱ्यांचा, असे सगळे वास एकत्र नांदायला आले आहेत.

सर्व कोकणी आवाजांच्या गोळाबेरजेची झांज काळेवठारात वाजलेली आहे. पडवीतल्या झोपाळ्याच्या कड्यांची लयबद्ध कुरकूर चालू आहे. वहिनींनी खास पाहुण्यांसाठी म्हणून जात्यावर कुळीथ दळायला घेतले आहेत. स्वयंपाकाच्या खोलीतल्या फुंकणीची जोरकस फुंकही ऐकू येते. सुतार पक्ष्यांची ठोकठोक फणसावर चालू आहे. गोठ्यात गोरवांचे संथ रवंथ चालू आहे आणि पडवीत भालाजवळ मुंगा आलेला आहे. फक्त बावीवर रहाटाचा तेवढा आवाज नाही, कारण तिथे पंप बसला आहे नि तूर्तास तो बंद आहे.

एवढ्या अवाढव्य पसाऱ्यात माणसं किती ? तर फक्त इनमीन तीन ! म्हणजे आहे की नाही हा जातीवंत कोकणी ऐवज ? वाडे गावातली काळ्यांची ही एकूण वास्तू म्हणजे कोकणी अत्तरात चिंब मुरवलेला घमघमीत फाया आहे. ह्या घराने किमान पाच पिढ्या तरी सुखाने नांदताना पाहिलेल्या आहेत. मालवताना एक पिढी दिवा पुढल्या पिढीच्या स्वाधीन करते. देवासमोर नीरांजन निरंतर तेवतं. वंशवेल विस्तारित जाते. आला दिवस निघून जातो; पुढचा उगवतो.

मूळपुरुष ज्ञात नाही. वंशातली एक पतिव्रता सती गेली होती. माझी पुण्याई काळे वंशाला सात पिढ्या पुरेल, असा तिचा अखेरचा आशीर्वाद होता. तो फळाला आला. श्रीपाद काळ्यांचे आजोबा श्रीधर भट्ट ह्या वास्तूच्या छपराखाली जन्मभर जगले. ह्या गणपतीच्या लहानसर देवळात त्यांनी हयातभर वेदशाळा चालवली. ह्या पडवीत बसून त्यांनी संपूर्ण ऋग्वेद स्वहस्ते कागदावर कित्त्यासारखा संस्कृतात लिहून काढला; संपूर्ण याज्ञिकी कागदावर उतरवून ठेवली. कुठलंही कार्य उभं करा, त्याचं यथासांग कर्मकांड श्रीधरभट्टांच्या बाडात नीट जपून ठेवलेलं आढळेल. बाडांना ढका लागलेला नाही. कागदावर नोंदलेली तारीख मी टिपली. हा यज्ञशास्त्रविद्येचा शास्त्रोक्त आखाडा अठराशे नव्याण्णव सालचा आहे. उघडच आहे, हे शास्त्री साधारणपणे न्यायमूर्ती रानड्यांचे समकालीन होत. ह्यांनी जन्मभर कोकणी पंचक्रोशीत जोशपण सांभाळलं.

शास्त्री श्रीधरभट्टांचे पुत्र रामकृष्णपंत हे लेखक श्रीपाद काळ्यांचे तीर्थरूप.

ह्यांनीसुद्धा ह्याच पडवीवर बसून जन्मभर नावडणारी भिक्षूकी केली. नावडती, कारण भिक्षुकीत अंगभूत असलेली याचना ह्यांना अगोड होती. पण वृत्ती न चालवते तर खाते काय? ज्या काळात किर्लोस्कर नि ओगले ही नावं लोकांना अपरिचित होती, त्या काळात वाड्यासारख्या कोकणी आडगावात उद्योगधंदे स्थापन करण्याची स्वप्नं ह्या पंतांनी पाहिली. घरगुती हत्यारं वापरून बसल्या बसल्या त्यांनी वाड्यात अडकित्ते घडवले; चाकूसुऱ्या तयार केल्या; गुप्त्या बनवल्या; सुगंधी उदबत्त्या तयार केल्या; अखंड कातळावर माती थापून त्यावर भात घेऊन दाखवलं; औदुंबराच्या तळाशी स्वतः खोदकाम करून कातळात चिंचोळी विहीर खणली आणि त्या पाण्यानं कलमं शिंपली. असा हा कष्टकरी बहादर पुरुष—ज्याची पैशांच्या खडखडाटापुढे मात्रा म्हणून कशी ती चाललीच नाही! गोरवांसकट घरातल्या सर्वांच्या उदरंभरणासाठी तांदळाचा शिधा मिळवून देणाऱ्या भिक्षुकीची आराधना ह्या उद्योजक गृहस्थाने केली ती अखेरपर्यंत. सेवापरायण कष्टाळू माघारणीचा लाभ झाल्यामुळे त्यांचे दिवस तरी निभावले. पंतांचं त्र्याहत्तर वर्षांचं आयुष्य रामरक्षा म्हणत ह्या अंगणात फेऱ्या घालण्यात गेलं.

आला वारा; गेला वारा!

आखूड धोतर नि हाफशर्ट घातलेले पोक्त श्रीपाद काळे ह्या गणपतीच्या देवळात माझ्यासमोर मांडी ठोकून बसले आहेत. गळ्यातलं जानवं नि केसात लपलेली शेंडी, मला स्पष्ट दिसत आहे.

लाकडी रेज्यांची एक लांबोडकी खोली म्हणजे हे गणपतीचं देऊळ. भिंतीला टेकून गजाननाची काळ्या शिळेची मूर्ती आहे. तिला सफेत चाफ्याची नि जास्वंदीची फुलं वाहिलेली आहेत. तबकडीत उदी आहे. आढ्याला फळ्या टांगलेल्या आहेत. त्यांच्यावर रुमालात गुंडाळलेली बाडं आहेत. त्यांच्यावर धुळीचे दाट थर आहेत. देऊळ सदानकदा रिकामंच असतं. माझ्याच इच्छेवरून माझ्यासाठी कोपऱ्यात माचा टाकलेला आहे.

रोज तिन्हीसांजा टळल्यावर चारदोन ब्राह्मण पोरगे देवळात पाठाला बसतात. लेखक श्रीपाद काळे त्यांना संथा देतात. कारण ते ह्या वेदशाळेचे गुरुजी आहेत. काळे व्यावसायिक भिक्षुक आहेत. नुसत्या वाड्याच्याच पंचक्रोशीतले नव्हेत, तर मुंबईपासून गोव्यापर्यंत गावोगाव त्यांनी होम पेटवले आहेत; लग्नं लावलेली आहेत. ते चक्र भटजीचं जीवन जगतात. धर्मकृत्यं

चालवतात. अभिषेक करतात. दर सोमवारी व्हाळ ओलांडून विमलेश्वराला सोवळ्याने जातात. रोज तासभर देवाचं म्हणतात. लाभलेल्या दक्षिणेवर योगक्षेम चालवतात. आणि उरलेल्या वेळात तडाखेबंद लेखन करतात !

आज काळ्यांचं वय साठीचं आहे आणि ह्या वयात त्यांच्या खात्यावर अकराशे कथा नि बावन्न कादंबऱ्यांचा खजिना जमा आहे.

खुद्द लेखकाच्या तोंडचे हे आकडे ऐकून मी थिजून गेलो ! गणपती साक्षीला आहे.

कोकणातल्या आडगावात पळीपंचपात्र घेऊन भिक्षुकी करण्यात जन्म घासलेल्या नि जन्मात कधी शाळेत पाऊल न टाकलेल्या ह्या श्रीपाद काळ्यांना सरस्वती एवढी वश कशी ? विलायती बुकांची ओझी वहाणारा जो मी, तो काळ्यांच्या ह्या पराक्रमापुढे तर बुवा सपशेल शरण आलेलो आहे !

खुद्द काळ्यांना मात्र त्यांच्या ह्या अजब संचिताचं भान नाही.

हे देऊळ, ही ऋग्वेदशाखीय वेदशाळा, ही त्रिभुवनसुंदर वास्तू, ह्यांना काळ्यांनी कधीही अंतराय दिलेला नाही. मराठी शाळेत कधी गेलेच नाहीत. मुंजीनंतर थेट संस्कृत पाठशाळेत दाखल झाले. वेदविद्येच्या परीक्षा उत्तीर्ण झाले. दशग्रंथ पढले.

मग राजेश्री मराठी कथालेखनाकडे कसे वळले ?

गावातल्या नेने वाचनालयात येणारी मासिकं वाचून म्हणे त्यांना वाटलं, आपलंही नाव छापून यावं ! लागलीच त्यांनी 'खेळगडी'च्या अंकात लुटुपुटुचं केलं. धीर आला तसं 'स्वराज्य'मध्ये 'वन्स, उठा आता–' ही नमनाची कथा लिहिली. ते साल होतं १९४९. कथेचा मोबदला आला तेव्हा प्रथम चक्रावले. नंतर सुखावले. तेव्हापासून काळ्यांनी कथालेखनाचा जो झिम्म पाऊस पाडला, तो ठीक आजमितीपर्यंत. जवळपास शंभर नियतकालिकांत त्यांनी लिहिलं आहे. सत्यकथा, हंस, दीपावली, किर्लोस्कर, प्रसाद, वसुधा, विवेक, स्वराज्य, विविधवृत्त, केसरी, सुगंध, वसंत, बलवंत पासून थेट इचलकरंजीच्या 'दै. मँचेस्टर'पर्यंत, त्यांनी सर्वत्र संचार केला. ह्या ढिगाऱ्यातून आठ संग्रह आणि बावन्न कादंबऱ्या सिद्ध झाल्या. त्यातल्या वेचक कृती हिंदी, कानडी, गुजरातीत पोहोचल्या. 'पिसाटवारा' कादंबरीला पारितोषिक लाभलं. 'पहारा' न्यूयॉर्कला इंग्रजी अनुवादातून पोहोचली. आकाशवाणीने खास पाचारण करून त्यांची कथावाचनं ध्वनिक्षेपित केली. त्यातली काही

ध्वनिमुद्रणं तर खुद्द माझ्याच हातची आहेत. अशा दिशा स्वच्छ झाल्या. लौकिक पसरला. त्यांची काही पुस्तकं अगत्याने काढून केशवराव कोठावळे म्हणाले, " काळे, तुम्ही जे लिहाल ते सर्व साहित्य मी प्रकाशित करीन ! "

काळ्यांच्या लेखकी जिंदगीतला तो एक धन्यतेचा क्षण होता.

काळे सांगतात, लेखनाचा हा आखाडा प्रारंभी शुद्ध हौसेपोटी जन्मला. विद्यार्थी सुटू लागताच त्याचं रूपांतर जोडव्यवसायात झालं. लेखनकामाठी संसार सावरू शकेलसं वाटलं. मग पैशासाठी कसोशीनं लिहिलं. अपेक्षिल्याप्रमाणे पैसे मिळाले. लौकिक लखलखला. आणि संसारही प्रतिष्ठेचा झाला.

य. गो. जोशींच्या कथांनी काळ्यांना सुरवातीला भुलवलं. आज अरविंद गोखले त्यांचं कथादैवत आहेत. गोखल्यांच्या हरएक कथेवर काळे निहयत खूष असतात. मध्यंतरी पंधरा वर्षं त्यांनी ' बलवंत 'च्या दिवाळी अंकाचं हौशी संपादन केलं आणि कुसुम अभ्यंकर ही विलक्षण लोकप्रिय कादंबरीकर्ती शोधून काढून मराठीला मिळवून दिली.

ही मामलत चालू असतानाच ग्रामस्थांची कामंही श्रीपाद काळांनी कर्तव्य-बुद्धीने केली. नेने वाचनालयाचे ते तीस वर्षं चिटणीस होते. गेली दोन वर्षं अध्यक्ष आहेत. दहा वर्षं ग्रामपंचायतीत होते. आठ वर्षं सोसायटीचे व्यवहार पाहिले. शिवाय, गावातली नाटकंही बसवण्याची वहिवाट आहेच.

काळे आता सुखात आहेत. त्यांनी ऊन की पाऊस न पाहता कातळ फोडला. ते कडक कष्ट फळाला आले. नशिबाने हात दिल्यामुळे त्यांची एकूण परिस्थिती आता पूर्णपणे पालटलेली आहे. पूर्वी ते निश्चळ भिक्षुक होते. नंतर लेखक झाले. आज सन्मानित बागाईतदारही आहेत. आंबे विकतात. सत्पात्री दान करतात. कोकणात मोफत इस्पितळ नि ते न जमल्यास निदान वृद्धाश्रम, अनाथाश्रम, असं काहीतरी स्वतःच्या पैशातून लोकांसाठी करायचं स्वप्न ते आज पाहत आहेत. त्यांचा धाकटा भाऊ वामन, जो सांगलीच्या आकाशवाणी केंद्रावर निवेदकाचं काम करतो, नि जो स्वतःला कथालेखक म्हणून घडवीत आहे, त्याची सुगी हा श्रीपाद काळ्यांचा दिलासा आहे.

करता करता, ' रानवारा ' ही काळ्यांची कादंबरी वाचून उचंबळून आलेले गो. नी. दांडेकर, ह्या नवख्या लेखकाला केवळ पाहायला म्हणून एके दिवशी वाडे मुक्कामी हजर झाले ! ह्या सन्मानाने काळे हरखून गेले. दांडेकरांनी दवंडी पिटली. मग मागोमाग पं. महादेवशास्त्री जोशी पायधूळ झाडून गेले. श्री. ज.

जोशी आले. मधु मंगेश आले. आपल्या वास्तूला ह्या बड्या मिरासदारांचे पया लागले म्हणून श्रीपाद काळे आरपार पछवीत झाले.

कोकणी दशावतारी खेळात रंगभूमीवर सुरवातीला रंगीत गणपती नाचत नाचत पदार्पण करतो. त्याला धूप दाखवतात. नमन करतात. तो तुष्ट होतो. पोटभर आशीर्वाद देतो. निघून जातो. मग त्याच्या कृपेने पुढल्या खेळात रंग भरतो. अशी आनंदाला भरती आलेली असताना नंतर शंखासुराचं पात्र मध्येच प्रवेश करून लुडबुडतं नि मंडळीत खसखस पिकवून निघून जातं. कुठे मंगलमूर्ती नि कुठे शंखासुर ! पण खेळात रंग भरायचा तर दोघेही हवेत. त्याच न्यायाने मीही, काळ्यांच्या ज्या अंगणात नामवंतांचा कुरावावर झाला, त्याच अंगणात एके दिवशी फिरता व्याख्याता म्हणून डेरेदाखल झालो ! अवचित प्रगटलेलं अस्मादिकांचं ध्यान पाहून यजमानांची मनःस्थिती कशी झाली असेल, ते मी कसं ओळखणार ? तथापि रवींद्र पिंगे नावाचा एक हिंडता ब्राह्मण काळ्यांच्या गणपती मंदिरात तीन रात्री वस्तीला राहिला, सांजसकाळ पंगतीला बसला, बागेत फिरला, सड्यावर हिंडून आला, त्याने देवळातली जुनी बाडं चाळली, टिपणं केली, गप्पा छाटल्या, रात्री दुर्बिणीतून सर्वांना नक्षत्रमाळा दाखविल्या, आणि एका सुप्रभाती तो पुढच्या मुक्कामी निघाला. शतायुत्वाकडे निघालेल्या श्रीपाद काळ्यांच्या आईने त्याच्या हातावर चिकूची चार फळं आशीर्वाद देत ठेवली; आणि कर्तबगार यजमानांच्या लेखनाचे तीन मोलाचे दिवस फालतू गावगप्पांच्या कैफात नासून टाकण्याचं पाप माझ्या हातून घडलेलं असताना-सुद्धा सौ. इंदिराबहिनींनी माझ्या झोळीत शेकटाच्या चार शेंगा नि कुळथाच्या पिठाची पुडी बांधून दिली !

□

जंक्शन

मध्यंतरी मी थोडं अधिक शहाणं आणि व्यवहारी व्हायचं ठरवलं, तेव्हाची गोष्ट.

कुठल्या तरी दूरच्या गावाला धावत धावत जायचं, उभ्या उभ्या भाषण द्यायचं नि गेल्या पावली परतीची पहिली गाडी पकडून माघारी यायचं, ह्या खटाटोपात वेळेचं खोबरं होण्यापुरतं पदरात काहीही पडत नाही.

जी काही चार–दोन नाणी मिळतात त्यांचा प्रवासाच्या खटल्यात परस्पर फन्ना उडतो हा अनुभव आहे. तिकडे उत्तरेला सातपुड्याच्या पलीकडल्या चोपडे गावापासून इकडे दक्षिणेत भीमापार होऊन गुलबर्गा वगैरे पार टोकाकडल्या गावांपर्यंत मी पाकोळीसारखा उदंड भिरभिरलो.

उद्देश : भाषणबाजी.

फलित : दमछाक आणि हकनाक पश्चात्ताप !

नवीन गावात जावं; त्याच्या जुनाट इतिहासभूगोलाचा चेहरामोहोरा डोळे भरून पहावा; ज्यांच्या पिढ्यानपिढ्यांच्या पारंब्या त्याच भूमीत रुजून पुन्हा वर डोकावल्या आहेत अशा आयाबायांच्या हातचं पारंपरिक गावठी जेवण शांतपणे जेवावं, थोडा ऊन-वारा अंगाखांद्यावर खेळवावा नि मग सर्वांना राम-राम करून कामधंद्यासाठी परत यावं, हाच खरा राजमार्ग. प्रत्यक्षात तसं घडत नाही. राजमार्ग दिसतो, पण पाय आडवाटेला लागतात. भक्काभका बोलायचं नि बकाबका खायचं, असला काहीतरी अन्नाडी प्रकार होतो. तेव्हा ठरवलं, एकाच दिशेच्या किमान दोन गावांची दोन सलग आमंत्रणं लावून घ्यायची; थोडंसं हिंडायचं आणि दोन पैसे खिशात टाकून नंतर मुंबई गाठायची.

त्याप्रमाणे पहिल्या गावाला निघालो. तर नमनालाचा नन्ना लागला. वेळ टळली तरी फलाटाला गाडी लागेना. बरं, फलाटावर पॅसेंजरांचा कलकलाटही

इतका जोरदार होता की जीवाला धड करमेना. वाटे, माघारी फिरावं. ओझं उतरून ठेवावं नि झोपी जावं. आपलं भाषण झालं नाही म्हणून गावाची तब्बेत बिघडली असं काही होणार नाही. एरव्ही मोकळ्या मैदानात माझ्या समक्ष बसले असते, ते सारे गावकरी आपापल्या खुंटावर तमाखू चोळत बसतील. त्यांची अपार शांती ढळण्याची गोष्टच विसरा! खरी गोष्ट अशी आहे की लिहून लिहून नि वाचून वाचून आमचीच मनं, ताठपणा नि ताकद हिरावून बसलेली आहेत. प्रत्येक गोष्टीचा आम्हाला बागुलबोवा! येतो म्हणून गेलो नाही तर गाववाले काय म्हणतील? त्यांची कुचंबणा तर होणार नाही नं! दिलेला शब्द न पाळणं संस्कृतीत बसतं काय? आणि हे बेजबाबदारीचं आमचं उदाहरण सर्वांनीच गिरवलं तर देशाची काय गत होईल?

बोंबला!

सारखं मिनिटामिनिटाला घड्याळाकडे बघत गाडीची वाट पहाणं नशिबी आलं. मला विजयदुर्गाच्या खाडीकाठच्या माझ्या खेड्यातले बिनघड्याळाचे बिनधास्त, शांत दिवस आठवले.

अगदी रामायण–महाभारताच्या काळाचा दाखला देता येत नसला, तरी गेला बाजार कदंब राजाच्या काळापासून तरी आमच्या खेड्याचा तोंडवळा अगदी तोच तो असणार. नव्हे आहेच. दिवसागणिक बदल होणाऱ्या नि आमुलाग्र क्रांतीच्या गोष्टी कानावर येण्याच्या ह्या अलीकडच्या तीस-पस्तीस वर्षांत आमच्या गावातल्या वहाळातला साधा धोंडासुद्धा बदलेला नाही, मग बदल ही जेव्हा कल्पनासुद्धा गावकऱ्यांना ऐकून ठाऊक नव्हती, त्या शतकांच्या अंधारात गावकुसात काय फेरफार झालेला असणं शक्य आहे? शेकडो उन्हाळे पावसाळे येऊन गेले, राजवटी पालटल्या. माझा कोकणी गाव आहे तिथे आहे. दूर दर्या गाजतो आहे. दारात खाडी वहाते आहे. घाट्यांची वळणं उंच उंच गेली आहेत, त्यांच्यावरल्या झाडामाडात पक्ष्यांच्या शेकडो पिढ्या जोजवल्या आहेत, नि ऐलपैलावर विस्तारलेल्या प्रचंड आभाळात शतकानुशतकं घारी नि गरुड हिंडत आहेत. भातमळे आहेत तसेच आहेत. सांकव बदललेले नाहीत. गवती शाकाराची घरं, गोठे, गडघे, देवदेवळं, सर्व काही जागच्या जागी ठाम आहेत. अशा बिनबदलाच्या गावठाणात घड्याळ ही वस्तू कुणापाशी असण्याचा प्रश्नच नव्हता. सूर्याची सरकणारी सावली सांगेल तो वेळ! सकाळ, दुपार, संध्याकाळ, रात्र नि मध्यरात्र हेच तेवढं सत्य. बाकी नुसती अनुमानं.

साधारपणे सूर्य डोईस आला की बावीवर उन्हात आंघोळ. नंतर पत्रावळ लावून तिच्यावर यथेच्छ पण साधं जेवण. झोप. उठल्यावर अंगणात मेढीची सावली किती सरकल्याय ते पहाणं. फक्त इतकंच. वेळेची यातायात कुणीच करीत नसे. कारण कुणालाही कुठेही जायचं नसे. काम म्हणजे शेतावर, तरीवर किंवा मागीलदारी आगरात. चौथी दिशा कुणाला ठाऊक नव्हती. आणि ज्यांना खास दुसऱ्या गावी जायचं असे ते बहादर पहिल्या चांदणीलाच आंघोळी उरकून, भाकरतुकडा बांधून पहाटेच्या अंधारात घाट्या पकडून दमात निघालेले असत. आम्हाला जाग येई तेव्हा त्यांनी अर्धं अंतर तोडलेलं असे. गावात कधी कुणी कुणाला 'किती वाजलेत?' हा प्रश्न विचारलेला कानावर नाही. पोष्टमनची प्रचंड छत्री घाटीवर दिसली की साधारणपणे दुपारचे दोन वाजले आहेत असं आम्ही गृहीत धरायचे. आणि पोष्टमनची छत्री आठवड्यातून फक्त एकदा दिसायची! पण आमचं त्याहीही नडलं नाही. उगवलेला दिवस यथाकाळ निर्विघ्न मावळायचा.

कुठे गेले ते विनयातायातीचे दिवस?

उशिरा का होईना मास्तरांनी गाडी फलाटाला लावली ह्याच उपकारांनी वाकून फळीवर नम्रपणे झोपी गेलो. सकाळी जाग आली तेव्हा गाडी जंक्शनवर उभी होती. उतरलो.

हे जंक्शनचं ठाणं हेच माझ्या जोडभाषणापैकी पहिल्या भाषणाचं गाव. त्याचं रूप बघवत नव्हतं. पहावं तिथे दगडी कोळशाचा धूर साचून राहिलेला. तुंबलेल्या मोरीत पाय पडल्यावर जसं वाटेल, तसं मला जंक्शवर उतरल्यावर वाटलं. पहिली प्रतिक्रिया; पाय मागे घ्यावा!

रितीचं बोलायचं म्हणून स्टेशनावर मला उतरून घ्यायला आलेल्या हसतमुख कार्यकर्त्याला म्हटलं,

"वा! सकाळ तर मोठी प्रसन्न वाटत्येय तुमच्या गावातली!"

"हो बुवा!" कार्यकर्ते सांगू लागले, "तेवढी कृपा आहे निसर्गाची ह्या गावावर. सकाळी सात-आठ वाजेपर्यंत छान वारा असतो. ऊन कोवळं असतं. गडबड नसते. नंतर मात्र गाव तापतं. तशात जंक्शन, म्हणजे दगडी कोळशाचा वापर आलाच. त्याची धग फार. धूरही चिकट. हालता हालत नाही बघा. दुपारी बारा वाजता सगळं गाव घुसमटून निघतं धुराने. पहालच तुम्ही!"

मी घाबरलो. विचारलं,

"पण दगडी कोळसा फक्त स्टेशनच्या यार्डात जळणार. गावाशी संबंध काय त्याचा ?"

"आहे. ह्या गावातली नव्वद टक्के वस्ती रेल्वे नोकरांची आहे. आणि दगडी कोळसा राशीवारी आहे. तर घरोघरी लोक तोच वापरतात. एक तर तो फुकटात पडतो. नि पिढ्यानपिढ्या हेच चाललंय. उभ्या देशात कुठेही जा; मोगलसराईला जा, वाडीला जा, कुर्ल्याला जा, नाहीतर भुसावळला जा, रेल्वे कॉलनीतच नव्हे तर सबंध गावात जळण फक्त दगडी कोळशाचं असणार. गावात तुम्ही कुणाकडेही जेवा, कुठेही जेवा, सैंपाक हा दगडी कोळशावरचाच असणार. त्याला पर्याय नाही. दगडी कोळसा हा जंक्शनचा प्राणवायूच."

थक्क झालो.

प्रेमाने उतरवलं होतं तिथे उतरलो. दगडी कोळशावर झालेला चहाचा पहिला ग्लास समोर आला. तो घेतला. चवीत तसा काहीच फरक वाटला नाही. खिडकीतून पाहिलं. समोर तरंगणारं विरल पटल धुक्याचं आहे की दगडी कोळश्याच्या चिकट धुराचं आहे, कळेना. म्हटलं,

"ह्या धुरामुळे घुसमटून रोगराई नाही वाढत ? तब्येती कशा आहेत लोकांच्या ?"

"उत्तम. कारण इथलं पाणी भलतंच पाचक आहे. गर्मदेचा फाटा इंजिनियरांनी वळवलाय. पंप लावून पाणी गावभर खेळवलंय. शिवाय फिल्टर्ड. म्हणजे वस्त्रगाळापेक्षा उत्तम. ह्या गावात माणसं दुप्पट जेवतात. तुमच्यासाठी खास केळ्यांच्या शिकरणाचा बेत आहे आज. आमच्या इथे तेच पक्वान्न !"

मी हबकलोच. म्हणालो,

"अहो, अशा अविचार करू नका. मला इथे भाषण देऊन पुन्हा पुढच्या गावाला भाषण द्यायलाच जायचंय. तेव्हा कृपा करून पक्वान्नांचा मारा नको. खरं म्हणजे बोलणाऱ्याने पोट रिकामंच ठेवलं पाहिजे. जागोजाग जर यजमान असं भरपेट चारायला लागले, तर आम्ही भाषणं कशी द्यायची ?"

"भाषणाची काळजी करू नकात हो तुम्ही. ते व्हायचं तेव्हा होईल. आणि व्हायचं तसं होईल ! माणसंही लोटतील." कार्यकर्ते म्हणाले.

"पाचपन्नास तरी जमतील नं ?" मी विचारलं.

"पाचपन्नास ? अहो, हजार, दोन हजार जमतील ! इथे कुठलाही कार्यक्रम असो, घरटी दोन तरी माणसं जमणारच. इथे करमणुकीचं दुसरं साधन आहेच

कुठे? जंक्शनवर कामं करणाऱ्यांनी काही गोष्टी गृहितच धरायच्या असतात. मुख्य म्हणजे जन्मभर बकाल वस्तीत राहावं लागणार. इथे देव-धर्म, जाती-पातींना वाव नाही. सब घोडे बारा टक्के. ब्राह्मणाच्या ह्या बाजूला मोची नि त्या बाजूला खाटीक, असं घडणार. हा सोनारकी कासार, की शिंपी, ते ओळखता येणार नाही. सगळेच हातात पाने घेऊन यार्डात फिरणार. मुलाबाळांच्या शिक्षणाच्या नावाने बोंब. शाळा आहेत. पण जेमतेम. बकाल गावातली बकाल पोरं एकत्र जमणार. ती काय शिकणार? ऑफिसर लोकांच्या मुलांच्या इंग्रजी माध्यमाच्या हायक्लास शाळा आहेत. पण त्या दूर नि न परवडणाऱ्या. बारा महिने तेरा काळ ठरलेलं जेवणं. घरोघर केळी."

'मग माणसं बदली का मागत नाही?'

'बदली? अहो जंक्शनमध्ये नेमणूक व्हावी म्हणून माणसं हजारांनी रुपये वर पोचवताहेत! कारण जंक्शनमध्ये वरकमाईचा चान्स भरपूर! सगळ्या वॅगन्स इथे जोडणार नि इथून हलणार. व्यापारी इतकंच बघणार की आपली वॅगन आजच्या आज हालत्येय की नाही? हालली तर त्याचा पैसा दुप्पट होणार. ठप्प झाली की खोट! तेव्हा वॅगन मिळवणं, ती दिल्ली मेलला जोडून घेणं, मेलबरोबर ती हलणं आणि मध्ये कुठेही विघ्न न येता ती थेट दिल्लीपर्यंत नीट पोहोचणं, ह्या प्रत्येक गोष्टीला व्यापाऱ्यांना पैसे टेकवावे लागतात. त्यातला पै-पैसा सर्वांच्याच हातावर पडतो. मग असं सोन्यासारखं जंक्शनं कोण कशाला सोडणार? सिग्नलमध्ये तर पगारापेक्षा बाहेरची आवक जास्त असते!'

'म्हणजे लाच खाणं की हे!' मी.

'त्याला तुम्ही काहीही म्हणा. पण जे सर्वत्र चालतं, त्यात सामील व्हावं लागतं. पावलापावलाला पैसा लागतो. पगारात कसं भागणार? ज्या गणेशोत्सवात तुम्ही भाषण देणार आहात, त्या गणेशोत्सवात देणग्या कुणी दिल्या आहेत? व्यापाऱ्यांनीच नं? नि त्या प्रेमाने थोड्याच दिल्या आहेत? त्यांच्या वॅगन्स हालाव्यात म्हणून त्यांनी थैल्या सैल केल्यायत. पैसा सगळी कामं करतोय. तुम्ही आम्ही फक्त निमित्ताला! ते असो. तुम्ही आमच्या गावाला आलात त्याचा आनंद आहे. कानावर चार चांगले शब्द तरी पडतील पब्लीकच्या.'

'पण समजा, काहीतरी अडचण आडवी आली असती नि मी येऊच शकलो नसतो, तर तुम्ही काय केलं असतंत?' मी विचारलं.

'असं अनेकदा होतं की!' कार्यकर्ते सांगू लागले, 'आमचं ठरलेलं आहे. पाव्हणा आला नाही की रेकॉर्डस लावायच्या! लोक रात्रभर ऐकत बसतात. वक्ता आला नाही म्हणून कुणीही नाराज नसतो. सगळे मजेत असतात. तुम्ही देशात कुठल्याही जंक्शनच्या गावात जा, दोन फॅडं जोरात दिसतील. एक म्हणजे घराच्या पोरावाळांना इंग्लीश मिडीयम स्कुलात घालायचं. नि दुसरं म्हणजे तासंतास डॅन्स म्युझिक ऐकायचं. तुम्ही दौंडात कधी गेलाय की नाही? जरूर जा! दौंड फार पुढे गेलेलं गाव आहे!'

नर्मदातटाकी बसलेल्या अशा ह्या जंक्शनच्या गावात गजाननाला साक्षी ठेवून मी वाङ्मयीन अभिरुचीच्या भवितव्याबद्दल बोलणार आहे! भरदिवसा डोळ्यांसमोर काजवे चमकायला सुरुवात झाली!

थोडा वेळ निपचित पडून राहिलो.

नंतर तात्रातत्राना झालो. आन्हिकं उरकली. उन्हाची मजा बघत बसलो.

वारा पडलेला होता. समोरची निश्चल ठेंगणी झाडं कैद्यासारखी उन्हात बसवलेली वाटली.

कार्यकर्ते म्हणाले, 'रागावू नका विचारलं म्हणून, पण आज रात्री तुमची ओळख करून द्यायचं काम माझ्याकडे लावलंय; तर तुमची थोडीशी माहिती सांगाल काय?' मी लिहून घेतो.

'माहिती काय सांगणार? मी तुमच्यासारखीच एक नोकरी करतो नि कुणी सांगितलं तर तुमच्यासाखंच बोलतो! आता आज तुम्ही माझ्याबद्दल बोलणार आहात नं, तसं मी नेमून दिलेल्या विषयांसंबंधी बोलतो. तुम्ही पाच मिनिटं बोलाल, मी तासभर बोलेन, एवढाच फरक.'

'तरीसुद्धा तुमची थोडी वैयक्तिक माहिती सांगाच.'

'सांगतो. मी सेवादलवाला आहे. माझ्यावर सानेगुरुजींचे संस्कार आहेत.'

माझे हे शब्द कानावर पडल्याबरोबर त्या कार्यकर्त्यांचे डोळे लकाकले. आनंदून त्यांनी विचारलं,

'तुम्ही दलात होतात?

'हो नं. मी हडपसर कॅम्पवाला माणूस आहे!'

'अहो, मीसुद्धा हडपसरला होतो ! मला कल्पनाच नव्हती. किती दिवसांनी दलसैनिक भेटला ! आता तुम्ही खास पाहुणे झालात ! चला; मी तुम्हाला गाव दाखवून आणतो. सायकलवर डबलसीट बसाल नं ?'

'हे काय विचारणं झालं ?' मी म्हणालो.

विलक्षण उत्साहात त्यांनी सायकल रोडवर घेतली. जवळजवळ पस्तीस वर्षांनंतर मी डबलसीट बसलो ! सुरवातीला डुचमळलो पण क्षणात सावरलो. ऐन उन्हातून कार्यकर्ता सायकल रेटू लागला. ट्रिंग ट्रिंग करत बाजार ओलांडला. कार्यकर्ता म्हणाला, 'आता आपण नर्मदेला जाऊया.'

जंक्शनचा गाव मागे पडला. दुतर्फा गर्द झाडी असलेल्या भागात आम्ही आलो. आजुबाजुला हिरवा गार झाडझडोरा नि डोक्यावर नीळं लखलखीत आकाश होतं. ऊन होतं. पण पोळत नव्हतं. हे वडिलधाऱ्या माणसांच्या धाकासारखं होतं. धाक असतोच. फक्त त्याचा ताप नसतो.

चढण लागल्यावर मी उतरलो. सायकल झाडाला टेकवली. आणि आम्ही माथ्यावर पायीपायी पोहोचलो. तिथे पृथ्वीच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचल्यासारखं वाटलं, इतका सभोवारचा भाग सपाटीचा, सर्वदूर नि खोलगटासारखा वाटला. उंच आकाश वाटोळं वाटोळं वाटलं. खाली खबदाडीतून प्रस्तर फोडीत नर्मदा अखंड वाहात होती. तिला काठ असे नव्हतेच. वाव मिळाला तशी ती इतस्ततः पसरली होती. पात्रात उघडे बोडके कातळ होते. कुठे डोह होते. पाणी गढूळ होतं. पुढे पुढे सरकत होतं. नर्मदा नि तिचा परिसर उन्हाचं वस्त्र ल्याला होता. सृष्टीचं ते धुपकं रूप पाहून आल्हाद झाला.

'जंक्शनच्या बकाल गावाचं दुसरं रूप हे इतकं सुंदर असेल अशी कल्पनाच नव्हती मला.' मी म्हणालो.

'सगळीकडे असं आहे. प्रत्येक गोष्टीला अनेक रूपं आहेत. तुमचा पहिला परिचय कुठल्या रूपाशी होतो, त्यावर पुढल्या सगळ्या प्रतिक्रिया अवलंबून असतात. समजा, तुम्ही एस. टी.ने आला असतात, तर नर्मदेच्या किनाऱ्याकिनाऱ्याने, ह्या बाजूने गावात प्रवेश केला असतात. मग दगडी कोळशाच्या चिकट धुरानं तुमचं स्वागत केलं नसतं. गाणारे पक्षी दिसले असते. नदी दिसली असती. प्रसन्न वाटलं असतं. आल्या आल्या गावाने तुमच्यावर मोहिनी टाकली असती.' कार्यकर्ता म्हणाला.

अवघ्या आयुष्याची हीच मजा आहे. उशिरा का होईना, मोहिनी टाकणारी सौंदर्यस्थळं वाटेवर भेटत जातात. तुम्हाला टवटवीत करतात. वाटतं, हा टप्पा अगोदर भेटता तर केव्हढी बहार आली असती ! खरी गोष्ट मात्र वेगळी असते खूप दमछाक झाल्यानंतर सावलीचं वळण लागावं तसं बरचसं आयुष्य तुडवून झाल्यावर सौंदर्याचं सुखदान देणारा गाढ अनुभव भेटतो. तृप्तीचे दोन वळसे तो अधिकच देतो.

□

लेखकाचं इनाम

अनुभव तसा रोजचाच आहे, आणि बहुतेक सर्वांचाच असेल.

पंचविशीत आपलं बागडणं संपतं. तिथून आपण पौरुषाचा तोंडावळा असलेलं आयुष्य जगण्याचा श्रीकार टाकतो. ती दहा-पंधरा वर्षं सुंदर असतात. थेट चाळीशीच्या उंबरठ्यावर पोहोचेपर्यंत आपल्या प्रियजनांच्या सोबतीत आपण अगदी विनधास्त असतो. धमणीत उष्ण रक्त फेसाळत असतं. हाडात एक रग असते. पुढचामागचा विचार करायचं छदाम कारण नसतं. मस्तवालपणे जगून झालेलं असतं आणि जितकं भोगून झालेलं असतं, त्यापेक्षा मधुर चवीचं आयुष्य अवघ्या हाकेवर उभं असतं. आपण फक्त 'ओ' द्यायचाच काय तो अवकाश; आनंदाला कशात काही कमी नसतं. अंगणातही आनंद असतो नि आभाळही आनंदाने भरलेलं असतं.

चाळीशी ते पन्नाशी ही प्रौढ जवानीची वर्षं; आयुष्याची लज्जत ऐटीत घेण्याची. नियतीचा एकूण खेळ आणि त्या खेळातला कार्यकारणभावाचा अभाव डोळ्यांसमोर असतो. प्रकृतीची काळजी नसते, तडफ बाकी असते. लेकुरवाळ्यांची मुलं जाणती होत असतात. अवतीभोवती पाहावसं वाटतं. पाहण्यासारखंही खूप काही असतं. रमतगमत जाण्यात मजा येते. मागे नजर वळवा, हिरवे हिरवे गार गालीचेच दिसतात. पार करायचे पहाड जे समोर दिसतात, तेही रेशमी किरणांमध्येच गुरफटलेले असतात. मग काळजी ती कसली करायची? चाळीशी ते पन्नाशीचा हिशोब काढा. बेरीज 'आनंदी आनंद गडे' निघेल. अगदी या क्षणाला खतावण्या उघडून पाहा. आयुष्यातला तो काळ केवड्याच्या कणसासारखा घमघमेल.

इच्छा असो नसो, पन्नाशीत पहिली जाग येतेच. नाही म्हटलं तरी मन

हिशोबात गुंतायला लागतं. हातातली पन्नास वर्षं संपली हे रोकडं सत्य असतं. आता पन्नास बाकी उरली, हे बिलकूल खरं नाही, हे उमगतं. फार फार तर वीस असतील, पंचवीस असतील; सुदैवी असलो तर आरोग्यमान अशी तीस वर्षं भोगायला मिळतील. त्यापलीकडच्या क्षीण टप्प्यात काही अर्थ नाही हे जाणवतं. निघालो कुठून, कसे नि कुठवर येऊन ठेपलो हा प्रश्न रोकडं उत्तर मागत पाठलाग करू लागतो. एक मात्र बरं असतं. चरायची कुरणं अजूनही जवळपासच असतात. अंतरही कमी असतं नि अवघीही कमीच असतो. माणूस बिगीबिगी चरायला लागतो. जिभेची चव अजूनही शाबूत असते.

इथपर्यंत सर्व आलबेल असतं.

पन्नाशी गदगदून हालवते. म्हणते, महाराज, उठा आता. पथारी आवरायचं भान असू द्या. उशाचा दिवा मालवा. बाहेर छान उजाडलंय; पाहा तरी.

खरं म्हणजे पंचावन्नी गाठेपर्यंत बरचसं जगून झालेलंच असतं. सुख चाखलेलं असतं, फुलं गोळा करून झालेली असतात. पोरंटोरं हाताला आलेली असतात. निदान तिथपत येऊन तरी ठेपलेली असतात. नगण्य अंकुरांचं रूपांतर तरण्याताठ्या पर्णवैभवी झाडात होतं म्हणजे नेमकं काय, ते एव्हांना कळलेलं असतं. अदृष्टाच्या जबरदस्त हाकांचा स्वयंभू बाबर जाणवलेला असतो. एकाकीपणे प्रारंभ कुठून केला आणि माणसांच्या जमलेल्या मैफलीत येऊन ठेपलो कसे ताठ कण्याने, ह्याचं चकिताश्चर्य बाटलेलं असतं आणि निव्वळ स्वतःच्या बळावर ही संसार-शाकारणी झालेली नाही, हेही ठीक उमगलेलं असतं. आपण फार फार अपुरे आहोत, चैतन्यशक्तीचे सनातन साठे चराचरात अपरंपार आहेत. मळ्यात चारदोन रोपटी अधिक उगवली काय वा चार-आठ पाणवठे आटले काय, अंती हिशोबात काहीच फरक पडत नाही. कारण जीवनरसाने डबडबलेले झरे ऐलपैलात अक्षय वहाते असतात हे प्रत्ययाला आलेलं असतं. चालणं आपलं काम; हात देऊन तो कुणी एक पैलथडीला यथास्थित लावेल ही खात्री झालेली असते. मन घोकत असतं, बाबा त्याची कृपा हवी, त्याची कृपा हवी.

नेकीने नोकरीधंदा करून पैसाआडका कटाक्षाने बाजूला टाकण्याइतके जे सुरवातीपासूनच दक्ष असतात, त्यांना तर पन्नाशीनंतर वेगळ्या चेहेऱ्या-मोहोऱ्याची सुखं सामोरी येतात. तापत्रय सोशीत आजवर जगलो ते कुटुंबासाठी; त्यांचं गुणिले-गुणिले चांगभलं होवो; आता इथून पुढे आपण आपल्या

अंतःप्रेरणांना 'ओ' देऊन जगायचं, संसारात गुरफटायचं नाही, असं अनेकजण पक्कं ठरवतात. म्हणजेच संसारसुखं हाती लागतील तितकी पाखरांसारखी लुटायची, पण गुरफटायचं नाही. गुंतायचं तर अजिबातच नाही, हा असतो सर्वांचा मनसुबा.

सेवानिवृत्ती अटळ आहे. अंगापुरती बेगमी डोळसपणे केलेली असेल तर सेवानिवृत्तीच्या हद्दीला शिवण्याच्या अगोदरच काही दैववान महाभाग संसाराच्या रामरगाड्यातून हलकेच अंग बाहेर काढतात. स्वतःच्या कलाप्रमाणे साधं सरळ जीवित्व सुखेनैव अनुभवायला मोकळे होतात. केन्द्रीय कारभार खात्यातून आपखुषीने मुदतपूर्व निवृत्त झालेले एक बडे अंमलदार आता अंतःकरणाच्या हाकेला साद देऊन 'जसलोक' इस्पितळात निष्काम सेवा करीत आहेत. कदाचित एक प्रकारची पापनिष्कृती असेल. तरीही मनाच्या कोंडमाऱ्यातून हा असामी सुटला हे सत्य न विरघळलेल्या साखरेसारखं तळाशी उरतंच.

आमचे हरिश्चंद्र उजगरे मुळात पोलादासारखे ताकद्वान आणि निष्कलंक पोलीस अधिकारी. योगायोगाने व्यवसायात खांदेपालट झाला. ते बड्या उद्योगसमूहात सरसुकादम झाले. कशाला काही कमी नव्हतं. हात लावतील तिथे सोनं व्हायचं. त्यांच्या शब्दाला बाजारपेठेत तेजी आली. पण बळ लावून त्यांनीही वेळीच पाश तोडले. आता चर्चच्या सेवेत खुषाल आहेत. त्यांच्या ईश्वरनिष्ठ सात्त्विक पिंडाला तीच एक दिशा अखेर सापडली. दोस्त उमाकांत ठोमरे संपादनाच्या दैनंदिन लिप्ताळ्यातून सहिसलामत बाहेर पडले. आता मारे मनासारखं जगतात. अनाहूत अशा बेकार कवितांची दुरुस्ती करीत वेळ नासवीत नाहीत, की दुसऱ्याची भांडणे तिसऱ्याच्या ओसरीवर कुटण्याच्या जातकुळीची वाङ्मयीन टिकाटिपणीही लिहीत नाहीत. परवा म्हणाले, 'आता धावपळ नको वाटते. मी भल्या सकाळी उद्यानात फेरफटका करायला जातो. तरतरीत पानफुलं नि मोकळ्यावर बागडणारे पशुपक्षी पाहून उल्हसीत वाटतं! पण त्यापेक्षा अनोळखी मुलं आदबीनं म्हणतात, 'गुडमॉर्निंग, अंकल'! तेव्हा भरून येतं! आमच्या देविदास बागूलांची नि आमची काही कमीसमी वादाबादी झालेली नाही आजवर. पण तो जे एकपदरी आयुष्य त्याच्या स्वतंत्र पद्धतीने अगदी शांतपणे जगत आहे, त्याबद्दल त्या कलावंताला माझा सलामच आहे. अशी माणसं आहेत नि अधूनमधून का होईना ती दिसतात, हे

सुलक्षण आहे. निदान काही माणसांकडे पाश कापायची ती शक्ती आहे कुणी विवेकानंद केंद्राकडे वळतात; कुणी वनवासी भावंडांचे व्रती सेवक होतात. त्यांच्या नितळ आनंदाचे झरे त्यांना नीट ओळखता येतात नि त्या वाहत्या पाण्यापर्यंत पोहोचतात. समाधान पावतात. आणि आपल्या निग्रहाचं विलक्षण बळ दाखवून आम्हालाही समाधानाच्या डोहापर्यंत आणून सोडतात. वाहवा !

खर्चवेच नसलेलं असं साधंसुधं आयुष्य, ईश्वराने निर्माण केलेल्या अफाट सृष्टीचं नि तिच्यात जागोजाग राखून ठेवलेल्या आनंदाच्या टाक्यांचं भान ठेवत जगावं, अशी उबळ मला फार येते. दोन वर्षं झाली. मी एक लेख वाचला. पुण्यातली काही हौशी मंडळी निव्वळ फुलपाखरांचे थवे पहायला सिंहगडावर गेली होती. त्यांच्या आनंदपर्यटनाचा तो गहिंवरून लिहिलेला शब्दबंबाळ अहवाल होता. लेखन वातड होतं, पण त्यातला तळाचा शुद्ध आनंदानुभव गहिरा होता. मुळात माणसं कामधाम बाजूला सारून फुलपाखरांच्या मागे आपखुषीने लागतात, हीच किती रम्य गोष्ट आहे ! अशा टोळीत मी कसा नाही ? खंत वाटली. आत आत कुठेतरी वाटतं, आपल्यालाही अवसानरहित साधं जगता आलं पाहिजे. ज्यांच्या प्रत्यक्ष कार्यामुळे ज्यांना दिग्गज हेच विशेषण लागू पडतं, ते गुरु श्रीपाद कृष्ण कोल्हटकर नि वामन मंगेश दुभाषी उर्फ 'ऋग्वेदी' किती साधं, सुंदर नि अवसानरहित आयुष्य जगले ! आपल्या कुसुमाग्रजांचा विनवोभाटी कित्ता काय सांगतो ? थेट आबालाल रहेमानांसारखा अजोड चित्रकारांपासून अवलिये अब्दुल्ला आलमेलकरापर्यंत जी ईश्वरनिष्ठांची मांदियाळी लागून राहिलेली आहे, तिच्या जिवीत्वकथेचं सार काय ? कशाला गुरफटून ध्यायचं आपण झगमगाटात ? काय उरेल तो प्रकाश-वारा पटकन काढून घेतल्यावर ? आपल्याला इतर काही मनःपूर्वक जमत नाही; फक्त भटकणं नि लिहीत रहाणं त्यातल्या त्यात साधतं. तर मग पाय स्वाधीन आहेत, तोपर्यंत चार भराऱ्या तरी माराव्यात नि सगे-सोयरे 'आता जरा थांबवा' असं विनवीत नाहीत तोपर्यंत आपल्या शैलीबाहेर पडण्याचा भ्रष्टाचार न करता, आपल्याच एकमार्गी पद्धतीने अर्थपूर्ण लिहीत रहावं.

प्रत्यक्षात मात्र वेळ खराब होण्यावाचून दुसरं काही म्हणता काहीही घडायला कबूल नाही. भटकायला पैसे पुरेपूर लागतात किंवा सायास अनंत पडतात असं थोडंच आहे ?

दहा वर्षांपूर्वीची गोष्ट. वेळ तिन्हीसांजेची होती. मे मधले दिवस. मी आणि माझे वडील, असे आम्ही दोघेजण कोकणात तर ओलांडून जात होतो. खाडीचं पाणी भुळभुळू वाहात होतं. तिच्या पात्रात काठावरल्या झाडाझुडपांचं नि डोईवरल्या निळ्याशार आभाळाचं थरथरतं प्रतिबिंब उमटलेलं होतं. ऐलपैल शांत होतं. वटवाघुळं उडत होती आणि रातकिडे गुणगुणत होते. मी बाबांना म्हणालो, 'किती छान वाटतंय ! सगळीकडे शांत नि तृप्त. मी दरवर्षी येत जाईन इथे. असा आनंद एरव्ही कुठे मिळणार ? '

बाबांना स्वर्ग दोन बोटं उरला !

पुढे ? पुढे शून्य ! संध्याकाळचा नयनमनोहर निरव खाडीकाठ नि तिथे जागं होणारं पक्षी-प्राणी जीवन मनसोक्त पाहून यायला मला धड फावतच नाही. एक उमाळ्याचं अभिवचन हवेत नुसतं विरून गेलं. आणि त्याच्या बदलात पदरात काय पडलं ? तर नाक्यावर भेटलेल्या भंगार लेखकांची साहित्यातल्या चालू मानकऱ्यांविषयी चाललेली अखंड बोटमोडी ऐकणं, नातवंडांबरोबर चार पावलं रमत गमत हिंडायचं सोडून एकापेक्षा एक सवाई व्यासपीठं गाठण्यात घामाघूम होणाऱ्या गुणवंचित लडिवाळ लेखिकांनी नेम धरून सोडलेले मिट्ट गोड कटाक्ष सोसणं, आणि लोकलला आपसुख लटकणं !

जन्म नकोसा वाटतो.

मागे एकदा कवी वसंत बापट म्हणाले होते, 'रोज सकाळी आम्ही बघायचे, वामन मल्हार जोशी सिगारेट ओढीत शांतपणे 'लकी'मध्ये एका कडेच्या टेबलाजवळ बसलेले असायचे. पुढ्यात चहाचा रिकामा कप नि मांडीवर टेनिसची रॅकेट. त्यांना कसलीच घाई नसे. कुठेच जायचं नसे. किंवहुना काहीच करायचं नसे. उठायचं, रॅकेट घेऊन 'लकी'त जायचं, चहा प्यायचा, सिगरेट ओढायची, वाटलं तर खेळायचं, नाहीतर सरळ घरी परतायचं ! देणं नाही की घेणं नाही. लिहिण्याची सक्तीही नाही नि आसक्तीही नाही.'

असं हवं.

कधी कधी मलाही शिरशिरी येते. मी भल्या पहाटे उठतो. आज काही म्हणता काहीही करायचं नाही असा संकल्प सोडतो. एरव्हीही काही तरवार मारतो अशातला भाग नाही. परंतु एखाद दिवशी काहीही न करण्याची शपथ घेतो. माझ्या बिऱ्हाडापासून पवईचा तलाव तसा जवळ आहे. तिथपर्यंत धडकतो. तिथे हौशी मच्छीमार कायदेकानू गुंडाळून ठेवून पाण्यात गळ

टाकून पुतळ्यासारखे बसलेले असतात. त्यांच्या शेजारी जाऊन गप्प बसतो. सभोवार उन्ह शांत पडलेलं असतं. तलावातलं पाणी स्थिर असतं. मधूनच सळसळल्याचा आवाज होतो. ती पाण्याखालची मासळी असते. गळ पडलेलाच असतो. आपण तो खेळ काठावरून नुसता पाहात राहायचं. तास, दोन तास केव्हा गेले कळत नाही. काळाचं ओझं खांद्यावर नसणं म्हणजे काय, ते तलावाच्या काठावर निश्चल बसल्यावर कळतं. तळ्याच्या काठी आपण आपलेच सांगाती असतो. ते खरे निरपवाद सुखाचे क्षण, किंवा पुलकित क्षणांची आनंदयात्रा. अशांत, क्षुब्ध क्षण आसमंतातून हद्दपार झालेले असतात. आपलं समाधान आपल्या अगदी हातापाशी असतं, हे तळ्याच्या काठी उमगतं. कशाला आणायचं उसनं अवसान ? कशाला नि कुठंवर धावायचं न पावणाऱ्या देवांमागे ? काय गरज आहे अवांतर अवडंबराची ?

शाहीर परशराम संगमनेरात शिंपीकाम करून जगायचा. त्याच्या लेखणीवर दुसरा बाजीराव लुब्ध झाला. म्हणाला, 'तुम्हाला इनाम द्यायचंय. काय हवंय बोला.' पेशव्यांच्या देकाराला क्षणात माघारी पाठवताना शाहीर म्हणाला, 'काहीही नको. माझं शिंपीकाम मला पुरेसं आहे.' मूळातले शब्द आहेत :

"सुईदोऱ्याला हयात असो द्या,
तोचि इनाम मोकासा !"

□

एक धार्मिक आठवण

रावसाहेब पटवर्धन पाखरासारखे गोजिरवाणे, मोहक होते. त्या काळात तरी त्यांच्यासारखं गोमटं, खानदानी रूप असलेला पंडिती वळणाचा नेमस्त राजकीय कार्यकर्ता आमच्या परिसरात नव्हता. सूर्याची किरणं अंगणात पडली की जसं लख्खन शुभ वाटतं, तसं रावसाहेबांचं पाऊल पडलं की बैठकीत होई. रावसाहेबांना उपमा उगवतीच्या कोवळ्या सूर्यकिरणांचीच. प्रकाश नि ऊब ते देतच. भरीला शुचितेचा प्रत्यय देत.

अनंतराव गद्रे नेमके त्याच्या उलट. भारी गबाळ. ढिले. पैशाकडून गरीब; नि वृत्तीचेही तसेच. मात्र खरेखुरे कनवाळू. हिंदूंचे निस्सीम नि निःशंक वाली. पंडित बिलकूल नव्हते. कैवारी पत्रकार होतेच. 'निर्भिड' साप्ताहिक त्यांचं स्वतःचं. त्याच्या स्तंभांतून ते कुणाची ना कुणाची वारेमाप कड घेत; तळी उचलून धरीत; किंवा वैयक्तिक टिंगलटवाळी येथेच्छ करीत. ज्याची छेड काढीत तो वाटेत भेटला तर त्याच्या खांद्यावर हात टाकून त्याला नाक्यावरच्या इराण्याकडे नेत. सिंगल चहा पाजून सांगत, 'ते काल लिहिलंय ते मनावर घेऊ नका. पत्रकारितेत दोन दे, दोन घे, हे चालायचंच. ह्या आठवड्यात तुमची टर उडवल्याय नं ? आता पुढच्या आठवड्यात भरपाई म्हणून स्तुती करून टाकतो. फिट्टंफाट होऊन जाईल.' मग तो हिरमुसलेला माणूस खुष होई. पुढला अंक आतुरतेने वाचे. त्यात त्याची स्तुतीही नसे. निंदाही नसे. तिसराच काहीतरी चविष्ट विषय खुमारीने हाताळलेला असे. तो वाचताना मजा येई. विषाद निवून जाई. असे अनंतराव होते. एक ना धड, भाराभर चिंध्या सदैव सोबत बागवणारे. त्यातली एक हिंदुत्वप्रेमाची भगवी चिंधी भारीच चिवट, स्वच्छ नि अस्सल वीणीची होती.

अशा त्या कनवाळू नि कैवारी अनंतरावांच्या घरी मी रावसाहेबांना घेऊन निघालो. सेंट्रल चित्रपटगृहाशेजारच्या गोरेगावकरांच्या शेवटच्या चाळीत तळमजल्यावर अनंतरावांचं बिऱ्हाड होतं. तिथे त्यांनी सत्यनारायणाची पूजा घातली होती. वास्तविक रावसाहेब हा जसा प्रगल्भ प्रज्ञेचा तसाच ठाम बुद्धिवादी माणूस. कर्मकांडाला ते जुमानणारे नव्हते. मात्र अनंतरावांकडच्या सत्यनारायणाला ते अगत्याने आले, कारण ती पूजा असांकेतिक होती. एका हरिजन जोडप्याच्या हातून केलेली होती. आजवर असं कधी घडलंच नव्हतं. पूजाविधी हा सवर्णांचा मक्ता होता. सवर्ण दांपत्याने सोवळं लावून देवासमोर पाटावर बसायचं नि भटजींनी पोथी वाचायची हा रिवाज शतकानुशतकं रूढ होता. अनंतरावांनी इथे फाटा फोडला. त्यांनी देवासमोर हरिजन दांपत्य बसवलं आणि तेही ऐन ब्राह्मणाच्या घरात; ब्राह्मणांच्या लत्त्यात. अनंतरावांनी त्यांच्यापरीने छोटीशी क्रांतीच केली होती. धर्म अंगूळभर पुढे नेला होता. रावसाहेबांना तेच अभिप्रेत होतं. ते अनंतरावांच्या ओटीवर प्रसन्नवदन हजर झाले. मोठं कौतुक झालं. अंगणातच आमच्यासाठी खुर्च्या टाकल्या होत्या, त्यांच्यावर आम्ही बसलो. अनंतरावांचं खांद्यावर उपरणं टाकून सारखं आतबाहेर चाललं होतं.

अनंतरावांची अनेक दर्शनं त्यापूर्वी मी पाहिली होती. तसे ते ट्रूमबाज नि ध्येयवादी, दोन्ही एकाच वेळी होते. सिनेमाची उदंड जाहिरात करणं आणि प्रसिद्धीच्या झगझगाटात कलावंतांना लोटणं, हा त्यांनी पोटापाण्याचा व्यवसाय म्हणून निवडला होता. सोहराब मोदींकडे ते पगारी नोकरीला होते. आजन्म तिथेच टिकले. आणि हिंदूंच्या हितावर आजन्म गस्त घालणं हे त्यांनी आपलं अवतारकृत्य मानलं होतं. त्यापासून तर ते जन्मात कधी ढळले नाहीत. असं असूनही त्यांना मुसलमान मित्रसुद्धा होतेच. इतकंच नव्हे तर दंग्यांमध्ये जसे ते घायाळ हिंदूंना वैद्यकीय मदत तातडीने देण्याचं काम स्वतःचा जीव धोक्यात घालून रात्रंदिवस करीत, त्याचप्रमाणे संकटात सापडलेल्या निराधार मुसलमानांना संरक्षणही प्राण पणाला लावून देत. तसा ते भेदभाव मानीत नसत. माणूस त्यांना इथून तिथून सारखाच होता. मग तो हिंदू असो वा अन्य धर्मीय. मात्र भगव्या निशाणाखालच्या हिंदू धर्माला ते जीवनातलं सर्वोच्च मूल्य मानीत. तिथे तडजोड नव्हती. आणि जातीभेदाच्या तर ते सरळसरळ विरोधात होते. हिंदू धर्माच्या प्रशस्त हवेशीर प्रांगणातल्या जातीजमातींच्या भिंती नष्ट झाल्या

पाहिजेत आणि आपण स्वतः त्यात पुढाकार घेतला पाहिजे, ही त्यांची अविचल श्रद्धा होती. म्हणून त्यांनी हरिजनांसकट सर्व हिंदूंच्या सहभोजनाचा आखाडा घातला. ग्रँटरोडच्या मुझफराबाद हॉलमध्ये झालेलं सहभोजन मी पाहिलं आहे. अनंतराव यजमान होते. प्रबोधनकार ठाकरे पाहुणे होते. महारांसकट सवर्ण हिंदूंची पंगत झुणकाभाकर खायला खेळीमेळीने बसली होती. परातीतून भाकऱ्या येत होत्या. पातेल्यातून झुणका. हेच जेवण. आणि त्या काळी स्वस्ताई रगड होती. वाढपी भराभरा वाढीत. अनंतरावही वाढीत होते. पंगतवाले भाकऱ्या फस्त करीत होते. अनंतरावांना पंगतीतून पुकारे होत, 'आण्णा, आणा.' आणि आण्णा भाकऱ्यांची परात पंगतीत रिकामी करीत.

नाक्यावरल्या हॉलमध्ये सुरू झालेली ही समाजसुधारणा अनंतरावांनी आपल्या अंतर्बाह्य ब्राह्मणी घरात बळेच ओढून आणली. आपल्या घरातच हरिजनाला देवपूजेला बसवला. माझी आठवण धड असेल तर ते दांपत्य चांभार जातीचं होतं. हे अपूर्व होतं. आणि म्हणून रावसाहेब रस्ता वाकडा करून मुद्दाम आले होते. खांद्यावर उपरणं आडवं टाकून अनंतरावांचं सारखं आतबाहेर चाललं होतं.

पूजाविधी आटोपला. अनंतरावांनी त्या दांपत्याच्या पायाला तीर्थाची पळी टेकवली आणि ते तीर्थ घेऊन ते आम्हाला द्यायला आले. रावसाहेबांची नजर होतीच. त्यांनी अनंतरावांचं ते कृत्य स्पष्ट पाहिलं होतं. तीर्थ न घेता ते अनंतरावांना मऊ आवाजात म्हणाले, 'असं करू नका अनंतराव. देवाचं तीर्थ घेणं एक वेळ समजू शकतं. पण माणसांच्या पायाचं तीर्थ कशासाठी घ्यायचं? ते कुठली मुक्ती देईल? उलट, एका ब्राह्मणी कर्मकांडावर फुली मारता मारता तुम्ही हे एक नवंच थोतांड उभं कराल? पर्यायाने तुमच्या कार्याचा नाश होईल. असं करू नका. तुमचं काम अत्यावश्यकच आहे. ते संयमाने पुढे न्या'.

अनंतरावांनी आग्रह केला नाही. ते फक्त डोळ्यांनी हसले.

मग माझ्याकडे वळून रावसाहेब म्हणाले, 'पहा, अगदी दादाभाई नवरोजींपासून आजपर्यंत राष्ट्रहिताच्या प्रागतिक विचार ह्या भूमीत मांडले गेले. पण हरिजनांच्या प्रश्नाला मूळापासून कुणी हात घातला नाही. हरिजनांचं सहकार्य घेतलं. त्यांना समपातळीत मानलं. त्यांना शिकवलं. नोकऱ्या दिल्या. धंदे दिले. पण देवधर्मात ते दूरच राहिले. गांधीजीसुद्धा अपवाद नाहीत. ते अजब काम साने गुरुजींनी केलं. इच्छा असेल त्या हरिजनाला थेट पंढरीच्या पायावर मस्तक

टेकण्याची मुभा आता कायद्यानेच मिळाली आहे. पण पुन्हा हे सगळं देवळात म्हणजे आपल्या घरापासून दोन पावलं दूरच ! म्हणून, अनंतरावांचं हे काम अभिनव आहे. त्यांनी ब्राह्मणाघरच्या पूजेतसुद्धा हरिजनाला उमाळ्याने सहभागी करून घेतलं. एक पाऊल आता पुढेच पडलं आहे.'

अनंतरावांनी हे सारं हसऱ्या डोळ्यांनी ऐकून घेतलं.

रावसाहेबांना घेऊन मग मी शेजारच्या मैदानावरल्या सेवादलाच्या शाखेवर गेलो. वाटेत रावसाहेब मला दादाभाई नवरोजींच्या अलौकिक दूरदृष्टीबद्दल भलत्याच उत्साहात काहीतरी सांगत होते. त्यांची जणू तंद्रीच लागली होती. त्या भरात त्यांनी मला दादाभाईंचा लांबलचक इंग्रजी परिच्छेद मोठ्या थाटात तोंडपाठ म्हणून दाखवला. त्याचं मर्म माझ्या डोक्यावरून गेलं.

शाखेत त्यांना मुलांचा गराडा पडला; त्यांची तंद्री लागलेलीच होती. त्यांनी मुलांना प्रश्न केला, 'मी तुमच्याशी बोलेन, पण अगोदर दादाभाईंची कामगिरी काय, ते मला तुमच्यापैकी कुणीही एकाने सांगा.'

रामा, शिवा, गोविंदा ! एकाच्या तोंडून शब्द फुटेल तर शपथ !

अत्तर शिंपलेल्या रेशमी झुलझुळीत वस्त्रासारखे आतापर्यंत मऊमऊ वागणारे रावसाहेब, क्षणार्धात अग्निबाणासारखे उसळले. कडाडले, "काय अर्थ आहे माझ्या बोलण्याचा ? अरे, स्वातंत्र्य मिळून सहा वर्षं झाली, तरी ज्यांच्या प्रयत्नांनी हे स्वातंत्र्य सिद्ध झालं, त्यांच्या कार्याची तुम्हाला साधी शाब्दिक माहितीही असू नये ? शेम !' आणि तत्काळ ते तरातरा निघून गेले !

मी शरमलो. काय करावं तेच मला कळेना.

रात्री चरख्यावर बसलो. त्या वेळी ठाम निश्चय झाला. उद्याच रावसाहेबांच्या घरी जावून दंडवत घालायचा नि क्षमा भाकायची. 'गीताई' परत परत हेच सांगते. पश्चात्तापे पाप संपते.

गेलो. दादर स्टेशनाच्या जवळच्या विपुल सावलीच्या बोळातलं रावसाहेबांचं माडीवरलं विऱ्हाड दिसलं. क्षणभर तिथेच थबकलो. मनात आलं, रावसाहेब काय बोलतील ? भोडंती करतील ? गेल्यापावली पिटाळून लावतील ? की माझ्या शिकवणीचा क्लासच सुरू करतील ? की, चक्क अबोला धरतील ?

परिणामाला मन सिद्ध केलं नि रावसाहेबांच्या शांत आवारात पाऊल टाकलं तोच माडीवरून माझ्यासाठीच घातलेली मंजुळ शीळ मला ऐकू आली. होय ! स्वच्छ धुपके कपडे घातलेले ते सुंदर रावसाहेबच मला मंजुळ शीळ घालून,

माझं गोड 'सुस्वागतम्' करीत होते. झालं गेलं गंगेला मिळालेलं होतं. मला मोकळं मोकळं वाटलं.

रावसाहेब पटवर्धन त्या सकाळी पाखरासारखे गोजिरवाणे नि मोहक तर दिसलेच. खेरीज, ह्या जाणत्या माणसाला राग विसरण्याचा पाखराचा धर्मही लाभलेला आहे ह्याची अटकळ आली.

पाखरं कुठे कुणाचा राग राग करतात ? ती तर उंचावर बसून शीळ घालतात; गाणी गातात.

□

जगण्यातलं कडू-गोड

कधी कधी प्रश्न पडतो, माणसांच्या ह्या अफाट दुनियेत वागायचं तरी कसं ?

आकाशवाणीवर काम करीत असताना एकामागोमाग एक आलेले तीन अनुभव सांगतो.

साहित्यसंमेलनांच्या अध्यक्षपदासकट सगळे भरजरी मानसन्मान केव्हाच मिळवून बसलेले एक वयस्क लेखकराव आकाशवाणीवर आले. त्यांच्या भाषणाचं ध्वनिमुद्रण इतमामाने आटपून, चहा मागवला. चहा येईपर्यंत काही ना काही बोलणं भागच होतं. आणि, फालतू बोलून चालण्यासारखं नव्हतं. म्हणून विचारांच्या जरा बरच्या पट्टीला भिडत मी लेखक महाशयांना म्हणालो,

'सर, तुमचं लेखकीय आयुष्य म्हणजे कित्ता घेण्यासारखं आहे ! एक पडशी पाठीवर मारून तुम्ही एका वैराण खेड्यातून निघालात. खाचखळगे पार करीत शहरगावी आलात. लेखक झालात, संपादक झालात. सगळीकडे गाजलात. संमेलनाचं अध्यक्षपद भूषवलंत नि राजदरबारीही तुमचा उदोउदो झाला. आणखी काय हवं असतं माणसाला ? दैवानं उदंड कृपा केली तुमच्यावर !'

'एका परीने खरं आहे तू म्हणतोस ते.' लेखकराव नम्रपणे म्हणाले.

'माझ्यासकट अनेकांना पुढे जावंसं वाटतं. मोठं व्हावंसं वाटतं. तर, तुम्ही काही यशाचं सूत्र सांगा नं, आम्ही लहान मंडळींनी मोठं कसं व्हायचं ?'

त्यावर थंडपणे ते उद्‌गारले,

'मोठं व्हायची पहिली पायरी म्हणजे गरजवंताला कायमचा गरजवंतच ठेवायचं. हे ऐकायला तुला जरा कठोर वाटेल, पण तेच तत्त्व हमखास उपयोगी पडेल. आपल्या आजूबाजूला जे असतात तेच आपल्याला लहान

किंवा मोठं समजतात. फार दूरच्यांचा विचार करायचं कारण नाही. ज्यांच्यात आपली नित्य उठबस असते, त्यांच्यातच आपल्याला मोठं व्हायचं असतं. आणि आजूबाजूला जे असतात त्यांच्यात गरजवंत पोत्यांनी भरलेले असतात. ते गरजवंतच राहिले तर आपलं थोरपण टिकतं. त्यांच्या गरजा संपून ते आपल्याच पंक्तीला आले तर आपलं महत्त्वच त्यांना बाटेनासं होतं. चित्रपटांमध्ये हे मी धोरणच ठेवलंय. माणसांना मी माझ्या दारात चकरा मारीत ठेवतो. उद्या त्यांची गाणी मी शिफारस करून ध्वनिमुद्रित करीत राहिलो नि त्यांची नावं गीतकार म्हणून झळकायला लागली, की दुसऱ्या दिवशी ते मला जुमानीतनासे होतील! तेव्हा, गरजवंताला गरजवंत ठेवणं, हीच मोठेपणाकडे जाणारी वाट आहे. माझ्याकडे कितीही बडा प्रोड्यूसर येवो, मी त्याला माझ्यासाठी अगोदर समोरच्या हॉटेलातून सिगरेटी आणायला पिटाळतो. का? कारण तो गरजू आहे हे त्याला पटलं पाहिजे. तू देखील मग्रुरीने वाग—आपोआप मोठा होशील!'

'हे सगळं ऐकायला फार कठोर वाटतं!' मी म्हणालो.

'सत्य कठोर नि काटेरी, दोन्ही असणार. तू अनुभव घेऊन बघ. इथे आकाशवाणीवर शेकड्यांनी गरजू लेखक नि कवी येत असतील. त्यातल्या पाच जणांना निवड नि त्यांना भरपूर प्रसिद्धी देऊन बघ. त्यांचं जरासं नाव झालं की ते तुला टांग मारतील! आज तू त्यांची इतकी कामं करतोस—उद्या नाव झाल्यावर ते तुझं एकही काम करणार नाहीत! अनुभव घे. तेच, तू त्यांना गरजवंतांच्या पायरीवर ताटकळत ठेव—ते तुला सांजसकाळ सलाम करतील! थोडा कठोर हो नि सत्याला भीड.'

अनुत्साही मनाने नंतर मी त्या लेखकरावांबरोबर चहा प्यायलो.

तो कठोर संदेश विसरून गेल्यानंतरची गोष्ट.

एक सात्त्विक शिक्षिका आकाशवाणीवर भाषणे देण्यासाठी यायच्या. पुढे पुढे त्या घरोब्याने वागायला लागल्या.

एके दिवशी त्या त्यांच्या शाळेच्या मुख्याध्यापिकेला घेऊन आल्या. मला वाटलं, त्यांना आकाशवाणी केंद्र पहायचं असणार. तर त्या आमच्या घरोब्याच्या झालेल्या शिक्षिका मला म्हणाल्या,

'ह्या आमच्या हेडबाईंना आकाशवाणीवर भाषण करण्याचा चान्स हवा आहे. मी म्हटलं, मी विचारून पाहते.'

मी उत्साहाने म्हटलं,

'त्यात काय मोठंसं कठीण आहे? अनायासे पुढल्याच महिन्यात शिक्षक-दिन आहे नि मी अजून कुणी वक्ता मुक्रर केलेला नाही. तुम्ही अगदी वेळेवर आलेल्या आहात. पंधरा मिनिटं थांबा. मी केंद्राधिकाऱ्यांशी बोलून घेतो नि लगोलग करारपत्रही आत्ताच्या आत्ता करून टाकतो; त्यात आहे काय नि नाही काय!'

केंद्राधिकाऱ्यांना समजावून सांगितलं. त्यांनी क्षणात मान डोलावली.

मी करारपत्र तयार केलं. त्याच्यावर त्या मुख्याध्यापिकेची स्वाक्षरी घेतली. भाषणाचा गाभा काय हवा ते समजावून सांगितलं. नंतर चहा पिताना त्यांच्या चेहेऱ्यावर जी खुषी दिसली, त्याचं मला खोलवर समाधान वाटलं. माझे वडीलही असेच मुख्याध्यापक होते, त्याची मला आठवण आली आणि उठून मी बाईंना लिफ्टपर्यंत पोहोचवायला गेलो.

लिफ्ट वर यायला उशीर होता. म्हणून रेंगाळलो. इतक्यात, त्या घरोब्याच्या झालेल्या शिक्षिका मला म्हणाल्या,

'सर, मला तुमच्याशी दोन मिनिटं जरा बोलायचंय.'

मुख्याध्यापिकांना लिफ्टजवळ थांबवून घरोब्याच्या झालेल्या त्या बाई माझ्याबरोबर परत माझ्या केबिनमध्ये आल्या नि जवळपास कुणीही नाही असं अजमावून अगदी कुजबुजल्याच्या आवाजात जवळकीच्या भावनेने म्हणाल्या,

'अहो, असं काय वागलात तुम्ही?'

गोंधळून मी म्हटलं,

'का? काय चूक झाली माझी? मी त्यांना फार आदराने वागवलंय.'

'हीच चूक केलीत तुम्ही—पुन्हा असं करू नका.'

मला बोधच होईना त्यांच्या बोलण्याचा. इतक्यात त्याच फोड करू लागल्या,

'सर, तुम्ही थोडे आढेवेढे घ्यायला हवे होतेत! तुम्ही त्यांचं काम झटपट करून टाकलंत, त्यामुळे त्यांना ह्याचं महत्त्वच वाटणार नाही. तुम्ही त्यांना दोन हेलपाटे घालायला लावले असतेत नं, तर त्यांना रेडिओ म्हणजे काहीतरी प्रचंड आहे असं वाटलं असतं! आता तर काय तुम्ही नळ सोडल्यावर पाणी यावं तसं केलंत. त्यामुळे त्यांच्या लेखी तुमचा दरारा राहणार नाही. त्या आता सर्वांना सांगतील, रेडिओवर काय चुटकीसरशी कामं होतात! तेव्हा मी

आपलेपणाने तुम्हाला सांगते, कामं सगळ्यांची करा. पण अगत्य दाखवू नका. अशाने तुमची किंमत नाहक कमी होईल ! तुमचं महत्त्व वाटलं पाहिजे. खरं नं ? तेव्हा कुणीही आलं तरी त्याला एकदोन तरी हेलपाटे घालायला लावाच सर. तरच चालू जमान्यात तुमचं महत्त्व वाढेल.'

एकदा तर भारीच विपरीत अनुभव आला.

आकाशवाणीवरून ज्या चर्चा ध्वनिक्षेपित होतात, त्यात नेहेमी तीन असामींना बोलावतात. पैकी एकजण चर्चेचं संचलन करतो. उरलेले दोघे बक्ते चर्चा रंगवतात.

एकदा मी एका नामवंत साहित्यिकाला चर्चेसाठी बोलावलं नि त्याच्या जोडीला दोन उगवते साहित्यिक दिले. करारपत्र रवाना झाल्यावर त्या नामवंताचा फोन आला, त्यांनी विचारलं,

'माझ्याबरोबर चर्चेत कोणकोण आहेत ?'

'दोन उगवते तारे मी हेतूपूर्वक घेतले आहेत.' मी सांगितलं.

'म्हणजे ?'

'म्हणजे असं की तुम्ही भरपूर नाव कमावलेलं आहे. तुमचं नाव घेतलं की श्रोते रेडिओ लावणारच. त्याचा फायदा नवोदित लेखकांना मिळावा असा माझा हेतू आहे. शिवाय त्या लहान जीवांना देखील तुमच्यासारख्या मोठ्या लेखकाबरोबर चर्चा करण्याची संधी मिळाल्याचा आनंद होईल. त्यांना जरा धीर येईल'. मी सांगितलं.

'छे छे! हे काय भारुड सांगताहात तुम्ही मला?' ते मला झटकून टाकत म्हणाले, 'दुसऱ्याला माझ्या मोठेपणाचा फायदा मिळवून द्यावा हे काही माझं अवतार कृत्य नाही ! ऐकताय नं मी काय सांगतो आहे ते ? माझी बांधिलकी फक्त माझ्याशी आहे. मी अधिक मोठा कसा होईन हा प्रश्न आहे. माझ्याबरोबर तुम्ही नवोदितांना जुंपू नका. ती कामं करणारे समाजसेवक वेगळे आहेत. मी समाजसेवक नाही–नाही–नाही. मी लेखक आहे आणि मला पुढे जायचं आहे. तेव्हा माझ्याच दर्जाचे कुणी चर्चेत असतील तरच मी आकाशवाणीवर येईन. नपेक्षा तुम्ही करारपत्र रद्द करून टाका.'

मी थंड पडलो. काकुळतीने विचारलं,

'ठीक आहे, पण ते नवोदित लेखक इतके खुषीत आलेले आहेत, त्यांना काय सांगू?'

'त्यांचा आनंद कायम टिकवण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे? असं भाबडेपणाने वागू नका बुवा. अहो, जगात ज्याचा तो! ज्याच्या त्याच्या संचिताप्रमाणे जगात जो तो मोठा होईल, किंवा न होईल. तुम्ही तुमच्यापुरतं पहा. नवोदितांचा तुम्ही विचार करायचं अजिबात कारण नाही. आणि, मी म्हणतो, नाही चार नव्या अंकुरांना वाढायला वाव मिळाला ह्या जगात, तरी त्यामुळे काय मोठंसं बिघडणाराय? लक्षात ठेवा, फुलायचे ते कसेही फुलतील, नि करपायचे ते करपतील. तुम्ही दुसऱ्यांची नाहक काळजी करायचं कारण नाही. समजलं?'

इतकं बोलून त्यांनी फोन बंद केला!

काय करायचं अशा परिस्थितीला?

तेव्हापासून मी सारखा विचार करतो आहे की माणसांच्या ह्या दुनियेत माणसांनी माणसांशी कसं वागावं? कलावंतांना, लेखकांना स्नेहभावनेने वाव दिला तर आपलं महत्त्व कमी होतं; बरं मित्रत्वाचा हात दिला नाही तर अपराध्यासारखं वाटतं. कशी वाट काढायची ह्यातून? गरजवंतांनी ठेसून भरलेल्या आपल्या विषम समाजात कसं वागायचं?

निर्णय होत नाही. तेव्हाही झाला नाही. जसा माझा पिंड, तसाच मी उमाळ्याने वागलो.

तेही दिवस पालटले.

परवा अचानक विल्यम सारोयानचं 'दी टाईम ऑफ युवर लाईफ' हाताशी आलं. वाचता वाचता लक्षात आलं, सारोयानच्या पुढ्यातसुद्धा हाच यक्षप्रश्न पडला होता. माणसांशी वागायचं कसं? त्या कुटाचं उत्तर देताना सारोयान लिहितो,

'जगताना सुंदर जगा. म्हणजे कुरूपता आणि क्षय गळून पडतील, आणि ते सुंदर होईल. ज्याला तुमचा स्पर्श होईल अशा चांगुलपणाच्या मागावर राहा. चांगुलपणा दिसला रे दिसला की तो उघडकीला आणा. मूल्यांचं रक्षण करा. सर्व वस्तुजातात एक लखलखीत, अकलंकित,

असा भाग असतो, तो हुडका. हरएक हृदयात सद्भाव आहे. तो शोधा. कुणाही माणसापेक्षा स्वतःला गौण समजू नका, नि वरचढही लेखू नका. लक्षात ठेवा, प्रत्येक व्यक्ती ही तुमचीच वेगळी आवृत्ती आहे. इतरांच्या दोषात तुम्ही आहातच नि तसंच त्यांच्या निरागसतेतसुद्धा. दुष्ट आणि राक्षसी प्रवृत्तींची घृणा बाळगा, पण दुष्ट नि राक्षसी छटा असलेल्या माणसांना दूर सारू नका. त्यांना समजावून घ्या. सहृदय आणि प्रेमळ वागण्याची लाज बाळगू नका. मात्र, तशीच वेळ आली तर प्रहार करा, नि मग पश्चाताप करू नका. कारण तसं जगताना जगाच्या दुःखात किंवा क्लेशात तुम्ही भर घालीत नसाल. उलट, जगण्यात जो निःसीम आनंद आहे, त्याच्याशी तुम्ही स्मीत-पूर्वक हस्तांदोलन करीत असाल.'

आज ह्या क्षणी माझ्या हातात हे पान आहे. वाटतं, आयुष्याचा डाव खुलवायला हुकुमाचं पान म्हणून कदाचित हेच उपयोगी पडेल.

□

लेखकाचा स्वर्ग

आठ दहा वर्षांपूर्वीची गोष्ट.

एका मुख्यमंत्र्यांनी काही ठळक लेखक-लेखिकांना मेजवानीसाठी आपल्या बंगल्यावर बोलावलं होतं. वाहनांची व्यवस्थाही होती. त्यामुळे वयोवृद्धांसकट सर्व बालगोपाल आमंत्रितांनी मांडवात दाटी केली. अशा कार्याच्या ठिकाणी केळीच्या खांबासारखा मी असतोच.

मुख्यमंत्री झकपक रेशमी पोषाखात आले. नमस्कार-चमत्कार झाले. ओळख-परेड झाली. सलामीलाच लक्षात आलं की, तीन-चार ठळक पत्रकार सोडल्यास, इतर लेखकांची नावंही मुख्यमंत्र्यांना माहीत नाहीत! अर्थात नामदार पटाईत असल्यामुळे त्यांनी खेळीमेळीने वेळ मारून नेली. पिसांसारखे मऊमऊ शब्द वापरले. हास्याचा सुगंध खेळवला. तथापि, जमलेले लेखकही मुख्यमंत्र्यांचं बारसं जेवलेले होते. त्यांच्या लक्षात आलं की हा सारा देखावा चालू आहे. ह्यात हृदयाची गुंतागुंत शून्य. किंबहुना, हे मुख्यमंत्री साहित्याचं काही देणंघेणं लागत नव्हते. तो त्यांचा विषयच नव्हता. चार खटपट्यांनी भरीला घातल्यामुळे हे प्रीतिभोजन त्यांनी उपचार म्हणून घातलेलं होतं, इतकंच.

भोजन उत्तम होतं. ते आटोपल्यानंतर झालेले निरोपाचे नमस्कार तर अभिजात होते; नाटकवाल्यांनीही त्यापासून शिकावं, असे!

परतीच्या प्रवासात काही लेखक फार हळवे झाल्याचं माझ्या लक्षात आलं. मुख्यमंत्र्यांनी कुणाचंही काहीही वाचलेलं असू नये, ह्याचा त्यांना भारी अचंबा वाटला. काहीजण म्हणाले, 'पंडित नेहरूंचा नि मौलाना आझादांचा जाणकार जमाना संपला हो. हे तद्दन गावठी राज्यकर्ते लेखकांच्या समस्या कसल्या कर्माच्या सोडवणार? भिक्षुकांना भोजन घालून ह्या गोब्राह्मण-प्रतिपालकांनी एक अहिंसक खेळी खेळून घेतली! हा बोगस समारंभ ठरवला होता रे कुणी?

आणा त्याला समोर !'

इथपर्यंत ठीक होतं.

नंतर काही पश्चात्तापदग्ध साहित्यिक एकमेकांना सांगू लागले, 'फॉरिनमध्ये असं नसतं. तिकडे म्हणे सत्तेवरली मंडळी लेखकाला कौस्तुभमणी समजतात नि त्याला फार मानमरातब देतात. जसजसं पश्चिमेकडे वाहावं, तसतसं लेखक-कवींना राजदरबारी इज्जतीने वागवल्याचं दृश्य दिसतं. केनेडीने कवी रॉबर्ट फ्रॉस्टचं निशाण हातात धरलं, निक्सनने कादंबरीकार जॉन स्टाईनबेकला आपला सल्लागार बनवलं, मॅकमिलन तर डिकन्सची चार-दोन पानं वाचल्याविना शयनगृहातला दिवा मालवीत नसे !

हे सर्व वैभववर्णन ऐकून मला क्षणभर वाटलं, लेखक म्हणून आपला जन्म इंग्लंड–अमेरिकेत झाला असता, तर केवढी बहार उडाली असती ! पुढील दारी मानसन्मानांचा प्राजक्ताचा सडा नि मागील दारी पैशांचा पाऊस ! कर लेका जिवाचं न्यूयॉर्क !

त्यानंतर एक वर्ष उलटलं.

सॉल बेलो ह्या अमेरिकन कादंबरीकाराला साहित्याचं नोबेल पारितोषिक मिळालं. त्याचा जगभर जयजयकार झाला. फोटो झळकले. पुढे कालांतराने तो डिंडिम हवेत विरून गेल्यावर सॉल बेलोने अमेरिकन दूरदर्शनवर एक प्रांजळ मुलाखत दिली. परखड भाषेत त्याने सांगितलं,

"आमच्या ह्या अमेरिकेत वाङ्मयीन वातावरण औषधालासुद्धा नाही. साहित्यविषयक चर्चा, लेखकांची संमेलनं, वगैरे प्रकार अमेरिकेत होत नाहीत. पूर्वी एके काळी फ्रान्समध्ये वाङ्मयीन हवा असे. पॅरिसमध्ये कॉफीपानगृहात लेखक जमत, गप्पागोष्टी करत. काव्यवाचनं होत. नाटकं लागत. उमेदवार फ्रेंच लेखकांना ते वातावरण प्रोत्साहक ठरलं. इथे अमेरिकेत रामा-शिवा-गोविंदा ! इथे अमेरिकेत जो तो ज्याच्या त्याच्या कोषात मश्गुल ! क्वचित कुठे परिसंवाद भरतात. पण तिथे प्रस्थापित ढुढ्ढाचार्य ठराविक पोपटपंची करतात. एकदा का हेमिंग्वे नि इलियट ह्यांच्या नावाचा जप करून झाला की, परिसंवादवाल्यांचे पितर स्वर्गाला पोहोचतात ! त्या दोन साहित्यिकांच्या पलीकडे जिवंत लेखकांची एक अफाट दुनिया आहे, हे त्या विद्वानांच्या गावीही नसतं. त्यांनी नव्या पिढीचं काहीही वाचलेलं नसतं. वा रे समीक्षक !

"अमेरिकेत जे कुणी सत्तेवर येतात त्यांना लेखकांच्या जगाची दाद-फिर्यादच नसते. जगात लेखक असले काय नि नसले काय, त्यांच्या हिशोबी ते सारखंच असतं. प्रेसिडेन्ट निक्सनला तर लेखकांचं वावडंच होतं. त्या मानाने अध्यक्ष फोर्ड बरेच उजवे म्हणायचे. त्यांनी एकदा ठळक अशा अमेरिकन कलावंतांना राजवाड्यावर पार्टीला बोलावलं. आम्ही गेलो. तिथे चित्रपट अभिनेता कॅरी ग्रॅन्ट हा आमंत्रित मान्यवर कलावंत म्हणून हजर झाला. नंतर दूरदर्शनचे भाष्यकार नि वृत्तनिवेदक आले. मग सगळ्या पाहुण्यांचं लक्ष त्या बेहद्द लोकप्रिय म्होरक्यांकडे लागलं. त्या दिवशी बड्या अंमलदारांच्या बायकांनाही व्हाइटहाऊसवर बोलावलेलं होतं. त्यांनी कॅरी ग्रॅन्टला जो गराडा घातला तो कायम! त्याच्या चिरतारुण्याचं रहस्य त्या बाया शोधू लागल्या. उरलेले निमंत्रित टी. व्ही.च्या हिरोमंडळींशी बोलण्यात गर्क झाले. आणि, आम्ही साहित्यिक मंडळी मात्र कुणाच्याच हिशोबात नव्हतो! आमच्याकडे ना कुणी ढुंकून पाहिलं की ना कुणी आमची दखल घेतली. काय करणार? सगळे लेखक खट्टावले. पस्तावले.

"मी म्हटलं, मित्रांनो, इथे घडतंय तेच फार मोलाचं आहे. आपल्याला एक अनोखा अनुभव मिळाला. आणि, नाहीतरी लेखकांना रोकडा अनुभव त्रिभुवन मोलाचाच असतो. बडी माणसं कशी वागतात ते आपल्याला प्रत्यक्ष पाहायला मिळालं. आणखी काय हवं?'

"असं आहे! इथे अमेरिकेत एक लेखक आपलं हृद्‌गत दुसऱ्या लेखकाला सांगेल म्हणता? अशक्य. अमेरिकन लेखक एकमेकांना परक्यासारखं लेखतात. अमेरिकेत मुळी वाङ्मयीन हवेची परंपराच नाही."

हे अनुभवाचे बोल आहेत नोबेल पुरस्कार-प्राप्त झालेल्या अमेरिकाप्रेमी अमेरिकन लेखकाचे!

ही मुलाखत वाचल्यावर अनेकांच्या भ्रमाचा फुगा फुटला असणारच. मी त्यातला एक.

प्रश्न इथे संपत नाही.

चारी बाजूंनी अंधारून आलेल्या ह्या उदास जगात लेखकांनी काय करायचं, कोणतं पथ्यपाणी पाळायचं, कशावर भिस्त ठेवायची, श्रेय कुठे शोधायचं, हा मूळ प्रश्न आहे.

साहित्यशास्त्रात काय सांगितलं आहे मला माहीत नाही. तो माझा प्रांत

नव्हे. पंचनामे करण्याची माझी वृत्ती नाही. मी फक्त न्याहाळतो. अनुभव आणि अनुमान ह्यांची बेरीज केल्यावर वाटतं, लेखकांनी स्वतःच्या अवतारकृत्याबद्दल वृथा भ्रम बाळगू नयेत. त्यांनी जनव्यवहार आहेत तसेच उघड्या डोळ्यांनी पहावेत आणि उसनं अवसान न आणता शांतपणे आपला हात लिहिता ठेवावा. टाक बाळवीत ठेवू नये. कुठल्याही शक्तिमान प्रसारमाध्यमापेक्षा आपण प्रधान आहोत हे ओळखावं आणि असं करून जे पदरात पडेल ते पडेल. अन्य स्वर्गाची आस नको.

हे लिहिल्यावर आठवलं की, फार फार मोठ्या लेखकांनीसुद्धा वेगळ्या भाषेत हेच पथ्यपाणी नव्या लेखकांसाठी सांगितलं आहे ! चेकॉव्हचं नम्र सांगणं आहे की, 'मंडळी, नसतं ओझं वाहू नका. अवसान आणू नका. माणसं सदान्‌कदा उत्तर ध्रुवावर धडक मारतात नि तिथे बर्फावरून घसरतात, असं जगात घडत नाही. लोक कचेरीत जातात, घरी परतल्यावर बायकांवर राग काढतात नि मग निमूटपणी त्यांच्याच हातची कोबीची भाजी खातात. सर्वत्र, सदाकाळ, हेच घडतं. माणसं इथून तिथून माणसांसारखीच वागतात, नि यापुढेही वागतील.'

सॉमरसेट मॉमने त्याच्या मित्राला एकदा सांगितलं,

'पहा, जगात कुणी ना कुणी, कुणाचा ना कुणाचा, मुका हा घेतच असतो. नि कुणी ना कुणी, कुठे ना कुठे, त्या मुक्याचा शांत स्वीकार करण्यासाठी आपला गाल पुढे करीतच असतो. हेच सत्य आहे. त्याला ना विचकायचं की ना त्यावर डाफरायचं. लेखकांनी ते फक्त पहायचं नि शेरेबाजी टाळून नोंदवायचं.'

एका वेगळ्या संदर्भात लिहिताना इतिहासाचार्य राजवाडे सांगतात,

'ज्याचे हत्यार त्याचे राज्य हा नियम, कोणाला समजो की न समजो, आपले कार्य केल्याशिवाय राहात नाही.'

समस्त लेखकवर्गाला त्या पुण्यपुरुषाने दिलेला हा इशाराच नाही काय? लेखणी, समंजस नि खंबीर लेखणी हे लेखकाचं एकमेव हत्यार आहे. जो ते पाजळत ठेवील, तो त्याच्या मुलुखात राज्य करील. त्याची दखल भले कोण किती घेतो किंवा घेईल, हा साहित्यबाह्य प्रश्न. त्याची शहानिशा कशाकरिता करायची ? सर्जनशील लेखक फक्त त्याच्या समंजस, अनाक्रोशी आणि अनाक्रमी पवित्र्याच्या लेखनालाच तेवढा बांधलेला आहे. तसं प्रसन्न तोंडवळ्याचं शांत लेखन लेखणीला वश असणं हाच लेखकाचा स्वर्ग.

□

आनंदाची फुलं

डेहेराडूनच्या वाटेवर दुतर्फा फुललेला ताजा टवटवीत निसर्ग पाहून वाटलं, आपण नंदनवनाच्या दिशेला तर लागलेलो नाही नं ?

पिंगट पोपटी शिवारं, उंचाडी धिप्पाड झाडं, त्यांच्या हिरव्यागार पानांवर सर्वत्र लटकलेले मोहोराचे सफेत झुबके, हवेतला सुखद गारठा नि इतःस्ततः चमचमणारी दवबिंदूंची कलाबुत पाहून डोळ्यांची पारणं फिटली. हरिद्वारला गंगा ओलांडली तेव्हापासून प्रफुल्लीत निसर्गवैभवाचा नजराणा सारखा नजरेपुढे झुलत राहिला. कुठे कसली कमतरता म्हणून कशी ती नाहीच. ध्यानात आलं, जीम कार्बेटचा रानावनांचा मुलूख तर इथून अवघ्या हाकेच्या अंतरावर पलीकडे आहे. त्या विचाराने दिलेल्या आनंदाची एक निर्मळ लहर अंगावरून सरसरून गेली. कार्बेटसारखा धुरंधर प्राणीमित्र लेखक जिथे आनंदसंन्यासी बावर करून गेला, त्या झाडाझुडपांच्या समिप असण्यापरतं लेखकाचं भाग्य ते कुठलं ? मला तर कार्बेटने वापरून फेकून दिलेल्या काडतुसाचा गंधकमिश्रित वाससुद्धा क्षणभर आला ! पण लेखकमाणूस कधीच एकटा नसतो, सदैव दुकटा असतो, हा वांधा आहे. त्याचं लेखकीय मन, पावलांच्या पुसट आवाजासारखं दबा धरून त्याच्या मागून मागून चालत असतं. ते पिच्छा सोडत नाही. एका बाजूने एका अनुभवात चिंब भिजत असतानाच, मागे मागे सरत चाललेले दुसरे अनुभव त्या मनाला चोंबाळीत असतात. लेखकाच्या हातात दोन सुया सदैव असतात. एक सुई प्रत्यक्ष अनुभवाचा टाका घालते. दुसरी सुई स्मृतीत मुरलेल्या जुन्या अनुभवाच्या टाक्याचा सांधा त्या ताज्या अनुभवाला जोडून देते. वीणकाम पुढे सरकतं.

जीव ओलामोला करणारी ही सभोवतीची बहरलेल्या वृक्षांची घमघमती

दुनिया, हा ओंजळीतला प्रत्यक्ष अनुभव. माझ्या हातातली एक सुई त्यात गुंतलेली, आणि ह्या तरुवरांनी दिलेल्या निरव शांतीचं अभिवचन स्वीकारून त्यांच्या पायथ्याशी आपलं थकलेलं माथं टेकायला आशेने आलेल्या एम. एन. रॉयची नंतर झालेली अखंड तगमग, हा दुसरा परोक्ष अनुभव—ही दुसरी सुई त्यात गुरफटलेली. वीणकाम हे असं वाटभर चालू होतं.

मन सांगत होतं, हे सगळं निसटतं वास्तव लिहून काढ; शब्दबद्ध कर.

तोपर्यंत गारेगार डेहराडूनचा थांबा आलाच.

म्हटलं, अगोदर पोटोबा शांत करून घेऊया. भटकणं नंतर सावकाशीनं करतां येईल.

डेहराडूनमध्ये खाण्यापिण्याची चंगळ आहे. स्वस्त धाबे पावलापावलाला आहेत. धाब्याचं रूप एकासारखंच दुसऱ्याचं. दर्शनी भागात आडवा मांडलेला चुलखंड. त्यावर स्वच्छ अल्युमिनियमचे रांगेत मांडलेले टोप. त्यात झाकलेली डाळ, सब्जी, चावल, सागुती, वगैरे. चुलखंडाच्या मागे धिप्पाड सरदारजी. त्याच्या हातात कडं. क्वचित जपाची माळसुद्धा. मागच्या भिंतीवर नानकदेव गुरूंच्या छायाचित्राची तसबीर. गुरूंचे डोळे फक्त दया नि शांती सांगतात. धाब्याच्या आतल्या एका अंगाला धुनी. त्याच्यावर भला मोठा पसरट तवा. बाजूला कणकेचा भक्कम गोळा. गिऱ्हाइकाचं पाऊल वाजलं रे वाजलं की पीठाचा बचका ओढून दुसरा सरदारजी पापडाच्या आकाराची बाजरीची भाकरी भाजायला घेतोच.

पदार्थही ठरलेलेच. कडक खरपूस भाकऱ्या, मिरच्या टाकलेलं उडदाचं वाडगाभर वरण. फ्लॉवर-बटाट्याची भाजी. बचकाभर तिखट कांदा. लिंबाच्या रसरसीत फोडी. ही ठरलेली न्याहारी. मटण घेणं, न घेणं हा ज्याचा त्याच्या ऐपतीचा नि रूचीचा प्रश्न. भाजीभाकर घेतली की उडदाचं आंबट मोफत मिळतं.

भाकरीची वाफ हुंगीत मी गल्ल्यावरच्या सरदाजीला सहज म्हटलं,

'तुम्ही सरदारजी मंडळीनी तर तुमच्या गुरूंवर ताण केली बुवा!'

'ते कसं काय?' सरदारजीने कौतुकाने विचारलं.

'तुमचे गुरुलोक पट्टीचे भटके होते. नानकगुरू तर अर्धी पृथ्वी फिरले. तोंडात देवाचं नाव, नि सतत चालते पाय, हे तुमच्या गुरूंचं वैशिष्ट्य होतं. तुमच्यात बैठा गुरू झालाच नाही. तुम्ही त्यांचे चेले. तुम्हीही जगभर पसरलात.

कॅलिफोर्नियापासून सिंगापूरपर्यंत नि लंडनपासून सिडनेपर्यंत कुठेही जा; सरदारजी टॅक्सी घेऊन आहेतच. पण तुमच्या गुरूंनी न केलेली गोष्ट तुम्ही फत्ते केली! तुम्ही जिकडे तिकडे धाबे टाकलेत! अगदी आसाम-अंदमानापासून थेट कन्याकुमारीपर्यंत एकूण एक महामार्ग तुम्ही सरदारजींनी काबीज केलेत! शिवाय सैन्यात आहात; शेतीत आहात; सुतारकामात आहात. सिनेमात आहात, पापड-लोणच्याच्या धंद्यात आहात; कापड धंद्यात आहात; सुकामेव्यात तर केव्हापासूनचे आहात.'

'अरे, का बरं असणार नाही?' सरदारजी म्हणाला, 'सरदारजी कष्ट करतात. तुम्ही भीक मागणारा सरदारजी कधी पाहिलाय काय? अशक्य. आणि हया डेहराडूनबद्दल विचाराल तर ही आख्खी सिटी आमच्या ताब्यात आहे. इथे मिलिटरी स्टाफ ट्रेनिंग कॉलेज आहे. फॉरेस्ट्री स्कूल आहे. ओ. एन. जी. सी. आहे. ही सगळी लाइन कष्ट करणाऱ्यांची आहे. सैन्यातल्या लोकांना भेटायला त्यांचे नातेवाईक येतात. मित्रमंडळी येतात. फॉरेस्टचे बडे कंत्राटदार येतात. त्यांना तिन्हीत्रिकाळ पंजाबी खाना लागतो. दारू लागते. मुर्गी लागते. ती आम्हीच पुरवतो. त्यांना टॅक्सीज लागतात. ट्रक्स लागतात. ते आम्हीच पुरवतो. त्यांना घरं लागतात. घरात फर्निचर लागतं. ते सर्व आम्हीच पुरवतो. त्यांना पाहारेकरी लागतात तेही आम्हीच पुरवतो. आता तुम्हीच सांगा, सरदारजी नसून हया सिटीचं कसं भागेल?'

'गुरूची कृपा आहे तुमच्यावर!' मी सर्टिफिकेट दिलं.

हयावर सरदारजी सर्व काही भरून पावला. त्याने डोळे मिटून तसबिरीतल्या गुरूला प्रणाम केला. मग मला विचारलं,

'आज काय कामगिरी काढलयाय?'

'एम. एन. रॉयचं घर बघायचंय.'

'फॉरेस्ट कॉन्ट्रॅक्टर आहेत ते?'

'छे! ते एक लेखक होते. मोठा जगप्रसिद्ध माणूस.'

'काय नाव म्हणालात?'

'एम. एन. रॉय.'

'हया नावाचा माणूस इथे नाहीच. कुणी नवीन तर आलेला नाही नं?'

'अहो, त्यांना मरूनही आता बरीच वर्षं झाली.'

'सत् श्री अकाल! मग तर त्यांचा पत्ता इथले पोस्टमेनसुद्धा सांगू शकणार

नाहीत !'

'इथे मोहिनी रोड आहे ?' मी विचारलं.

'आहे ना.'

'तिथे तेरा नंबरच्या बंगल्यात ते राहायचे.' मी.

'परमेश्वर जाणे. मी तर पस्तीस वर्षं इथे दुकान मांडून बसलोय, पण असलं चमत्कारिक नाव कधीच ऐकलेलं नाही. काय नाव म्हणालात ? पुन्हा एकदा सांगा.'

'एम. एन. रॉय. तेरा मोहिनी रोड, डेहराडून.'

'अजब आहे बुवा !' सरदारजीने नाद सोडला.

खरं म्हणजे भडका माझ्या अंगाचा झाला होता. पृथ्वीतलावरचा माणूस आमुलाग्र बदलायला निघालेला एम. एन. रॉय नावाचा एक महामानव एकाग्र चिंतनासाठी हया डेहराडूनमध्ये तळ ठोकून बसतो. वर्षानुवर्षं सूक्ष्म शास्त्रांचं अध्ययन करतो. मूलग्राही प्रबंध लिहितो; जग बदलायची स्वप्नं पाहातो; क्रांतीची भाकीतं सांगतो. नि त्याचाच गावकरी झालेला हा सरदारजी लेकाचा भाकऱ्या बडवण्यापलीकडे डोकवायलाच कबुल नाही !

पैसे द्यायला उठलो तेव्हा सरदारजीला म्हटलं,

'आपल्याला दिवसभर राहायचंय. इथे चांगला लॉज कुठे मिळेल ?'

'डेहराडूनात लॉजेसना तोटा नाही. पण कशाला नाहक पैसे खर्चता ? त्यापेक्षा मी सांगतो तसं करा. मी तुम्हाला आमची गाडी देतो. इथे टॅक्सीचं स्टँडर्ड भाडं आहे. तेच आम्ही घेतो. तुम्ही मिलिटरी कॉलेज, फॉरेस्ट स्कूल, असं सगळं पाहून या. आतून काहीच बघायला मिळत नाही. फाटकाबाहेरून पहायचं. फार फार तर तासभर लागेल आणि परतताना ड्रायव्हर मोहिनी रोडवरून तुम्हाला बापस आणेल. तिथे तुमच्या त्या मास्टरजींना भेटून या.'

'ते तर केव्हाच वारले. मी सांगितलंवतं तुम्हाला.'

'मग त्यांच्या बिबींना भेटून या.'

'त्याही वारल्या मागेच.'

'मग त्यांच्या बालबच्चांना भेटून या.'

'त्यांना मुलंबाळं नव्हती. पतिपत्नी एकटेच होते.'

'म्हणजे पहा आता ! मास्टरजी मेले. त्यांची बिबी मेली. पोरंबाळं नाहीतच. सगळा आनंद आहे नि तुम्ही त्यांचं बंद घर बघायला इतक्या लांबून आले !

पण हरकत नाही. तुम्ही लॉजच्या भानगडीत पडू नका. आपली गाडी आहे. फिरून या. तुमचा वेळ वाचेल.'

मला त्याचा वेदांत पटला. बॅग धाब्यावरच ठेवली आणि सरदारजीच्याच गाडीने निघालो.

अगोदर उंचसखल बाजारपेठ पाहिली. सगळीकडे भरभराट दिसली. रस्त्यात पब्लिक स्कूलमधली मुलं निळे गरम सूटस घालून तालात चालली होती. त्यांच्या फुगीर चेहेऱ्यावरची श्रीमंतीची झाक पाहून मला हेवा वाटला. बगीचे पाहिले. मिलीटरी कॉलेजच्या प्रशस्त इमारती दुरून पाहिल्या. मैदानं पाहिली. प्रचंड राखीव जंगल पाहिलं. अरण्यविद्येचं महाविद्यालय आवाराबाहेरून पाहिलं. डून स्कूल पाहिलं. मोहिनी रोड पाहिला. उंचावरून एका बंगल्याचं छप्पर खोलगटात दिसलं. ड्राइव्हर म्हणाला, 'तुम्ही म्हणता ते मास्टरजी तिथेच रहात असतील! हाक मारणार?'

कर्म!

दोन तासांचा चुरा झाला. पेट्रोल भरमसाट जळलं. झक्कत पैसे मोजणं प्राप्त झालं. वाटलं, नसतो हिंडलो तरी काहीही बिघडलं नसतं! डोंगरांसारखे डोंगर, झाडांसारखी झाडं, छपरांसारखी छपरं, नि माणसासारखी माणसं. काय पदरात पडलं इतकी वणवण करून? तेरा, मोहिनी रोड, पूर्वी होता तेवढाच अजूनही दूर आहे!

परतलो. सरदारजी गळ्यावर होताच. त्याने स्वागत केलं. म्हणाला,

'झालं बघून डेहराडून? तसं खास बघण्यासारखं काहीच नाही इथे. घरांसारखी घरं, नि माणसासारखी माणसं. आता असं करा. मागीलदारी आपली चारपायी आहे. तिथे आरामात थोडी विश्रांती घ्या. नंतर अर्धी मुर्गी हाणा नि खाऊन पिऊन शरीरात ऊब भरली की इथेच पलीकडे सहस्त्रधारा नावाचा धबधबा आहे नि कुंड आहे. त्यात उन्हाचं स्नान करा. थकवाबिकवा सगळं दूर पळून जाईल.'

तेही मानलं. चारपायीवर लवंडलो. हाशहुश केलं. मग जेवलो. पैसे मोजले नि सरदारजीचा निरोप घेतला. निघताना म्हटलं, 'आमचे रॉयसाहेब माणूस बदलायला निघाले नि अखेरीस ह्या डेहराडूनमध्येच डोळे मिटायला परतले. माझी खात्री आहे, माणूस ब्रह्मांड जरी बदलायला निघाला नं, तरी अखेर त्याला सरदारजीच्या धाब्यातच डाळरोटी खायला परतावं लागेल, अशी सुंदर

व्यवस्था तुम्ही लोकांनी करून ठेवली आहे! तुमच्या नानकदेव गुरूंचे ह्या पृथ्वीवर भले असो!'

सरदारजी उल्हसित झाला. म्हणाला,

'कसली कर्माची सुधारणा करणार हे लिडर लोक? देवाची दुनिया केव्हढी अफाट नि माणसाचं डोकं केवढं छोटं! आता ही आमची मिलीटरी अॅकॅदेमी! वर्षाकाठी दोनशे ऑफीसर्स हे इथे तयार करणार नि दुसरीकडे तेवढेच रिटायर होऊन जाणार! म्हणजे हिशोब काय? हे फॉरेस्ट्रीवाले वर्षाला ऑफीसर्स तयार करणार पन्नास, नाहीतर साठ. नि देशात अरण्यं किती? पशुपक्षी किती? कशाचा काही मेळ नाही. माणसाने उभ्या केलेल्या ह्या देखाव्यावर आपला काहीही विश्वास नाही. गुरूंची कृपा प्रमाण! तुम्ही आता सहस्रधारा पहालच. साक्षात ईश्वरी चमत्कार आहे. तिथे आभाळातून पाणी कोसळतंय जणू! बारा महिने चोविस कल्लाक! तो खरा महिमा. आणि तुम्हाला मुद्दाम सांगतो, तिथून खिंडीतून पाच पावलं पलीकडे जा. तयार रस्ता वगैरे काही नाही त्या बाजूला. आपणच रस्ता शोधायचा नि आपणच पुढे पुढे जायचं. मग दिसेल तुम्हाला करोडो सुंदर फुलांचा प्रचंड गालिचा! थेट ईश्वरानेच तुमच्यासाठी विणून ठेवलेला! आनंदच आनंद आहे—पण तुम्हीच पायवाट शोधून गेलं पाहिजे.'

सहस्रधारेला पोहोचलो. हिमालयाचे अजस्र दगडी कडे पाहिले. चोविस घंटे कोसळणारा धबधबा पाहिला. कुंडात स्नान आटोपलं. पुढे पायीपायी निघालो. वाटेत खिंड लागली. ती ओलांडली. पुढे झालो नि तो टवटवीत फुलांचा थरथरणारा गालिचा पाहिला. पहावं तिकडे रंगीबेरंगी फुलंच फुलं. थेट क्षितिजापर्यंत पसरलेली!

लेखनाचंही असंच आहे. स्वतःच पाऊलवाट पाडावी लागते. एकट्यानेच पुढे जावं लागतं. नंतरच्या टप्प्यावर आनंदाची फुलं गालीच्यासारखी पसरलेलीच असतात.

□ □

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३३९५
दा. क्र. २५८५
१२/३/६८

REFBK-0025858



रवींद्र पिंगे

प्रकाशित साहित्य

कादंबरी

परशुरामाची सावली

व्यक्तिशोध

व्यक्तिशोध

*शतपावली

देवाघरचा पाऊस

पश्चिमेचे पुत्र

दिवे-लामणदिवे

अंगणातलं चांदणं

प्रवासवर्णन

आनंदाच्या दाही दिशा

*आनंदव्रत

कथासंग्रह

प्राजक्ताची फांदी

सुखाचं फूल

ललित लेख

*मोकळं आकाश

मुंबईचं फुलपाखरू

बकुळफुलं; फुलं मोहाची

पिंपळ्यानं आनंदाची फुलं

* महाराष्ट्र शासनाचं पारितोषिक